# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१८

## अंतरंग


संपादकीय

शिवकर बापूजी - प्रताप वेलकर

समीर पिशवीवाले - डॉ. सुमन नवलकर

शिवाजी डब्ल्यु. एम. - नंदकुमार विजयकर

एक पाऊल पुढे - सुहासिनी कीर्तिकर

चार गंधर्व - पं. सुजन राणे

नकोशी पोरगी - सुरेश नवलकर

नशा - शैलेश विजयकर

Social Media and Us - मिलिंद कोठारे

Life of Sea - सुदीप कोठारे

एक स्पंदन - रसिक विजयकर

नाईलाज - उज्ज्वला ब्रह्मांडकर

### प्रवास लेख

It is Important to Express oneself - दिलीप नवलकर

Searching for Stripes - शुभदा आगासकर

Jullay - अनुराधा कीर्तिकर

अष्टमठ यात्रा - अचला देसाई

कच्छचे रण - अपर्णा कीर्तिकर

समयाचे पंख - विनय त्रिलोकेकर

---

अनिच्च - मीरा

उद्यम् फास्ट फूड - सुदेश देसाई

संवाद - हेमंत तळपदे

क्रीडाक्षेत्रात करियर - विश्वास अजिंक्य

मार्जिनालाइज्ड - सुहासिनी कीर्तिकर

ड्रॅगन बेटावर अडकून पडलेले - कल्पना कोठारे

परदेशस्थ मराठी - प्रणिता प्रभाकर

दीर्घायुष्य- शाप की वरदान - सुरूपा राणे देवरूखकर

अनुवाद संवाद - कल्पना कोठारे

50 Glorious Years... - अरविंद धराधर

A Glimpse into... - अम्मान कोठारे

Being A Dad - निषाद धुरंधर

### छोट्यांसाठी-मोठ्यांसाठी -

गुण कोणाचा - सुमन नवलकर

मुखपृष्ठाविषयी - किशोर जयकर

### कविता

हेमंत तळपदे, आरती कोठारे, श्रिया जयकर, कल्पना कोठारे, शौनक जयकर. निकेता राणे, अरमान कोठारे, सुरूपा राणे देवरूखकर, स्वागता विजयकर

### वात्रटिका

डॉ. सुमन नवलकर

### व्यंग्यचित्रे-

डॉ. सुमन नवलकर, सुहासिनी कीर्तिकर

### जरा हसा/चिंतनिका

सुहासिनी कीर्तिकर

---

प्रभुतरुणाची डायरी, हौशी कला मंदिर, परीक्षेतील सुयश, अभिनंदन, भाऊबीज, देणगी, प्रकाशातील परभू


---

**मुखपृष्ठ: कै. श्रीपाद शामराव जयकर**

**(सौजन्य: किशोर जयकर)**

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

कार्यकारी संपादक मंडळ: **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

सहाय्यक संपादक: **त्वरिता दळवी, भक्ती शेटये, राजेश नवलकर**

**www.prabhutarun.com**

**वर्ष ५२ वे) ऑक्टोबर २०१८ (अंक ४**

# संपादकीय

मित्रहो, यावर्षीचा दिवाळी अंक दिवाळीपूर्वीच आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. या दिवाळी अंकाचा आस्वाद घेऊनच आपण सर्वजण दिवाळीच्या तयारीला लागणार आहोत. हा आस्वाद सर्वांनाच ऊर्जा देणारा असेल. ऊर्जा उत्साहाने काम करण्याची. ऊर्जा सणासुदीचा आनंद भोगण्याची. ऊर्जा पुढील वर्ष निरामय आनंदाने भरून टाकण्याची.

ही ऊर्जा देणारा हा दर्जेदार दिवाळी अंक परिपूर्ण करण्यासाठी अनेकांचा हातभार लागला आहे. लेखक, कवी, व्यंगचित्रकार, चित्रकार, जाहिरातदार.. आदी सगळ्यांचाच. मुखपृष्ठ औचित्यपूर्ण आणि देखणे करण्यासाठी श्री. किशोर जयकर यांचाही. या सगळ्यांमुळेच संपादनाची मला ऊर्जा मिळाली. ती अशीच यापुढे कायम मिळणार आहे. अन् हो; वाचकहो, तुमचा या आनंदात सहभाग सर्वात मोठा.

'आनंदाची ही दुसरी दुनिया'च असणाऱ्या या दिवाळी अंकाचा चला तर; आस्वाद घेऊया.

**-सुहासिनी कीर्तिकर**

लेख

# पं. शिवशंकर बापूजी तळपदे यांचे हवाई जहाज

## पहिल्या भारतीय विमानावर मिथुन चक्रवर्तीचा चित्रपट

**⋆ प्रताप वेलकर ⋆**

सुप्रसिद्ध सिनेकलावंत मिथुन चक्रवर्ती पं. शिवकर बापूजी तळपदे यांचे प्राचीन वैदिक विमान शास्त्रावरील संशोधन वाचून आधीच प्रभावीत झाले होते आणि त्या विमानावर चित्रपट काढण्याचा बेत होता. योगायोग त्यासमयी असा झाला, की जवळजवळ त्याच विषयावर मुंबई येथे इंडियन सायन्स काँग्रेसचे १०२वे अधिवेशन नजिकच्या काळात भरण्याचे ठरले.

समदृष्टिकोनामुळे मिथुन चक्रवर्तीनाही याच विषयावर चित्रपट निर्मितीची प्रेरणा झाली असावी. प्राचीन संशोधनाचे ऐतिहासिक महत्त्व जाणून मिथुनजींना शिवकरजींच्या पहिल्या भारतीय विमानावर चित्रपट काढावासा वाटला व तळमळीने तत्परतेने तो पुरा केला. मुंबईच्या सनसिटीमध्ये गेल्या जानेवारी महिन्यात प्रदर्शित झालेला मिथुन चक्रवर्तीचा 'हवाईजादा १८९५' तोच हा पं. शिवकर 'बापूजीं'चा मरुत सखा.

शिवकर तळपदे यांनी मुंबई चौपाटीवर १८९५ साली उडविलेले पहिले भारतीय विमान केवळ पुस्तकात न राहता, प्रत्यक्ष रुपेरी पडद्यावर भारतभर सर्व थिएटरात डॉक्युमेंट झाले. मिथुन चक्रवर्तीचा हवाईजादा (हवाई जहाज), सनसिटी थिएटरात मी प्रत्यक्ष जाऊन पाहून आलो. 'अप्रतिम, धन्य धन्य' मिथुनजींना मी मनात म्हणालो.

टाईम्स वर्तमानपत्राचा रिपोर्टर लिहितो, शि. बा. तळपदे यांच्या विमान संशोधनावर आधारित मिथुन चक्रवर्तीचा हवाईजादा, प्रेक्षकांवर प्रभाव पाडू शकला नाही. त्यांच्या मते भारद्वाज ऋषींच्या ऋच्यांवर आधारलेले विमान त्यातील तांत्रिक जुळवणीवर भर न देता, काल्पनिक प्रसंग घालून रहस्य, लव्हसिन्स, सुरेल संगीत घालून चित्रपट रंगतदार केला आहे. प्रेक्षकांची करमणूक करीत आहे.

औद्योगिक क्षेत्रांत मार्केटिंगला महत्त्व आहे. फिल्म फायनान्सच्या जोडीला, सस्पेन्स, संगीताचा हातभार नसेल तर स्पर्धेच्या जगात, इतर चित्रपटांवर बरोबरीने विजय मिळविणे कठीण. पैसा ओतला आहे. ध्येय, धैर्य व धन या तीन गोष्टींचा विचार करूनच चित्रपट काढायचा असतो. मिथुन चक्रवर्तीचा हवाईजादा हा असा आहे. हे सर्व सत्य जाणून टाईम्स रिपोर्टरने 'भारताच्या पहिल्या विमानावर चित्रपट काढणे हे राष्ट्र कार्य' जाणून मिथून चक्रवर्तीच्या विमान चित्रपटाला अखेर साडेतीन स्टार्स दिले आहेत, ते उगाच नाही.

मिथुनचा हवाईजादा, भारतभर झळकला आणि त्याच सुमारास गेल्या ५ जानेवारीला मुंबई येथे इंडियन सायन्स काँग्रेसचे १०२वे अधिवेशन मुंबई विद्यापीठाच्या कालिना कॉम्पसमध्ये संपन्न झाले.

अधिवेशनास देश परदेशातून अनेक तज्ञ तंत्रज्ञ मोठ्या संख्येने हजर होते. महत्त्वाची गोष्ट, पवन हंसचे हॅलिकॉप्टर प्रमुख कॅप्टन बोडस यांच्या भाषणाला कार्यक्रम पत्रिकेवर अग्रभागीच मान दिला होता. कॅप्टन आनंदराव बोडस म्हणाले, 'पं. शिवकरजी तळपदे यांचे विमान भारद्वाज ऋषींच्या ऋच्यानुसार बनविलेले शास्त्रशुद्ध होते, विमान उड्डाण यशस्वी झाले.'

इंडियन सायन्स काँग्रेस अधिवेशनाला भारतातल्या विविध प्रदेशातून दिल्ली, बिहार,

कलकत्ता, हिमाचल प्रदेश, मद्रासमधून विमान संबंधित टेक्निशियन्स आले होते. खरेतर, वर्षभर आधीच ही मंडळी अधूनमधून येथील ग्रंथसंग्रहालयामध्ये पाठारे प्रभू इतिहास ग्रंथातून, प्रभू मासिकातून अधिक अधिकृत माहिती मिळविण्यासाठी अनेक वेळा येऊन गेली होती. मजजवळ इतिहास जाणून घेण्यासाठी काही प्रसंगी फोटो सेशन्स, चॅनलसाठी मुलाखतही घेऊन गेले आहेत. पुढे त्यांचे काय झाले कल्पना नाही.

माहितीदाखल असे सांगावेसे वाटते की, दिल्ली एअर फोर्समधील अधिकारी विजयप्रसाद उपाध्याय, दिल्लीहून प्रस्तुत लेखकाला अनेक वेळा भेटून गेला. शिवकरजींच्याविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी दूरध्वनी करीत असे. मिथुन चक्रवर्तीचा चित्रपट पडद्यावर झळकण्याआधी काही दिवस आधी, दिल्लीहून मजला भेटण्यास आला होता. म्हणाला माझी बदली नाशिक येथे झाली आहे. सध्या मी रजेवर आहे. मी आपणासाठी मिथुन चक्रवर्तीचा हवाईजादा चित्रपटांचा ट्रेलर तुम्हाला दाखविण्यासाठी लॅपटॉपच बरोबर घेऊन आलो आहे. त्यात तुमच्या नावाचा उल्लेख आहे.

लॅपटॉपमध्ये एक सिनेरिपोर्टर बाई निवेदन करीत होती. म्हणाली, ‘मिथुन चक्रवर्तीचा चित्रपट पडद्यावर झळकणार आहे. त्यांनी बनविलेला ‘हवाईझादा’ चित्रपट मूळ पाठारे प्रभूंच्या इतिहासावरून प्रताप वेलकर यांच्या लेखाचा आधार घेऊन काढलेला आहे.’ प्रस्तावनेदाखल दोन शब्द बोलल्यावर काही सिन्स मला लॅपटॉपवर बघायला मिळाले. विजय प्रसाद उपाध्यायला मला ट्रेलर दाखविण्यात आनंद झाला होता. खरा आनंद नंतरच लक्षात आला आणि तो म्हणजे त्याने स्वत: पं. शिवकर तळपदे यांचेवर एक पुस्तक प्रकाशित केलेले त्याने मला दाखविले. दोन प्रती मजला भेट म्हणून दिल्या.

विजय उपाध्याय म्हणाला, ‘मी आर्य समाजिस्ट आहे, पं. शिवकरजीही आर्य समाजिस्ट. हार्डकोर समाजिस्ट होते, त्यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांवरून शाबीत होते. स्वामी दयानंद यांनी स्थापन केलेला आर्य समाज कडवा धर्माभिमानी आहे. आर्य समाजाच्या शाखा भारतभर पसरलेल्या आहेत. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पिंपरी, बीड, औरंगाबाद, पुणे, मुंबईत गिरगाव बॅक रोडवर आर्य समाजाची प्रमुख शाखा आहे. आम्ही बरेचसे दिल्ली एअरफोर्समधील पदाधिकारी आर्य समाजिस्ट आहोत. त्यामुळे पं. शिवकरविषयी व त्यांच्या संशोधनाविषयी आम्ही सर्व आर्य समाजिस्ट अभिमानी आहोत. पं. शिवकर बापूजी तळपदे हे आमचे आहेत, असे आम्ही मानतो. वेदोक्त विमान विद्या ‘पं. शिवकर बापूजी यांनी लिहिलेले पुस्तक संकलन, संपादन करून मी पुनश्च प्रकाशित केले आहे. मूळ पुस्तक मी हिंदीत लिहिले आहे. त्याचे मराठी भाषांतर बीडचे माधवराव देशपांडे यांनी केले आहे.’

पुस्तक भेट देताना विजयप्रसाद म्हणाले, ”मी प्रत्यक्ष मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात अनेक वेळा जाऊन आलो. फाटलेले तुकडे झालेले बरेचसे कागद एका ठिकाणी बॅगेत भरून ठेवले होते. ते बंडल कोपऱ्यात पडून होते. कित्येक दिवस, महिने, वर्षे पडून होते, ते फाटलेल्या कागदांचे बंडल चाळण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी अतिशय सायास पडले; परंतु प्रयत्नांती परमेश्वर हेच खरे. मला नेमके पाहिजे ते मिळाले. पं. शिवकर बापूजींच्या विमानाचा अधिकृत लाकडी लोखंडी सांगाडा सापडला. फाटक्या तुटक्या कागदाने भरलेला दस्तऐवज एकत्र करून सांधून पाहिले. आश्चर्याने उद्गारलो, ‘अरे हा तर पं. शिवकरजींचा मरुतसखा! मी तत्काळ छायाचित्र घेऊन आनंदाने छापखान्यात जाऊन पुस्तक प्रकाशित केले. पाठारे प्रभूंचा इतिहास पुनश्च प्रकाशित झाल्यास त्यात या अधिकृत चित्राचा उपयोग होईल. आत्तापर्यंत कोणालाही छायाचित्र सापडले नव्हते. माझे नशीब बलवत्तर मला सापडले. मी आर्य समाजिस्ट पं. शिवकर तळपदे तर हार्डकोअर आर्य समाजिस्ट होते. आर्य समाजाच्या प्रमुख संस्थेने हे सर्व जाणून मोठ्या सन्मानाने माझे संपादित केलेले पुस्तक प्रकाशित केले. चित्रपट निर्माते मिथुन चक्रवर्तींनाही मी एक प्रत सप्रेम भेट म्हणून दिली आहे.’

उगाच नाही पं. शिवकर बापूजी तळपदे यांच्या संशोधनावर आधारलेल्या मिथुन चक्रवर्तीचा ‘हवाईजादा १८९५’ चित्रपट सिनेसृष्टीत गाजला. डॉक्युमेंट झाला. टाईम्स रिपोर्टरने हे सर्व जाणून या राष्ट्रीय चित्रपटाला अखेर साडेतीन स्टार्स दिले. साडेतीन हे काय कमी आहे? पण हे लक्षात कोण घेतो!

विनोदी कथा

# समीर पिशवीवाले

✶ डॉ. सुमन नवलकर ✶

''आंघोळ बिंघोळ करून मासे आणायला?''

''मग काय झालं? आता काय पूर्वीसारखे कागदात गुंडाळून कापडाच्या किंवा रेक्झिनच्या पिशवीतून देतात ना? एकात एक दोन पिशव्या धालून आणले की कोणाला कळणारही नाही पिशवीत मासे आहेत ते! डागही पडायचा नाही कपड्या - बिपड्यांना.''

''हो पूर्वी आपल्याकडे मासे-मटण आणायची पिशवीच वेगळी होती. आठवतंय? वेगवेगळया आकाराचे डाग पडून पिशवीवर छानसं नक्षीकामही झालं होतं.''

''तर काय? मला अशी लाज वाटायची ती पिशवी न्यायला देखील.''

''त्यात काय लाजायचंय? प्रत्येक मांसाहारीच्या घरात तेव्हा अशी एक ना एक पिशवी असायचीच. आणि गोव्या-बिव्या साईडचे असले तर त्यांची मोठ्ठी काळी रेक्झिनची पिशवी ठरलेली असायची, खास मासे आणायसाठीची.''

बोलता-बोलता समीरने कपडे चढवले. बिन प्लॅस्टिकच्या दोन-तीन पिशव्या घेतल्या आणि निघाली स्वारी बाजारात. जाताना पिशव्या खिशात व्यवस्थित घडी करून आणि येताना हातात लटकत-सामान भरून पिशव्या कशातरी वापरलेल्या समीरला अजिबात आवडत नाही. त्या नव्हत्या तेव्हा किती त्रासात दिवस काढावे लागायचे ते तो विसरलेला नाही. कडधान्य, डाळी, तांदूळ, गहू, साखर सगळा किराणा माल कागदी पिशव्यांतून आणावा लागे. कधी कधी आणता आणता एखादी पिशवी फुटायची. बाहेरच्या कापडी पिशवीच्या आत धान्य सांडायचं. एखादंच धान्य सांडलं तर ठीक. पण समजा गहू, तांदूळ दोन्ही सांडले तर निवडता-निवडता वाट आणि समजा तांदूळ-साखर अशी युती असेल तर त्या गंगा-यमुनांचे प्रवाह वेगळे वेगळे करता करता डोळयांत गंगा-युमना उभ्या रहायच्या. गौरीकडून बोलणी खावी लागायची. कधी कधी वादविवाद, भांडण, अबोला, धुसफूस अशा साऱ्या सीमा ओलांडून प्रकरण युद्धपातळीवरही जायचं. आता प्लॅस्टिकबंदीमुळे ते पुन्हा सुरू!

लिफ्टमधून उतरता-उतरता हा सर्व घटनाक्रम समीरच्या डोळयांपुढून चित्रपटासारखा सरकत होता. खिशातल्या पिशव्या त्याने हाताने चाचपल्या. नवीन वस्त्राच्या सळसळीसारखा पिशव्यांचा आवाज त्याच्या कानांवर पडला आणि आपणच नवा शर्ट घातल्याप्रमाणे गुलाबी शहारा आला त्याच्या अंगावर.

मासळी बाजाराच्या अलीकडच्या कोपऱ्यावरच्या दुकानाकडे थोडी गर्दी दिसली. 'दुकानाच्या नूतनीकरणासाठी सेल' अशी पाटी पाहून समीरची पावलंही थबकली. शर्ट-पँटची कापडं, साड्या हे सगळं भरपूर आहे आपल्याकडे. तेवढ्यात कापडं-साड्या बांधून देणाऱ्या माणसाच्या हातांकडे समीरचं लक्ष गेलं. मोठ्ठी लाल रंगाची, जाड प्लस्टिकची पिशवी, त्यावर सोनेरी वेलबुट्टी, मग मात्र समीरची पावलंही आपसूकच वळली दुकानाकडे.

खूप दिवसांत गौरीसाठी काही घेतलं नाहीये आपण. लग्नाचा वाढदिवसही जवळ आलाय. घेऊच एखादी साडी. पिशवीकडे लक्ष असल्यामुळे खरं तर साडीच्या रंगाकडे, डिझाईनकडे फारसं लक्ष गेलंच नाही समीरचं. त्याने पटकन निवडली एक साडी. पैसे चुकते केले. त्याने घेतलेली साडी त्याला आवडलेल्या त्या लाल-सोनेरे पिशवीत विराजमान झाल्यावर धन्य झाला तो.

आता पुन्हा घरी जावं लागणार. मासे घेण्यापुरतेही पैसे शिल्लक राहिलेले नाहीत खिशात. आता घरी जाऊन, साडी ठेवून, पुन्हा पैसे घेऊन

यायचं. मासे गौरीच्या हातात पडेपर्यंत आणखी अर्धा तास. गौरी जाम वैतागणार! आमटीचा मसाला वाटून तयार आहे. त्यात मासे सोडून उकळ आणला की झालं. गौरीला अख्खा दिवस स्वैंपाकघरात तिष्ठत राहायला अजिबात आवडत नाही. अर्थात साडी हातात पडली की गौरीचा वैताग कमी होईल म्हणा.

''आँ? एवढ्या सुंदर पिशवीत मासे?''

''मासे नाही, साडी''

''मग मासे कुठायत?''

''मासे आत्ता आणतो दहा मिनिटात. साडी छान दिसली. सेल आहे, म्हणून लगेच घेतली. घरी मासे आणून मग पुन्हा जाईपर्यंत गेलीही असती ही साडी. म्हणून आधी साडी घेऊन आलो.''

''पिवळी साडी? अरे समीर, मधे वाढदिवसाला पिवळाच सलवार-कमीज घेतलायस ना तू?'' समीरच्या लक्षात चूक आली.

''अगं राणी, पिवळा रंग छान दिसतो ना तुला? म्हणून घेतला.'' तसं तर समीरचं लक्ष साडीच्या रंगात होतंच कठे? पिशवीचा लाल रंग, सोनेरी नक्षी इतकी डोळ्यात भरली होती की आपण लाल रंगाची, सोनेरी नक्षीची साडीच घेतलीय असंच इतका वेळ वाटत होतं त्याला.

समीर घरून पैसे घेऊन जाईपर्यंत कोळणीकडे पापलेटची शेवटची जोडीच शिल्लक राहिली होती. नशीब, तेवढी तरी होती. नाहीतर मग गौरीने समीरचीच आमटी करायलाही मागेपुढे पाहिलं नसतं. मासे घेऊन आल्यावर समीरने हात-पाय धुवून पहिलं काय केलं, तर साडी पिशवीतून बाहेर काढून सोफ्यावर ठेवली आणि पिशवीच्या मूळच्या घड्यांवर पिशवी ताठ करायला सुरुवात केली.

पूर्ण पिशवी ताठ करून झाल्यावर समीरने ती आडवी मधोमध दुमडली, उभी दुमडली तर हँडल्स खराब होतील म्हणून आणि मग कपाट उघडलं.

आता ही पिशवी कुठल्या कप्प्यात ठेवावी बरं? समीरचा विचार चालला होता. तेवढ्यात गौरीची हाळी आली, ''अरे समीर, ही माझी साडी का बाहेर पडलीय? पिशवी कुठेय ती?'' माश्याच्या आमटीखालचा गॅस बंद करून गौरी एप्रनला हात पुसत-पुसत बाहेर आली होती. समीर मासे आणायला गेला तेव्हाच खरं तर ती साडी उलगडून पाहणार होती. पण मग तिने विचार केला की मासे धुवायला 'सिंक' रिकामी करायला हवी. सिंकमधल्या भांड्यावरच मासे धुतले तर सगळी भांडी वासाळ होतील आणि पर्यायाने घरातले सगळे वाचाळ होतील. मासे टाकून आमटीला उकळ आणण्या पलीकडे ओट्यावरचंही बाकी काम झालेलं होतं. म्हणून मग गौरीने ओटा धुणं, सिंक रिकामी करणं, सगळीच कामं समीर मासे आणायच्या आधीच उरकून घेतली होती.

साडी सोफ्यावर तशीच उघडी पडलीय पाहून तिने आजूबाजूला कुठे पिशवी उडून गेलीय का ते ही पाहिलं. बेडरूममधून समीरचा खुडबुडल्याचा आवाज ऐकून ती तिथे वळली. समीर पिशव्यांच्या ढिगात मांडी ठोकून बसलेला. खणातून बऱ्याच पिशव्या त्याने बाहेर काढल्या होत्या. कोणत्या पिशवीच्या खाली किंवा कोणत्या पिशवीच्या वर ही लाल, सोनेरी वेलबुट्टीवाली पिशवी ठेवावी, याविषयी त्याचा निर्णय होत नव्हता.

''हे रे काय समीर? अजून ती साडी फॉल-बिडींगसाठी न्यावी लागेल. मॅचिंग ब्लाऊजपीस आणायसाठीही साडी घेऊन जावी लागेल. कशातून नेऊ? आणि आता ही कुठे ठेवू साडी?''

''अगं परवा गहू नाही का आणले अशोक प्रोव्हिजनमधून? ती पिशवी बघ टीपॉयच्या खालच्या खणात ठेवलीय, ती का नाही घेत तू?''

''गव्हाची पिशवी साडीला?''

''छान झटकून, घडी करून ठेवलीय मी. साफ आहे अगदी.''

''पण तरीही गव्हाची पिशवी साडीला?''

प्रश्न विचारता-विचारता गौरी वळली. प्रश्नाचं उत्तरही मिळणार नाही आणि पिशवीही मिळणार नाही हे तिला अनुभवाने माहीत आहे. शिवाय पिशवीची नेमकी जागा सापडल्याशिवाय समीर तिथून उठणार नाही, हेही ठाऊक आहे तिला.

गव्हाची पिशवी पुन्हा एकदा स्वच्छ पुसून तिच्यामध्ये गौरीने साडी ठेवली आणि ती जेवणाचं टेबल मांडायसाठी स्वैंपाकघरात गेली.

सुमारे अर्ध्या तासाने समीरला त्या लाल पिशवीसाठी योग्य जागा सापडली एकदाची. एका पूर्ण लाल पिशवीच्या आणि एका पूर्ण सोनेरी पिशवीच्या मधोमध. पैकी लाल पिशवी होती कला निकेतनच्या सेलची आणि सोनेरी पिशवी होती दुबई-एअरपोर्टच्या

ड्यूटी-फ्री दुकानाची. प्रत्येक पिशवीशी निगडीत त्या-त्या खरेदीच्या आठवणी.

अर्ध-अधिक कपाट पिशव्यांनी भरून गेलंय. प्रत्येक आकाराच्या, प्रत्येक रंगाच्या, निरनिराळ्या चित्रांच्या, निरनिराळ्या डिझाइन्सच्या, कोणी रुंद तळाच्या खूप सामान मावणाऱ्या, कोणी मधोमध हँडलवाल्या, तर कोणी दोन बाजूना सशाच्या कानांसारख्या हँडलवाल्या. अगदी मुलांना कसलंही चित्र काढून आणायला सांगितलं शाळेत बाईंनी, तरी समीरच्या पिशवी कलेक्शनमधल्या कुठल्याशा पिशवीवर मिळणारच ते चित्र. पण शोधाशोध करायसाठी कोणालाही त्या पिशव्यांची वासकावासक करायची मुभा नाही. कुठल्याही पिशवीला एखादी जरी चुणी आली तर समीरला अंगावरच चरा आल्यासारखं दु:ख होणार.

अनेक देश फिरलाय हा माणूस! अनेक देशांतून अनेक वस्तू आणल्यात. साड्या, खेळणी, कपडे, दागिने, बूट, घड्याळं, इलेक्ट्रॉनिक वस्तू. काय काय म्हणून आणलं, वापरलं, तुटलं, फुटलं, फाटलं, फेकलंही; पण प्रत्येक वस्तूची पिशवी मात्र जशीच्या जशी आहे कपाटात. अगदी दुकानातून आणताना होती त्याच स्वरूपात. उद्या समजा त्या दुकानवाल्याला आठवेनासं झालं की या-या साली आपली पिशवी कशी होती, तर समीरकडे यावं. टेबल लावता-लावता गौरीच्या डोक्यात पिशवी पुराणच चाललं होतं. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्येही नोंद होऊ शकते या पिशव्यांची आणि पिशवी बहाद्दराची.

आठ दिवसांत गौरीने साडीला फॉल-बीडींग करून घेतलं. नवीन कापड आणून ब्लाऊज शिवून घेतला. नेमकी लग्नाची ॲनिव्हर्सरीही रविवारी आलीय या वर्षी. म्हणजे ही साडी नेसून जाता येईल कुठे बाहेर. सकाळी छानसं गोडधोडाचं जेवण करू. संध्याकाळी फिरायला जाऊ आणि येताना बाहेर जेवूनच येऊ. मुलंही खूश होतील.

लग्नाच्या ॲनिव्हर्सरीला समीरने सकाळी आईस्क्रीमचं फॅमिली-पॅक आणलं. घराखाली नवीन दुकान उघडलं. आईस्क्रीमपण छानशा पिशवीत घालून दिलं दुकानदाराने, पण आईस्क्रीमच ते! थोडं विरघळलंच. थोडं पिशवीला आतून चिकटलंच. समीरने पिशवीतून आईस्क्रीम काढलं. मुलं आईस्क्रीम खायला आतूर, तर समीर पिशवी आतून साफ करायला आतूर.

गौरीनेच मग घाईघाईने चार बश्या-चमचे घेतले. आईस्क्रीम भरभर कापून बश्यांमध्ये घालून दिलं. समीरच्या हातून ती पिशवी हिसकावून घेणार होती. पण न जाणो, खेचता-बिचताना पिशवी फाटली-बिटली, तर ॲनिव्हर्सरीची भांडाभांड नको. आईस्क्रीम खातानाही समीरचं लक्ष पिशवीतच होतं. कधी एकदा आईस्क्रीम संपवतो आणि पिशवीची मरम्मत करतो.

आईस्क्रीम खाऊन झाल्यावर समीरने हलक्या हाताने एकदा ओला रुमाल, मग सुका रुमाल फिरवून पिशवी आतून स्वच्छ आणि सुकी केली. पंख्याखाली थोडा वेळ पोकळ करून ठेवली. मग घडी घालून जेव्हा पिशवी कपाटात ठेवली, तेव्हा कुठे समीर शांतावला.

संध्याकाळी गौरीने साडीची घडी मोडली. नवी पर्स, नवे सँडल्स, माफक प्रसाधन. समीरचं लक्ष पिशव्यांत, पर्सची पिशवी, सँडल्सच्या खोक्याची पिशवी, स्वत:च्या नव्या शर्टाची पिशवी, सगळ्या पिशव्या कपाटात सुरळीत, सुखरूप गेल्या तेव्हा कुठे समीर बाहेर पडायसाठी निघाला. मुलं ताटकळत होती. ''आई, बाबांना सांग ना लवकर चलायला.'' आई काय खाक सांगणार? आई स्वत:च वाट पाहतेय, बाबांचं आपल्या साडीकडे, आपल्याकडे

---

## जरा हसा!

### संकलक: सुहासिनी कीर्तिकर

### अजून काही घेणार का?

फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये पहिल्यांदा गेलेल्या एका माणसानं चहाची ऑर्डर दिली. वेटरनं गरम पाणी, टी-बॅग, साखर, दूध आणून त्याच्यासमोर ठेवले...

कसाबसा चहा प्याल्यावर वेटरनं विचारलं, ''अजून काही घेणार का?''

माणूस म्हणाला, ''भजी घ्यायची होती. पण राहू दे बाबा. तू कढई, तेल, बेसन, कांदे आणून ठेवशील.''

*

लक्ष आहे की नाही?

''समीर, अरे साडी पाहिलीस का कुठली नेसलेय ती?''

आता आठ दिवसांपूर्वीच घेतलेली साडी. पण समीरला कुठली आठवतेय?

''ही का तुला स्वातीच्या लग्नाची मावशीने दिलेली?''

मग मात्र गौरी भडकली. ''अरे गधड्या...'' मुलं समोर आहेत याचंही भान राहिलं नाही तिला. ''ही तूच ना रे आणलीस आठ दिवसांपूर्वी ॲनिव्हर्सरीची म्हणून? मला पिवळा रंग छान दिसतो म्हणून घेतली म्हणालास आणि मासे आणायला मग पुन्हा गेलास!'' समीरच्या चेहऱ्यावर आठवण झाल्याच्या खुणा दिसल्या.

''हां-हां आठवलं. त्या लाल रंगाच्या, सोनेरी वेलबुट्टीच्या पिशवीतून आणली ती का ही साडी?'' मग मात्र गौरीचा भडकाच उडाला. म्हणजे साडी आवडली म्हणून नव्हे. तर पिशवी आवडली म्हणून घेतली याने साडी? सकाळी पण नव्या दुकानाची पिशवी आवडली म्हणून घेतलं की काय याने आईस्क्रीम? गौरीच्या चेहऱ्यावरचे रंग पाहून समीरचं डोकं थोडं ठिकाणावर आलं.

''हां हां, मीच नाही का आणली गेल्या रविवारी ही साडी? छान दिसतेस हं का!''

''थांबा बाबा, आपण एक फोटो काढूया आपल्या सर्वांचा!'' अन्वयने कपाटातून कॅमेरा आणला. ''रोल घालायला हवा बाबा!''

''हो, परवा आणलाय मी नवा रोल. आईच्या खणात पुढे आहे बघ पिवळ्या पिशवीत. तसाच्या तसा आण पिशवीसकट.

अन्वयने रोलची पिशवी आणली. आतून रोल काढून कॅमेऱ्यात रोल घालायचा सोडून समीर पहिला पिशवी ठेवायसाठी आत गेला. तोच प्रोसेस. आधी पिशवी ताठ करणं, मग पिशवीची घडी घालणं. कपाट उघडून ती कुठे ठेवावी हा विचार करणं.

''समीरऽऽ'', ''बाबाऽऽ'', ''समीरऽऽ'' ''बाबाऽऽ'', बाहेरून हाका येताहेत. पण पुन्हा अशी छोटीशी, नाडीची हँडल्स असलेली पिशवी कुठे मिळणार?

इथे अन्वयने रोलसुद्धा घातला कॅमेऱ्यात, तेवढ्यात आला समीर. मग समोरच्या टीपॉयवर कॅमेरा ठेवून समीरने सगळ्यांना नीट जवळ-जवळ सोफ्यावर बसवलं. कॅमेऱ्याच्या डोळ्यातून नीट पाहिलं. वेळ लावला आणि येऊन बसला पटदिशी. कॅमेऱ्याने डोळा मिचकावल्यावर उठले सगळे आणि निघाले एकदाचे पिशवीवीर आणि कुटुंबीय लग्नाचा वाढदिवस साजरा करायला. सिनेमाची वेळ तर टळून गेली होती मग खरेदीच झाली. मुलांनी त्यांच्या आवडीच्या सीडी घेतल्या. समीरने गौरीसाठी छोटंसं सोनेरी घड्याळ घेतलं, तर गौरीने समीरसाठी किशोरच्या गाण्यांची एम. पी. थ्री.

''वो दो सीडी अलग - अलग थैली मे डालना! किसीको प्रेझेंट देनेका है!''

''बाबा, आम्ही आमच्यासाठी घेतल्यात ना त्या सीडी?''

''नहीं नहीं, डालना उन्हें अलग-अलग थैलीमें।''

दुकानाच्या बाहेर आल्यावर समीर म्हणाला, ''अरे, पिशव्या पाहिल्यात का किती छान आहेत? अशा प्रकारची एकही पिशवी नाहीये माझ्याकडे.''

गौरीसाठी घड्याळ घेतलं तेव्हाही छोट्या बॉक्सबरोबर समीरने पिशवीही मागून घेतली दुकानदाराकडून. ''थैली मे डालना भाई! ऐसे पकडेंगे कैसे हम?''

''अरे समीर, पर्समध्ये राहील माझ्या तो बॉक्स.''

''गौरी, मुलांचं एक जाऊ दे. पण तुलाही समजत नाही? बॉक्स, पिशवी सगळ्याचे पैसे घड्याळाच्या किमतीतून वसूल करतात ते. मग का सोडायची पिशवी? तीही इतकी छान!'' गौरीने मनातल्या मनात कपाळाला हात लावला.

जेवायला हॉटेलात गेले. प्रत्येकाने आपापल्या आवडीचा पदार्थ मागवला. जेवता-जेवता पोटं टम्म भरली. ''बाकीका खाना पार्सल करना! और हाँ, सबको अलग-अलग...'' आता मात्र गौरीची सहनशक्ती संपली.'' सब खाना अलग-अलग पॅक करके एकही थैली में डालके देना!'' गौरीने समीरला बोलूच दिलं नाही. एवढं छान हॉटेल. तिथून एवढ्या पिशव्यांमध्ये प्रत्येकी एकेक पदार्थ घेऊन जायचा? काय झालंय काय याला?

घरी गेले तेव्हा सगळेच पेंगुळले होते. घाईघाईने गौरीने सर्व पदार्थांची पॅकेटस् फ्रीजमध्ये ठेवली. कपडे

बदलले. मुलांनी शाळेची पुस्तक काढली का ते विचारलं. खरं तर मुलांना आपापल्या आवडीची सीडी पाहायची होती. पण उद्या सकाळची शाळा. मग गौरीने मुलांना समजावलं. समीरला मात्र एम.पी.थ्री. ऐकायची मुळीच घाई नव्हती. ती केव्हाही ऐकता येईल. पण पिशव्या आधी ठेवल्या पाहिजेत. दोन्ही सीडी त्याने एका पिशवीत ठेवल्या. एका सीडीची पिशवी रिकामी केली. एक घड्याळाची पिशवी, एक हॉटेलची जेवणाची पिशवी - ती पुन्हा स्वच्छ पुसून- त्या पिशव्यांच्या घड्या केल्या. कोणती पिशवी कुठे ठेवायची याबाबत निर्णय घेतले. पिशव्या कपाटात गेल्या. दिवे मालवले गेले. सारे आपापल्या बिछान्यात लवंडले. तेवढ्यात बेल वाजली.

शेजारचा निखिल! 'हॅपी ॲनिव्हर्सरी समीर' आहात कुठे संध्याकाळभर? मी तीनदा येऊन गेलो. कुलूप. आता शेवटचा चान्स घेतला. बरा भेटलास. हे तुमचं दोघांचं प्रेझेंट. निशीने दिलंय.'' आडवा बॉक्स वरून रंगीबेरंगी झगमगता कागद. त्यावर बांधलेली रिबन. बॉक्सवर ठेवलेला छोटासा दोनच फुलांचा बुके. ''घे'', ''नको'', ''घे'', ''नको'' करत एकदाचं घेतलं प्रेझेंट समीरने.

हा निखिल पण असा आहे. एवढी रिबन, रंगीत कागद, बरोबर बुके, सगळं हातात सावरत-सावरत आणायचं, तर चांगल्या पिशवीतून तरी आणायचं!

समीरने निखिलला आत बोलावलं. पिशवीविषयी विचारण्याचा त्याचा बेत होता. पण गौरीच्या कपाळाच्या आठ्या पाहून धीर होत नव्हता. तेवढ्यात पाठून निशी आली. मग गौरीने दोघांना फ्रूट-सॅलड खाऊ घातलं. पुन्हा-पुन्हा दोघांना शुभेच्छा देऊन निखल-निशी गेले! छान पिशवी नसल्यामुळे समीरला भेटवस्तू उघडून पाहण्यात अजिबात रस नव्हता. त्याला झोपण्याच्या तयारीत पाहून शेवटी गौरीनेच पुढे होऊन भेटवस्तूच्या वरचा कागद काढला. आत एक पुठ्ठ्याचा आडवा खोका. तो उघडला तर आतून एक छान गुलाबी ठिपक्यांची पांढऱ्या रंगाची प्लास्टिकची जाड पिशवी निघाली. पिशवीच्या सुळसुळ आवाजाने समीरचे डोळे उघडले. पिशवीच्या प्लास्टिकचा पोत अगदी मऊ आणि गुळगुळीत होता. हँडल्स फक्त गुलाबी रंगाची होती. गौरीने त्या पिशवीच्या आतून आणखी एक पिशवी काढली. त्या पिशवीच्या साऱ्या अंगभर काळे-पिवळे पट्टेच होते. मधोमध काळ्या अक्षरांनी लिहिलं होतं. 'खरेदीला चला' त्या काळ्या पिवळ्या पिशवीच्या आत सुंदर आकाशी पिशवी होती. पूर्ण चौरस आणि पिशवीवर पतंगासारख्या रेषा आखल्या होत्या. पिशवीच्या एका खालच्या टोकाला पतंगासारखा त्रिकोण आणि पुढे छोटीशी शेपटी. त्या पिशवीच्या आतून आणखी एक पिशवी काढली. त्या पिशवीच्या आत एक जुन्या काळच्या दगडी पाटीसारखी काळीभोर आडवी पिशवी होती. पिशवीच्या चारही बाजूंना लाकडी रंगाचे काठ होते. वरती दगडी पाटीसारखीच मधोमध हँडल्स आणि पिशवीच्या दोन्ही बाजूंना काळ्या पार्श्वभूमीवर गमभन आणि एबीसीडी लिहिलं होतं.

एव्हाना समीरची झोप साफ उडाली होती. निरनिराळ्या आकारांच्या, रंगांच्या, रुपाच्या, गुणांच्या पिशव्या एका पिशवीतून दुसरी, दुसरी आतून तिसरी अशा पिशव्यांमागून पिशव्या जादूगाराच्या पोतडीतून एकामागून एक वस्तू बाहेर पडावी तशा बाहेर पडत होत्या.

एका पिशवीवर फळांची चित्रं होती. एका बाजूला रंगीबेरंगी निरनिराळी फळं, तर दुसऱ्या बाजूला फळांची करंडी. करंडीच्या खालच्या बाजूला बशीत कापलेली फळं. आणि तळाला मोठ्या अक्षरात लिहिलं होतं 'बाय फ्रूटस्, इट फ्रूटस' फळांच्या पिशवीच्या आत फुलांच्या चित्रांची पिशवी. पिशवीवर निरनिराळ्या रंगाचे गुलाब. झोपायला गेलेली मुलंही एव्हाना आवाज ऐकून बाहेर आली. पिशव्यांचे ते

## जरा हसा!
### संकलक: सुहासिनी कीर्तिकर

डॉ. : बोला, काय झालंय्?
पेशंट : फार झोप येते हो.
डॉ. : कुठला मोबाईल वापरता?
पेशंट : नोकिया ११००
डॉ. : एक स्मार्ट मोबाईल लिहून देतो. त्यात जीओचे कार्ड घाला आणि फेसबुक, व्हॉटस्ॲप, युट्यूब इन्स्टॉल करून घ्या. लगेच बरे व्हाल.

*

## चिंतनिका
### संकलक: सुहासिनी कीर्तिकर

**वार**

रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार... प्रत्येक वारात कोणत्या ना कोणत्या देवाला आपण जरूर मानतो... पण एक वार अजून येतो; ज्याला सर्वांनी मानले तर संपूर्ण संसाराचे भले होईल. या वाराला म्हणतात परिवार.

*

अनेकविध प्रकार पाहून हरखली.'' ही फुलांची पिशवी मला.'' अन्वय म्हणाला. मग अनन्यालाही ती गमभन आणि एबीसीडीवाली पिशवीच हवी झाली.

इथे गौरीचं पिशवीतून पिशवी काढणं चालूच होतं. कुठून आणल्या होत्या निखिलने एवढ्या डिझायनर पिशव्या कोण जाणे! आता एक थेट साडीच्या घडीसारखी पिशवी निघाली. आणि तिच्या आतून एक थेट शर्टाच्या घडीसारखी पिशवी. समीर मुलांच्या हातांतून पिशव्या काढून घेण्यात गुंतला होता.

''मी तुम्हाला आणखी एकेक सीडी घेऊन देईन. पण पिशव्यांना हात लावू नका.'' आत एक छानशी मोदकाच्या आकाराची पिशवी होती. बटव्यासारखी वरच्या बाजूला अरुंद होत गेलेली. छोटीशी पांढरीशुभ्र पिशवी. वर छोटीशी हँडल्स. ही पिशवी इतकी छोटी होती की हिच्या आतून आणखी एखादी पिशवी निघणं असंभवच वाटत होतं. गौरीने पिशवीची हँडल्स बाजूला करून आत डोकावून पाहिलं. आतून एक छोटीशी डबी काढली. उघडली. आत एक छोटासा पांढऱ्या धातूचा सिंहासनावर बसलेला गणपती! त्याच्या डोळ्यांत, मुकुटावर, सिंहासनावर छोटे छोटे खडे बसवलेले. गौरी अनिमिष डोळ्यांनी गणपतीकडे पाहत राहिली. ''ए, पाहा रे, किती सुंदर!'' मुलंही गणपती पाहायला धावली. धावाला नाही तो एकटा समीर.

एखाद्या भिकाऱ्यापुढे आकाशातून नोटांचा पाऊस पडावा आणि भिकारी नोटा गोळा करायला धावावा, तसा समीर त्या पिशव्या पाहून वेडावला होता. कुठली पिशवी दुसऱ्या पिशवीपेक्षा अधिक सुंदर म्हणावी असा संभ्रमित झाला होता. या पिशव्यांपैकी कोणाला कुठे ठेवावं वगैरे चक्रं डोक्यात गरगरायला लागली होती.

''अरे समीर, हा गणपती बघ किती सुंदर!'' गौरीने गदागदा हलवल्यावर समीर पिशवीवाले माणसात आले. गणपतीच्या डबीच्या झाकणात एक कागद घडी करून बसवला होता. गौरीने कागद काढून उघडला. मोठ्याने वाचला -

प्रिय समीर, गौरी,

लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा! गौरी, तो गणपती तुझ्यासाठी आहे आणि समीर, त्या पिशव्या तुझ्यासाठी हे सांगायला नकोच. तो गणपतीबाप्पाच आता तुला त्या पिशव्यांच्या जंगलातून बाहेर पडायची बुद्धी देवो. पुन्हा एकदा शुभेच्छा.

निखिल, निशी.

मुलं टाळ्या वाजवून हसली. ''मस्त लिहिलंय नाही बाबा निखिल काकांनी?'' अन्वय म्हणाला. पण बाबा होते कुठे ऐकायला? मुलं गणपती पाहताहेत ही संधी साधून समीरने त्या सगळ्या पिशव्या गोळा केल्या आणि आतली खोली गाठली.

''हा गणपती आपल्या शोकेसमध्ये पुढेच ठेवूया. किती सुंदर आहे नाही?'' अनन्या म्हणाली. ''या गणपतीसाठी कंठी करायची असेल, तर किती छोटी कंठी करावी लागेल नाही आई?''

''चला आता झोपा. सकाळची शाळा आहे ना? चल समीर.'' गौरी मोठ्याने आतल्या खोलीच्या दिशेने पाहून ओरडून म्हणाली.

''मुलांना झोपू दे. तूही झोप. बराच उशीर झालाय.''

दिवसभराचं थकलं घर पाहता-पाहता झोपेच्या आधीन झालं. ''उद्या नवीन घड्याळ लावून जायचं ऑफीसला.'' गौरीच्या मनात झोपताना विचार होता. अन्वय अनन्याच्या मनातही शाळेतून आल्यावर नवीन सीडी लावण्याचे विचार होते. समीरच्या डोक्यात कोणते विचार होते न कळे. वरवर तर गाढ झोपल्यासारखा दिसत होता.

पहाटे दोन-तीन वाजले असतील. खुडबुड आवाजाने गौरीची झोप चाळवली. गॅलरीचं दार उघडं राहिलं की काय? उंदीर शिरला की काय घरात? गौरीने हळूच आवाजाचा कानोसा घेतला. उंदीर म्हटला की भीतीच वाटते तिला. तिने डोळे

किलकिले करून पाहिलं. खोलीत मंद निळा उजेड पसरला होता. रात्री झोपताना आपण हा छोटा दिवा बंद करायला विसरलो वाटतं. अशीच बिलं वाढतात विजेची. ''समीर, अरे दिवा बंद कर रे जरा.'' अर्धवट झोपेत गौरी पुटपुटली. दिव्याचं बटण कॉटच्या त्या बाजूला आहे. समीरने जरा हात पुढे केला की दिव्याच्या बटणाकडे पोहोचेल. गौरीला मात्र उठून कॉटला वळसा घालून त्या बाजूला जायला हवं.

''समीर, ए समीर,'' गौरीने पुन्हा डोळे किलकिले करून पाहिलं. समीर गादीवर नव्हताच. काय झालं? एवढ्या रात्री गेला कुठे हा? गेला असेल वॉशरुममध्ये. पुन्हा थोडी खुडबुड ऐकू आली. ''समीर, ए समी, उंदीर आल्यासारखा वाटतोय. बघ ना जरा.'' गौरीने पुन्हा एकदा डोळे किलकिले करून पाहिलं. अरे, अजूनपर्यंत हा झोपला नाही? करतोय काय इतका वेळ वॉशरूममध्ये?

मग मात्र गौरी उठूनच बसली. कपाटाचं दार सताड उघडं. चोर, नक्की चोरच शिरलाय घरात. हे देवा, आता काय करू मी? समीर कुठाय? त्याला काही केलं तर नाही ना चोराने? पलीकडच्या खोलीत मुलंही झोपलीत. गौरी उडालीच. नशीब, आपले हात पाय बांधलेले नाहीयेत. मंद निळ्या प्रकाशात तिने पुन्हा कपाटाकडे पाहिलं. सताड उघड्या कपाटाच्या पायाशी समीर बसला होता. एकेका पिशवीची नीट घडी करत. एकेका पिशवीसाठी योग्य जागा शोधत. गौरी बडबडेल म्हणून मघा त्याने झोपल्याचा अभिनय केला होता खरा. पण अभिनय करता करताही त्याला खरी झोप काही लागली नव्हती. गौरी गाढ झोपल्यावर मग त्याने उठून छोटा दिवा लावला होता आणि त्या अंधुक प्रकाशात पिशव्यांची मरम्मत करायला घेतली होती.

गौरी धडपडत उठून कपाटाकडे गेली. दबल्या आवाजात ओरडली, ''अरे, काय चाललंय काय तुझं?''

''बस. आता या शेवटच्या चारच पिशव्या.''

''अरे त्या चिठ्ठीत काय लिहिलंय निखिलने? समीर, समीर, अरे वेडा झालायस तू. मुलं पण हसतील आता तुला. ठेव ते. झोप आता. तुझ्या या पिशव्यांनी कपाटं भरलीत नुसती. चांगलं काही ठेवायला जागाच नाही उरलेली.''

गौरीने समीरला हलवलं. शेवटी शेवटची पिशवी ठेवूनच उठला समीर. पहाटे-पहाटे समीरने गौरीला हलवून उठवलं, ''हा निखिल किती वाजता निघतो गं ऑफीसला जायला?''

''काय झालं?''

''नाही, त्याला विचारलं असतं की या डिझायनर पिशव्या आणल्या कुठून? आज ऑफिसमधून जरा लवकर निघून जाईन मग तिथे. इतक्या मस्त पिशव्या! लवकर जायला हवं. नाहीतर मग संपून जातील.''

गौरीने झोपेतच कूस बदलली. डोक्यावर पांघरूण घेतलं. कानांवर हात ठेवले आणि झोपून गेली. उठली ती भयंकर स्वप्नाने. समीर रस्त्यात वेड्यासारखा फिरत होता. अंगावर पिशव्यांचेच कपडे, डोक्यावर पिशवीची टोपी, पायात पिशव्यांचे बूट; ओरडत होता.

'पिशव्या वाढा गे माय!''

*


**With Best Compliments from**

# A WELL WISHER

व्यक्तीचित्रण

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# शिवाजी डब्ल्यु एम्

✶ नंदकुमार कृष्णराव विजयकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

एम्टीएनएलचा फिक्स्ड लँडलाइनचा जमाना होता. घरात भली मोठी डिरेक्टरी असायची. नवीन प्रकशित झाली की जुनी बदलून आणावी लागत असे. सोबतीला आपली स्वत:ची एक छोटी डायरी असायची. त्यात आपले खास महत्त्वाचे फोननंबर लिहून ठेवलेले असायचे. आता हे सर्व इतिहासजमा झाले आहे. आता मोबाईल फोनचा जमाना आला आणि सर्व महत्त्वाच्या गोष्टींची नोंद यावर करता येऊ लागली. एक दोन जुन्या डायऱ्या अडगळीत पडल्या होत्या. अशा जुन्या गोष्टी मी सहसा फेकून देत नाही. राहू दे करून बऱ्याच जुन्या कागदांचा गठ्ठा साठून राहिला होता. पण या माझ्या सवयीमुळे मला पाहिजे ती जुनी डायरी मिळाली. जुनी डायरी शोधण्यासाठी तसंच एक कारण घडलं . माझ्याकडे जपानमेड एक वॉशिंग मशीन आहे. आहे म्हणजे गेली ४० वर्षे ते अव्याहतपणे आमचे कपडे धूत आहे. नवीन असताना दहा एक वर्ष या मशीनने विनातक्रार आमची सेवा केली. पण अचानक एक दिवस ते फिरायचं थांबलं आणि मग मला त्याच्या दुरुस्तीसाठी धावाधाव करावी लागली. घरातली दोन उपकरणं बंद पडली की आपलं धाबं दणाणतं. एक फ्रीझ आणि दुसरं वॉशिंग मशीन. त्यात वॉशिंग मशीन बिघडलं म्हणजे महासंकट. आजकाल घरकामवाल्या बायांनी कपडे धुण्याचे सोडून दिलं आहे. कपडे धुणे तर सोडा; पण दांडीवर कपडे वाळतसुद्धा टाकत नाही. पूर्वी आमच्याकडे रामागडी होता. धडाधड कपडे धुऊन दांडीवर वाळत टाकायचा. वाळत घातलेल्या कपड्यातून डोक्यावर टप टप पाणी गळायचं; पण बोलायची काही सोय नव्हती कारण काही बोललं तर स्वारी गावाला जाऊन बसायची. असो, तर प्रश्न होता बंद मशीनचा आणि जुन्या डायरीचा. यांचा एकमेकांशी काय संबंध असा प्रश्न पडला असेल. सांगतो. जेव्हा प्रथम मशीन बंद पडलं तेव्हा जवळच्या इलेक्ट्रॉनिक स्टोअरला फोन करून मेकॅनिकला पाठवण्याची विनंती केली.

विझिटचे ५०० रुपये आणि एखादा नवीन पार्ट बसवावा लागला तर त्याचे वेगळे पैसे द्यावे लागतील या बोलीवर सौदा झाला.

दुसऱ्या दिवशी रविवार होता.जेवण झाल्यावर थोडी वामकुक्षी करावी अशा बेतात होतो इतक्यात दरवाजावरची बेल वाजली. मी दरवाजा उघडला. एक ठेंगू माणूस उभा होता.

''काय पाहिजे?'' मी जरा त्रासूनच विचारलं.

''स्टोअरमधून आलोय.''

''कुठला स्टोअर? मी काही मागवलं नाही.''

''साहेब, वॉशिंग मशीनचा कॉल होता.''

''अरे हो, ये ये आत ये.''

मी त्याला मशीन दाखवलं . तो वॉशिंग मशीन समोर उभा राहून बराच वेळ ते न्याहळत होता. मशीनवरून हात फिरवला आणि परत स्तब्ध उभा. शेवटी मी त्याला विचारलं,

''काय, होईल ना मशीन दुरुस्त?''

''साहेब, फार छान मशीन आहे हे. एकदम मजबूत. आजकाल बाजारात नवीन नवीन मशीन येतात पण काय दम नाही त्यांच्यात..''

मोठा विचित्र माणूस दिसत होता. त्या बंद मशीनचं तो गुणगान करत होता.

मी त्याला पुन्हा विचारलं, ''काय होईल ना दुरुस्त? का नवीन मशीन आणावं लागेल?''

''थांबा बघतो मी.'' असं म्हणून त्याने हत्यारांची पोतडी उघडली.

अर्ध्या तासात त्याने मशीन चालू करून दिलं.

''साहेब, आता चिंता करू नका. पुढली ५/६ वर्षे बघायला नको, आणि हो, नवीन मशीन विकत आणायचा विचारदेखील करू नका,'' पुढे तो म्हणाला, ''साहेब, कधी जर गरज पडली तर मला फोन करा. स्टोअरला फोन करू नका. उगाच ते ४००/५०० रुपये विझिट फी लावतील त्यापेक्षा मला फोन करून बोलवा. मी स्वस्तात आणि खात्रीपूर्वक काम करून देईन.''

आता मात्र मी त्याच्याकडे कुतूहलाने पाहू लागलो. वामनमूर्ती, वर्णाने काळ्याची परिसीमा गाठलेली, तंबाखू पानाने दात ओठ रंगलेले, डोळे पिवळसर लाल आणि आवाज बारीक किरकिरा. त्याने त्याचं संपूर्ण नाव सांगितलं आणि फोन नंबर दिला. मला फक्त 'शिवाजी' एवढंच लक्षात राहिलं. मी माझ्या डायरीत 'शिवाजी डब्लू एम' अशी नोंद केली. 'डब्लू एम' म्हणजे वॉशिंग मशीन.

सेल फोन आले, पण त्यात शिवाजीचा फोन नंबर सेव्ह करायचं राहून गेलं. शिवाजीने हमी दिल्याप्रमाणे वॉशिंग मशीन ५/६ वर्षे व्यवस्थित चालू होतं; पण हळूहळू त्यातून काहीतरी विचित्र आवाज येऊ लागले. काहीतरी मोठा प्रॉब्लेम होण्याआधी शिवाजीला बोलवून घ्यावं म्हणून फोननंबर शोधू लागलो. अर्थात तो सेव्ह केलेला नव्हता तेव्हा जुनी डायरी शोधणं क्रमप्राप्त होतं. शिवाजी आला. ५ वर्षांनी पाहत होतो त्याला. त्याच्या रंगरूपात पाचपटीने फरक पडलेला जाणवला. म्हणजे उंचीने जास्त खुजा, रंग डाम्बरी आणि डोळे तोंड जास्त लालसर झालेले. पहिल्या भेटीत तो जसा मशीन समोर उभा राहिला तसा बराच वेळ तिकडे उभा राहिला. मशीनवरून तसाच हात फिरवला. म्हणाला,

''साहेब, छान मशीन आहे.''

''अरे, पण आतून कसलातरी आवाज येतो.''

''बघतो मी, घाबरू नका.''

बराचवेळ त्याची मशीनबरोबर झटापट चालली होती. काही वेळाने मशीन चालू झालं.

''किती झाले पैसे?'' मी त्याला विचारलं.

''काही देऊ नका.''

''म्हणजे?''

''अहो, छोटीशी स्प्रिंग बसवायची होती, माझ्याजवळ होती ती बसवली.''

''अरे, पण...''

## वात्रटिका

### तिजोरी

तळमजल्यावर घर त्याचं,
खणू लागला जमीन
बायको म्हणाली, ''चाललंय आता
हे काय बुवा नवीन?''
''व्याज नको पण मुद्दल आवर,''
म्हणतो, ''आलीय वेळ''
''बँकांमध्ये घोटाळ्यांचा
रंगलाय नवा खेळ''

**-डॉ. सुमन नवलकर**

''फक्त ५० रुपये द्या गाडीभाडं म्हणून.''

कमाल झाली या माणसाची. हा! एक मात्र आहे, मी बऱ्याच जणांकडे शिवाजीची शिफारस केली होती आणि सर्वांनी चांगला माणूस पाठवलास म्हणून माझे आभार मानले होते.तसा एकदा मी त्याला माझ्या एका मित्राकडे पाठवला होता; पण त्या मित्राचा मला फोन आला.

''अरे, तुझा तो माणूस येऊन गेला; पण तो फक्त टॉप लोडींग मशीन दुरुस्त करतो. माझ्याकडे टम्बल वॉश आहे.ते त्याला येत नाही.''

जाताना शिवाजी हमी देऊन गेला.

''साहेब, अजून १० वर्षे बघायला नको आणि काही झालं तर मी आहेच.''

मशीनची काही तक्रार नव्हती. पण एक गोष्ट मला जाणवली. अलीकडे त्या मशीनमधून काहीसा चिकट द्रव पदार्थ खाली फरशीवर ओघळत होता. हळूहळू हा प्रकार वाढतच गेला. मग मात्र मी शिवाजीला बोलवून घेतलं.

"साहेब एक छोटासा प्रॉब्लेम आहे. वरच्या कंट्रोल पँनेलमधला जेल आता जुना झालाय.''

''बरं मग?''

''तो पॅनेल काढून साफ करावा लागेल आणि मग नवीन जेल लावावा लागेल.''

''बापरे!''

''घाबरू नका. दोन दिवसात येतो. तोपर्यंत कळ सोसा आणि हो, नवीन मशीन घायचा विचारसुद्धा करू नका. येतो मी दोन दिवसात.''

बोलल्याप्रमाणे शिवाजी दोन दिवसांनी आला. मशीन सुरू केलं आणि म्हणाला,

''साहेब, बघा कसं फर्स्टकलास चालते. आता ५/६ वर्षे बघायला नको.''

दरवेळेला तो ५/६ वर्षाची गँरंटी द्यायचा. बऱ्याचवेळा मनात नवीन मशीन घायचा विचार यायचा आणि दरवेळी शिवाजी माझा हा विचार हाणून पडायचा. 'साहेब, तुमचं हे नॅशनलचं मशीन उत्तम आहे. मुख्य म्हणजे याची मोटर एकदम दणकट आहे. बाकीच्या गोष्टी आपल्याला बदलता येतात; पण एकदा का मोटर बिघडली का मग काही उपयोग नांही.' बरोबर होतं त्याचं म्हणणं . शिवाजी असताना कसलीच चिंता नव्हती. शिवाजी तसा विश्वासू आणि प्रामाणिक. कधीही त्याने अवाजवी पैसे मागितले नाहीत. पहिल्यांदा तो जेव्हा माझ्याकडे आला तेव्हा मी त्याला चहा घेणार का म्हणून विचारलं होतं.

''नको, फक्त फ्रीझमधलं थंड पाणी द्या.''

काहीही घायचा नाही. थंड पाणी मात्र आवर्जून मागायचा. शिवाजी अधूनमधून मला फोन करायचा. ''काय साहेब, मशीन चांगलं चालतं ना? काय असेल तर ताबडतोब फोन करा.'' हो, आठवण झाली, शिवाजीचा फोन नंबर अजूनही मी सेव्ह केला नव्हता. लगोलग मी ती जुनी डायरी काढली आणि नंबर सेव्ह केला. गंमत बघा, ज्यादिवशी मी नंबर सेव्ह केला त्याच्या दुसऱ्या दिवशी आमच्या मशीनने मोठे आकाडतांडव केले. भयंकर खडखडाट करून ते थंडगार पडलं. लगेच शिवाजीला फोन केला; पण काही केल्या लागेचना. चुकीचा नंबर तर नसेलना म्हणून मी ती जुनी डायरी शोधू लागलो तर ती काही केल्या सापडेना. या गडबडीत संबंध दिवस गेला. दुसऱ्या दिवशी डायरी सापडली, नंबर बरोबर होता; पण फोन कुणी उचलेच ना. तोही दिवस गेला . जीव मेटाकुटीला आला. दुपारी अचानक शिवाजीचा फोन आला.

''साहेब, फोन केला होता?''

''अरे, शिवाजी आहेस कुठे?''

''साहेब, थोडा गडबडीत होतो. उद्या सकाळी येतो.''

सकाळची दुपार झाली, दुपारची संध्याकाळ झाली. शिवाजीचा पत्ता नव्हता. रात्री ८ वाजता शिवाजी आला.

''सॉरी साहेब, खूप काम होतं. आता वरळीहून एक काम संपवून आलो. घरी डोंबिवलीला जाण्याआधी तुमच्याकडे आलो.''

शिवाजीने मशीन खोललं आणि म्हणाला, ''साहेब, याचा गिअर बॉक्स बदलावा लागेल. साधारण २/३ हजार रुपये लागतील. मार्केटमधून आणतो. परवा येतो.''

शिवाजी गेल्यावर सौ म्हणाली, ''अहो, आपण नवीन मशीन घेऊ या का?'' माझ्या मनात देखील तोच विचार चालू होता.

शिवाजी गिअर बॉक्स घेऊन आला. बरोबर एक तरुण मुलगा होता. तोदेखील त्याला कामात मदत करत होता. सुरवातीला त्याचा कोणीतरी मदतनीस असेल असं वाटलं . पण तो जेव्हा ''पपा, हे

## व्यंगचित्र



खोलायचं का?’ ‘पपा याचं काय करायचं?’ असं म्हणताना ऐकलं तेव्हा वाटलं हा शिवाजीचा मुलगा असावा.

‘‘शिवाजी, हा तुझा मुलगा का?’’

‘‘होय साहेब.’’

‘‘काय करतो हा?’’

‘‘परवाच आयटीआयचा रिझल्ट लागला. चांगल्या मार्कानि पास झाला.’’

‘‘अरेवा, अभिनंदन.’’

‘‘थँक यू सर.’’ मुलगा हसून म्हणाला.

‘‘मग आता काय करणार?’’

‘‘नोकरी करायची म्हणतो ,मिळेल तेव्हा मिळेल; पण आता रिकामा वेळ आहे तेव्हा मीच पपांना म्हणालो, मी येतो तुमच्याबरोबर.’’

‘‘वा: चांगलं आहे की.’’

मी त्याच्याकडे निरखून पाहिलं. चांगला उंच आणि रंगरूपानेही उजळ होता. शिवाजी आणि यांच्यात जमीनअस्मानाचा फरक होता.

शिवाजी मला म्हणाला, ‘‘साहेब, याचा ड्रम आतून काळा झालाय, शिवाय आत पावडरचा थर साठलाय. सगळं साफ करून देतो.’’

त्यादिवशी बापलेकाने आमचं मशीन आतून बाहेरून घासूनपुसून अगदी नव्यासारखं चकाचक करून दिलं . जाताना शिवाजी ५/६ वर्षाच्या गॅरंटीचं नूतनीकरण करून गेला.

‘शिवाजी म्हणतो धावा’ आणि आमचं मशीन सतत धावतच असते. जरा कुठे खुट्ट झालं तर खुद्द शिवाजी धावत येतो. रुकनेका कोई नाम नहीं चलना तेरा काम ही शिवाजीची ऑर्डर आहे. अलीकडेच माझ्या एका मित्राला शिवाजीचा नंबर हवा होता, मी तो त्याला दिला पण त्या मित्राचा मला फोन आला, ‘‘अरे, तो मेकॅनिक यायला तयार नाही .काम नाही करत असं म्हणतो.’’

मग मी शिवाजीला फोन केला तर शिवाजीने मला कळवलं, ‘‘सध्या फारशी कामं करत नाही, तब्येत ठीक नाही. पण तुमचं काही काम असेल तर सांगा. मी येतो.’’

‘‘अरे, मग तू तुझ्या मुलाला सांग. त्याला जमत असेल हे.’’

‘‘हो साहेब, तो करत होता ही कामं; पण आता तो दुबईला गेलाय. चांगली नोकरी आहे.’’

## वात्रटिका

### व्हॉटस्‌ॲपच्या तालावर

बस, ट्रेन, घरात, बाहेर
आपलं एकच छान,
नाही भूक, नाही तहान,
नाही वेळेचं भान
स्मार्टफोनवर झुकून-झुकून
दुखू लागलीय मान,
व्हॉटस्‌ॲपच्या तालावर
डुलतंय खानदान

**-डॉ. सुमन नवलकर**

घरात अनेक उपकरण बंद पडतात. आपण दुरुस्तीसाठी माणसं बोलावतो .मोठमोठ्या सर्व्हिस सेंटरमधून मेकॅनिक्स येतात. पण अनुभव फारसा चांगला नसतो. विझिट फी, सर्व्हिस चार्जेस, स्पेअर पार्ट अशा नावाने भारंभार बिल लावतात आणि कामाची गॅरंटी नाही. शिवाजीसारखा प्रामाणिक माणूस मिळणं विरळाच. शिवाजीने रात्रंदिवस काम करून आपल्या मुलाला शिकवलं, मुलगाही तसा हुशार. व्यवस्थित शिकला आणि चांगल्या नोकरीसाठी दुबईला गेला. शिवाजीला माझ्याबद्दल आपुलकी वाटत होती की त्या मशीनवर त्याचं प्रेम होतं, काही समजत नाही. एक मात्र खरं, घरी आला की प्रथम तो त्या मशीनवर मोठ्या मायेने हात फिरवायचा. शिवाजीने कधीही मला लुबाडलं नाही का चुकीचा सल्ला दिला नाही. त्याने आणि पर्यायाने वॉशिंग मशीनने आमची खूप सेवा केली. शिवाजीची तब्येत ठीक नसते. माझ्याकडे यायची त्याची तयारी होती; पण सध्यातरी त्याला बोलवायची गरज भासली नाही. त्याच्या अलिखित हमीपत्रानुसार आमचं मशीन बिनधास्त चालू आहे. भविष्यात शिवाजीला बोलवायची गरज भासेल का, शिवाजी येईल का, काही माहीत नाही. शिवाजीचा नंबर सेलफोनमध्ये बंदिस्त आहे. पण पहिलीवहिली नोंद केलेली ती जुनी डायरी अजूनही माझ्या संग्रहात आहे. हो, पहिली नोंद- शिवाजी डब्लू एम.

*

विनोदी लेख

# एक पाऊल पुढे

**✶ सुहासिनी कीर्तिकर ✶**

आपल्या सध्याच्या 'हिंदवी' देशात नवीन अभ्यासक्रम सुरू झालाय. बनारस विद्यापीठातर्फे 'आदर्श सून अभ्यासक्रम' सुरू झाल्याची घोषणा शिक्षक दिनाचे औचित्य साधून पाच सप्टेंबरला करण्यात आली. 'शिक्षक दिन' हा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्ताने होणारा राष्ट्रीय सण. डॉ. सर्वपल्ली हे भारतीय तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक. हिंदू तत्वज्ञानाचा आदर करीत त्यावर संशोधन करणारे, भाष्य करणारे. मनात आलं की या नवनूतन अभ्यासक्रमाचा त्यांनी कसा पाठपुरावा केला असता?

'यन्न भारते!... म्हणजे जे भारतात (- जगात) नाही ते 'न महाभारते' असा महाभारत काव्याचा दबदबा. राजकारण, समाजकारण, युद्धशास्त्र, मुत्सद्देगिरी, माणसामाणसातील नातेसंबंध, मानवी मनाचे दृश्यादृश्य कोपरे... महाभारताच्या कानाकोपऱ्यात दडलेले. खणलं की लागलंच हाताला काहीतरी! समजा, या महाकाव्याच्या काळात 'आदर्श सून' अभ्यासक्रम असता तर? अरे! काय प्रश्न आहे? त्यावेळी होताच नं तो! कारण पुन्हा 'यन्न भारते'...! पहा बरं एकेक सून. धृतराष्ट्र जन्मतः आंधळा. पण राजपुत्र. मग गांधार देशीची राजकन्या घातली त्याच्या गळ्यात. ती पडली आदर्श सून. नवरा आंधळा म्हणून तिने आयुष्यभर डोळ्यांवर पट्टी बांधली. (त्याच अवस्थेत तिला आपली शंभर मुलं झाली. नवऱ्याच्या दुबळेपणाकडे, मुलांच्या अरेरावीकडे तिने आपल्या 'आंधळ्या नजरेनेच पाहिलं) आदर्श सुनेचा पाठ गिरवला तिनं. तिची जाऊबाई कुंतीबाई. भारतीय सौंदर्याचा नमूना. पृथा, श्यामला अशा देहस्वीनी कुंतीची गाठ पंडुरोग झालेल्या पंडुराजाशी घातली गेली. तिनेही आपला 'आदर्श सुनेचा अभ्यासक्रम' केलेला असणार. म्हणून नवरा असला तरी 'घराणेशाही'साठी तिची सगळी मुलं तिच्या इच्छित पुरुषांपासूनच झाली. (एकतर लग्नाआधीच झालेला. असो, असो.) पण कुंती आदर्श सून ना! ती सगळी मुलं 'पांडव' म्हणूनच तिनं जगवली, वाढवली. आदर्श सुनेचा अभ्यासक्रम फक्त स्वतःपुरताच कसा बरे असेल? तिने ही परंपरा (आता इथे 'तिनेही' परंपरा हवे का? परंपरा म्हणजे आदर्श सुनेचीच हं!) आपल्या सुनेच्या ओटीत घातली. स्वयंवरात जिंकलं अर्जुनानं द्रौपदीला. पण कुंतीनं तिला 'भिक्षा' समजून पाच भावंडांत आपलं समसमान वाटून टाकलं. 'चार दिवस सासूचे...' तसे सुनेचे चार दिवस युधिष्ठिराचे, चार दिवस भीमाचे, मग आपल्या अर्जुनाचे. त्यानंतर मग 'वाट बघतोय' नकुल-सहदेव. बरं, त्यातही एकाच्या काळात औचित्यभंग झाला तर दुसरा नवरा होई परागंदा. आदर्श सून काय बोलणार? अर्जुन नाही का असाच (खांडववन जाळण्यासाठी अन् दुसरी बायको मिळविण्यासाठी) गेला. द्रौपदी आदर्श सून! काहीही बोलली नाही.

असं करता करता... अर्जुनालाच एकट्याला नव्हे; सर्व पांडवांनाच वनवास घडला. त्याचं कारण? द्यूतप्रसंग. त्यावेळीही द्रौपदीला युधिष्ठिराने आपली

मालमत्ता समजून डावावर लावली. आदर्श सुनेनं पत्नीधर्म पाळायचाच असतो. मग ती नवऱ्यांसोबत आपली 'द्रौपदीची थाळी' सवे घेऊन गेली. आदर्श सुनेनं काहीही झालं तरी सासरच्या सगळ्यांना खाऊपिऊ घातलंच पाहिजे. तिनं ते केलं. सासूबाईंना सांभाळलं. पांडवकुलाचा 'वन्हि चेतवत' ठेवला; आपले केस मोकळे सोडून.

महाभारतकालीन असे गांधारी, कुंती, द्रौपदीचे आदर्श आज आपल्यासमोर असताना 'आदर्श सून अभ्यासक्रम' हवाच कशाला? पहा नं; हल्ली सगळ्याजणीच आपला केशसंभार (कधी कधी 'विग'सह;) मोकळाच सोडतात ना? कुठला 'वन्हि' चेतवत ठेवतात त्या; कोण जाणे! द्रौपदीसारख्या 'एक वस्त्रा'ही असतात काहीजणी. 'नऊवार साडी, अर्धी मांडी उघडी' असायची पूर्वी. हे आजच्या 'आदर्श' ललनांना चांगलंच माहीत आहे. आजची ललनाच पुढं 'आदर्श सुनबीन' असते ना? कायद्यानं एकच नवरा आजच्या या बायका करतात. पण 'कॉर्पोरेट' जगताना या आदर्श सुनांना बाहेर 'मैत्र जीवाचे' जपावे लागतेच की. ताळे (बंद) एकाशी, चाळे दुसऱ्याशी! लग्नबिग्नही गरजेचे नाहीच तसे आजकाल. आजच्या सुनेसाठी आदर्श 'लिव्ह इन' रिलेशनही मान्यच आहे ना! मग हे 'रिलेशन' सांभाळणारी बाई (बाईच असते ना ती?) आदर्श सूनबीन बनणं कसं आदर्श अन् स्वप्नवतच. सासूबाईच नाहीत या संसारात; मग आदर्श सुनेचा अभ्यासक्रम कशाला हवा? म्हणूनच तर हल्ली 'मंगळागौरी'चे खेळ पडद्यावर आणि फक्त पडद्यासाठी खेळतात. 'अगं अगं सुने, काय म्हणता सासूबाई' असं म्हणत टाळ्या पिटत गोल गोल घुमणं पडद्यावरच छान वाटते बघा. पण प्रत्यक्षात सून 'काय म्हणता सासूबाई' म्हणायला घरात असतेच कुठं?

'आयत्या ताटावर, बसल्या पाटावर, तिथून चालल्या कचेरीला' असं एका गीतात वर्णन आहे ना? तेही मागं पडलं आजकाल. आयतं ताट नाही. पर्समध्ये लंचबॉक्स टाकला की झालं. आयता पाटही नाही. कारण पाट नावाची वस्तू आता फक्त गणपतीबाप्पाच वापरतो. हां! आजची आदर्श सून या पाटावरच्या गणपतीला 'उडता, नाचता' नमस्कार करते हं. मग मला प्रश्न असा पडतो की, अशावेळी आदर्श सून अभ्यासक्रम हवाच कशाला?

असा काय प्रश्न पडतो बाई मला? अहो, कागदावर अनेक अभ्यासक्रम असतात. त्यांची सर्टिफिकेटंही मिळतात. म्हणजे प्रमाणपत्र हो! पण ते काय आपण प्रत्यक्षात सगळं उतरवतो? प्रमाणपत्राचा, अभ्यासक्रमाचा रोजरोज जगताना काय संबंध? आता पहा हं - मराठी घेऊन एम. ए., पी.एच.डी. झालेली इला परवा मला म्हणाली, 'अगं, आता 'पुलं'ची जन्मशताब्दी आहे यावर्षी. केवढे मोठे कादंबरीकार होते ना ते! हां. 'सबकुछ पुलं' होते हे खरं. पण म्हणून कादंबरीकार? आता सांगा; काय उप्पेग त्या एम,पीएचडीचा. अभ्यासक्रमाचा? आदर्श सूनबाई अभ्यासक्रम असला तर असो बापडा. याच इलानं आपल्या सासूबाईंना वृद्धाश्रमात ठेवलंय. 'गार्बेज' घरात कशाला ना? पण म्हणत होती - 'मी दोन महिन्यातून एकदा फोन करते गं त्यांना. काय करणार? माझी जबाबदारीच आहे ना ती?' - येस्सस्. याला म्हणतात आदर्श सूनबाई! अशा आदर्श सूनबाईंचे आदर्श अभ्यासक्रमातही दिले असतील म्हणा. 'ऑन पेपर' काहीही हं! एकदा म्हणे; इलाच्या सासूबाई कर्त्यासवरत्या असताना त्यांनी इलाला सांगितलं होतं (म्हणे); 'इला, हे बघ. या घरात काहीही बदल करायचे नाहीत. हे काही तुझ्या आईचं घर नाही.' इला पडली आदर्श सुनबाई. तिनं पटकन् विचारलं, 'माझ्या आईचं नाही. पण तुमच्या आईचं आहे का हे घर?' - सवाल बिनतोड. मग पुढे मागे सासूला वृद्धाश्रमात पाठवून तिनं त्यांचं घरच बदलून टाकलं.

तर अशा इलासारख्या आदर्श सुनबाईसाठी सर्टिफिकेट नको का? हां! म्हणून हा आदर्श सून अभ्यासक्रम. या अभ्यासक्रमात 'महाभारतातील आदर्श सून' हे स्वतंत्र प्रकरण असेल. ''सासू-सून संबंध' हा प्रॅक्टिकलवर आधारित विभाग असेल.

‘आदर्श सुनेपुढील आजच्या समस्या’ नावाचा अनेक पळवाटा दाखविणारा चर्चात्मक सत्रभाग असेल. अगदी कीस काढत ‘आदर्श’ या शब्दाची व्याख्या असेल. ‘सूनसंकल्पना आणि श्वशुरसंबंध’ याविषयी मार्गदर्शन असेल... मुख्य म्हणजे आदर्श सून अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर प्रमाणपत्राचे वितरण भारतातील आजच्या आदर्श सूनेच्या हस्ते होईल. (अर्थात ‘आजची आदर्श सूनबाई’ ठरली की चॅनेलवाल्यांना तो विषय आठ दिवस पुरेल!)

एक मात्र निश्चित. आदर्श सून अभ्यासक्रम पूर्ण करून त्याचं प्रमाणपत्र मिळालं की पा. प्र. चॅरिटीज नक्की सन्मान करेल. प्रश्न फक्त एकच. बनारस हिंदू विद्यापीठानं सुरू केलेल्या या आदर्श सून अभ्यासक्रमात प्रवेश कुणाकुणाला मिळणार? आजीमाजी सुनांना? भावी सूनबाईना? की आदर्श सून संकल्पना समजून घेण्यासाठी समस्त ‘नरवर’ पुरुषजातीला? फक्त हिंदू ज्ञातीला? की कुणाही भारतीयाला?... अरे, अरे, अरे. एकच प्रश्न म्हणत त्यातूनच किती किती प्रश्न उभे ठाकले की. असे ‘विप्रश्न’ करणारे प्रश्न विचारून विद्यापीठाला कुणी सतावू नका हो. भारतीय परंपरा टिकवून ठेवायची तर हिंदू विद्यापीठानं असा अभ्यासक्रम ठेवावा; हे ‘हिंदवी’च आहे हो! एक पाऊल सदैव पुढे पुढेच टाकायचे असते ना? मग अशी पावलं मागे नाही खेचायही हां!

*

---



**जन्मशताब्दी (दि. २७ ऑक्टोबर, १९१८ ते २७ ऑक्टोबर, २०१८)**

कै. सौ. विमल माधव बाळाराम नायक यांच्या १००व्या जयंतीनिमित्त

त्यांना भावपूर्ण आदरांजली

**वृंदा शाम जयकर**

**सौ.रीटा व मंदार नायक** **सौ. सरिता व मयूर नायक**

**लेख**

# महाराष्ट्राचे चार गंधर्व

✶ **पं. सुजन राणे** (न्यू जर्सी) ✶

महाराष्ट्राला चार गंधर्व लाभले आणि त्यांनी महाराष्ट्राचं संगीत एवढं समृद्ध केलं की काही विचारू नका. महाराष्ट्राच्या आम जनतेला शास्त्रीय संगीताची नुसती गोडी लावली नाही; तर तिला शास्त्रीय संगीत शिकवलं. यात अतिशयोक्ती नाही. महाराष्ट्रात अब्दुल करीम खान, अल्लादिया खान, फय्याज खान, भास्करबुवा बखले, पलुस्कर, इचलकरंजीकर, वझे यांच्यासारखे अनेक नावाजलेले शास्त्रीय गवई गेल्या २००/३०० वर्षात होऊन गेले व ह्या सगळ्यांनी आपापली शिष्यपरंपरा निर्माण केली. त्या शिष्य परंपरेत भीमसेन जोशी, गंगुबाई हंगल, फिरोझ दस्तूर, बसवराज राजगुरू, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डीकर, मल्लिकार्जुन मन्सूर, विलायत हुस्सेन, लताफत हुस्सेन अशा पुष्कळ गवयांची नावं घेणं क्रमप्राप्त आहे. परंतु ही शिकवण मुख्यत: त्यांच्या शिष्यापुरती मर्यादित होती. म्हणजे,परंपरेनुसार त्यांचं शास्त्रीय ज्ञान फक्त त्यांच्या शिष्याना दिलं गेलं होतं, ते आमजनतेपर्यंत पोहचवलं गेलं नव्हतं. ते ऐतिहासिक कार्य या चार गंधर्वांनी केलं. महाराष्ट्रात गावोगावी नाटकं आणि संगीताचे जलसे करून, घरोघरी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण केली व कित्येक तरुणांना शास्त्रीय संगीत शिकायला प्रोत्साहित केलं असं म्हणावं लागेल. तेव्हा या चार गंधर्वांबद्दल हल्लीच्या तरुण पिढीला थोडक्यात माहिती असणं उपयुक्त ठरेल.

नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांचा जन्म नागोठणे, सातारा जिल्ह्यात २६ जून १८८८ साली झाला . त्यांचा विवाह लक्ष्मीबाईशी झाला होता; पण त्या १९४० साली दिवंगत झाल्यामुळे, कालांतराने बाल गंधर्वानी गोहरबाई कर्नाटकी नावाच्या नटीशी १९५१ साली लग्न केलं व ते तिच्याबरोबर १९६४ सालापर्यंत, तिच्या निधनापर्यंत राहत होते. बालगंधर्वाना लहानपणापासून अत्यंत गोड गळ्याची दैवी देणगी होती. त्यांना गाताना एकदा बाळ गंगाधर टिळकांनी ऐकलं व ते उद्‌गारले की, हा मुलगा 'बाल गंधर्व आहे' तेव्हापासून ती उपाधी त्यांना कायमची चिकटली. महाराष्ट्राच्या नाट्यसृष्टीतले ते पहिले गंधर्व होऊन गेले. त्यांचं श्रेष्ठत्व दोन गोष्टीमुळे नमूद केलं गेलं आहे. त्या काळी स्त्रिया मंचावर भूमिका करत नसत. कारण ते असामाजिक मानलं जात होतं. अशा परिस्थितीत, बाल गंधर्वांचं लोभस व्यक्तिमत्व व गोड गळा त्यांच्या कामी आला, स्त्री भूमिका करणारे ते पहिले कलाकार होते. तसंच महाराष्ट्राच्या आमजनतेला नाट्यसंगीत-द्वारा शास्त्रीय संगीताची गोडी लावणारे ते पहिले गायक होऊन गेले. भीमपलास, बागेश्री, काफी, पिलू, मालकंस व दरबारीसारखे परिचित राग लोकांच्यापुढे मांडून त्यांना अक्षरश: नाट्यसंगीताशी कायमचं बांधून टाकलं. जणु काय परिचित रागातून मराठी माणसांच्या मनावर शास्त्रीय संगीताचे धडे गिरवले. सौभद्र नाटकातील- व्यर्थ मी जन्मले थोर कुळी, वद जाऊ कुणाला शरण ग, अरसिक किती हा शेला. संशय कल्लोळ नाटकातील- संशय का मनी आला, मजवरी तयांचे प्रेम खरे. मूकनायक नाटकातील- उगीच का कांता गांजिता.

मानापमान नाटकातील- हा टकमक पाही, नयने लाजवीत, खरा तो प्रेमा ना धरी, नाही मी बोलत, मला मदन भासे व मी अधना. स्वयंवर नाटकातील- नाथ हा माझा, मम आत्मा गमला, सुजन कसा मन चोरी, स्वकुल तारकसुता, नरवर कृष्णा समान व अमृतची गोपाला. अनेक गायक ही गाणी त्यांच्या कार्यक्रमात अजून सादर करतात. जवळजवळ ३५ वर्ष (१९०५ ते १९४० ) हे कार्य बालगंधर्वानी चालू ठेवलं.

मराठी माणसाला नाट्यसंगीताचं वेड लावण्यात हा किती मोठा भाग!!! त्यांचं नाट्यसंगीत किती मोठं होतं यांचे दोन किस्से प्रसिद्ध आहेत. जयपूर घराण्याच्या

अल्लादिया खानना नाट्यसंगीत विशेष आवडत नव्हतं, पण शिष्यांच्या आग्रहानुसार ते एकदा बाल गंधर्वांचं नाटक पाहायला गेले. भीमपलास रागात 'निषाद' स्वर कोमल आहे; पण बाल गंधर्व कोमल व शुद्ध असे दोन्ही 'निषाद' मोठ्या खुबीने लावायचे. अशा एका प्रयोगाला अल्लादिया खान नाट्यगृहात हजर होते. गंधर्वानी भीमपलासमध्ये शुद्ध 'निषाद' लावल्यावर अल्लादिया खाननी अक्षरशः उभे राहून 'सुभान अल्ला' असे मोठ्याने उद्‌गार काढले. ही गंधर्वाना किंवा त्यांच्या नाट्यसंगीताला केवढी मोठी पावती होती. तसेच प्रसिद्ध तबलानवाझ अहमदजान तिरखवा व गंधर्वांचं काहीतरी बिनसल्यामुळे, तिरखवा गंधर्वाना साथ करायला तयार नव्हते. नेहमीप्रमाणे गंधर्व त्यांचं प्रसिद्ध नाट्यसंगीत सादर करत होते; पण गाणं रंगत नव्हतं, तिरखवा शेवटच्या रांगेत बसले होते, त्याना राहवेना, ते उठून सरळ स्टेजजवळ गेले व तिथल्या तबलजीला बोलले 'चलो हटो. ये तुमसे नहीं होगा.' तिरखवा वाजवायला बसले आणि लगेच गाण्याला रंग चढला. किती मोठा हा नाट्यसंगीत गाणारा आणि किती मोठा हा तबलानवाझ. १५ जुलै १९६७ साली त्यांच्या नाट्यसंगीतावर कायमचा पडदा पडला व नाट्यसंगीताचा हा महान बादशहा कालवश झाला. प्रसिद्ध लेखक ग. दि. माडगूळकर यानी कोठेतरी मार्मिकपणे म्हटले आहे, 'असा बालगंधर्व पुन्हा होणे नाही.'

रामचंद्र कुंदगोळकर सौंशी ऊर्फ सवाई गंधर्व हे महाराष्ट्राचे दुसरे गंधर्व होऊन गेले. त्यांचा जन्म कर्नाटकमध्ये धारवाडच्या जवळ कुंदगोळ गावी १९ जानेवारी १८८६ साली झाला. वडिलांनी त्यांना शालेय शिक्षण देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यांचा कल शाळेत जाण्यापेक्षा गाण्याकडे जास्त होता. शेवटी वडिलांचा नाईलाज होऊन त्यांनी छोट्या सवाईला बळवंतराव कोल्हटकरांच्याकडे तालमीला पाठवलं. बळवंतरावानी सवाईना धृपद, तराणे असे काही शास्त्रोक्त गाण्याचे प्रकार शिकवले व काही ताल पक्के करून घेतले. १८९८ साली बळवंतरावांचा मृत्यू झाल्यामुळे सवाईची तालीम अपूर्ण राहिली. एका अर्थी हा सुयोग होता, कारण छोटे सवाई हुबळीमध्ये नाटक पाहता पाहता, एकदा त्यांना किराणा घराण्याचे प्रसिद्ध गवई खांसाहेब अब्दुल करीम खान यांचं गाणं ऐकण्याची संधी चालून आली. कारण त्या काळात खानसाहेब कर्नाटकात पुष्कळ जलसे करत असत. ते सवाईंच्या वडिलांचे मालक रंगनगौडा नडीगार यांच्याकडे राहत असत. खानसाहेबांनी छोट्या सवाईना 'जमुना के तीर' ही त्यांची भैरवी रागातली प्रसिद्ध ठुमरी गुणगुणताना ऐकली. तेव्हा ते म्हणाले, ''कौन है ये लडका? गला अच्छा है.''

रंगनगौडानी संधी साधली व म्हणाले, ''ये हमारे यहा काम करनेवालेका लडका है.''

खासाहेब बोलले, ''ये बात है तो चलो हमारे साथ.''

ही घटना १९०१ साली घडली, पण खानसाहेब शिस्तप्रिय होते. त्यांनी सवाईना ८ वर्षांच्या करारात बांधून घेतलं. पण सवाईंचा कल नाट्यसंगीताकडे तेवढाच असल्यामुळे त्यांची तालीम अर्धवट राहिली. शास्त्रीय संगीताला इथे दुय्यम जागा मिळाली; पण नाट्यसंगीताला एक नवा गंधर्व प्राप्त झाला. त्यांनी प्रसिद्ध पेटीवादक व शास्त्रीय संगीताचे गाढे विद्वान गोविंदराव टेंबे यांच्या शिवराज नाटक मंडळीत पदार्पण केलं. बालगंधर्वांचे ते समकालीन होते व त्यांनी अनेक स्त्रीपात्रांच्या भूमिका केल्या. संबंध महाराष्ट्रात त्यांच्या भूमिका एवढ्या रंगल्या की, त्यांना शेवटी 'सवाई गंधर्व' ही उपाधी प्राप्त झाली. १९४२ साली वयाच्या ५६व्या वर्षी त्यांना अर्धांगवायूचा झटका आल्यामुळे त्यानी नाट्यसंगीताला रामराम ठोकून शास्त्रीय संगीत शिकवायला सुरुवात केली. या काळात त्यांनी गंगुबाई हंगल, फिरोझ दस्तूर व भीमसेन जोशी यासारखे निष्णात गवई तयार केले. हे शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात किती महान कार्य आहे हे सांगायला नको. परंतु या तिघा गायकांनी नाट्यगीतंसुद्धा तेवढ्याच तयारीने अनेकदा सादर केली आहेत. भीमसेन जोशींनी गोपालकृष्ण भोबेंच्या 'हे बंध रेशमाचे' ह्या नाटकातल्या गाण्यांना चाली दिल्या आहेत. सवाई गंधर्वांनी १९५२ साली जगाचा निरोप घेतला पण त्यांच्या पश्चात पं. भीमसेन जोशींनी पुण्याच्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवद्वारे त्यांची स्मृती जागृत ठेवली आहे.

महाराष्ट्रातले तिसरे गंधर्व सौदागर नागनाथ गोरे ऊर्फ छोटा गंधर्व होत. त्यांचा जन्म १८ मार्च १९१८ साली कोरेगाव, सातारा इथे झाला. अगदी लहान वयातसुद्धा त्यांच्या अवर्णीय गोड आवाजाने लोकांच्या मनाची लवकरच पकड घेतली. दामुअण्णा जोशी

यांच्या बालमोहन नाटक मंडळीत ते भूमिका करत असताना, ते त्याना आवडीने छोटा गंधर्व म्हणू लागले. त्यावेळी त्यांना प्रथम दत्तूबुवा बागलकोट, नंतर नरहरबुवा पाटणकर, सवाई गंधर्व, भुर्जीखाँ व पतियाळा घराण्याचे शेंडे खान यांच्याकडून शास्त्रीय संगीताची उत्तम तालीम लाभली. सुरुवातीला ते स्त्रीपात्रांच्या भूमिका करत होते; पण १९३४ पासून त्यांचा आवाज फुटल्याने ते पुरुषपात्रांच्या भूमिकेत चमकू लागले. प्रल्हाद केशव अत्रे या प्रसिद्ध नाटककारांच्या 'घराबाहेर (१९३४)', 'उद्याचा संसार (१९३६)' व 'लग्नाची बेडी (१९३६)' या नाटकात त्यांच्या भूमिका चांगल्याच रंगल्या. १९४०-४५ नंतर बालगंधर्वांचं गाणं जसं ओसरत चाललं तसं छोटा गंधर्वांचा नाट्यक्षेत्रात ठसा उमटायला लागला. ना. ग. जोशी लिखित 'देवमाणूस' हे त्यांचं नाटक विशेष गाजलं. कारण, त्यांनी स्वत: लिहिलेली गाणी 'दिलरुबा मधुर हा दिलाचा', 'चांद माझा हा हासरा', 'सुखवी तया संसारा' व 'छळी जिवा दैव गती' यांनी लोकप्रियतेचा जणुकाय कळस गाठला. ते इथे थांबले नाहीत, 'मानापमान', 'सौभद्र' 'मृच्छकटिक' व 'संशय कल्लोळ' या नाटकांत प्रमुख भूमिका करून मराठी रंगमंच १९४३ ते १९७८ गाजवला.

१९४९ साली त्यांची 'कलाविकास मंडळी' नाट्यसंस्था बंद पडली; पण त्यांनी १९५७ साली पुन्हा एकदा 'छोटा गंधर्व मंडळ' नावाने संस्था स्थापन करून 'विद्याहरण' व 'मृच्छकटिक' ही नाटके उभी केली. तसेच १९६० साली त्यांनी 'सुवर्णतुला' या नाटकाचं संगीत दिग्दर्शन केलं. पण ते इथेच थांबले नाहीत. त्यांनी 'रंगल्या रात्री अशा', 'पठ्ठे बापूराव' व 'पुढारी' बोलपटात पार्श्वगायन केलं. १९७८ साली त्यांनी रंगमंचाला कायमचा रामराम म्हटल्यानंतर शास्त्रीय संगीताला आपलं उर्वरित आयुष्य वाहिलं. त्यांनी काही राग तयार केले. या काळात भारत गायन समाज व बालगंधर्व रसिक मंडळ या संस्थांशी ते निगडीत होते. 'विष्णुदास भावे' (१९८०), 'संगीत नाटक अकादमी' व 'महाराष्ट्र गौरव' (१९९०) अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना भूषविलं होतं. बालगंधर्वांनंतर, अद्वितीय गोड गळ्याचे नाट्यगीत गाणारे हे संगीतरत्न १९९७ साली निखळून पडलं. नाट्यसंगीताच्या संदर्भात ६०व्या मराठी नाट्य सम्मेलनात अध्यक्षपदी त्यांचे उद्गार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. 'गाणं, मग ते नाटकातलं असो की कोणतही असो, ते गोडच असायला पाहिजे. जे गोड नाही ते गाणेच नाही. जशी साखर ही गोडच पाहिजे तरच तिला साखर ही संज्ञा प्राप्त होते. मुखाशी आणि कानाशी ज्या गोष्टींचा संबंध येतो त्या गोष्टी गोडच हव्यात.'

महाराष्ट्राचे चौथे गंधर्व कुमार गंधर्व होते. त्यांचा जन्म कर्नाटकात बेळगावी एका लिंगायत कुटुंबात ८ एप्रिल १९२४ साली जरी झाला तरी त्यांचं शास्त्रीय संगीताचं शिक्षण मुंबईत संगीततज्ज्ञ बी. आर. देवधर यांच्याकडे व नंतरची प्रसिद्धी महाराष्ट्रात झाली. त्यामुळे महाराष्ट्राचे ते चौथे लाडके गंधर्व म्हणायला हरकत नाही. त्यांचा विवाह भानुमतीशी १९४७ मध्ये झाला, पण कालांतराने त्यांना क्षयाने ग्रासलं, म्हणून प्रकृतीसाठी त्यांना इंदूरमध्ये देवास या ठिकाणी हलवण्यात आलं. १९५२ पर्यंत ते आजारातून उठले; पण या काळात त्यांनी शास्त्रीय संगीतावर बरंच चिंतन केलं. किंबहुना त्यांनी शास्त्रीय संगीताला एक निराळं अंग दिल, 'गांधी मल्हार' सारखे काही राग निर्माण केले. शास्त्रीय संगीताकडे त्यांनी त्यांच्या पिढीला अगदी अपारंपारिक नजरेने बघायला शिकवलं. त्यांचे गुरू देवधर व नावाजलेल्या गायिका मोगुबाई कुर्डीकर यांनी कुमारांच्या गायकीला आक्षेप घेतला होता. कदाचित कुमारांच्या प्रकृतीमुळे ते तुटकतुटक कमी श्वासाचे व पुन्हापुन्हा तीच ती वाक्य व शब्द त्यांच्या गाण्यात वापरायचे. त्यामुळे त्यांचं गाणं पुष्कळांना रुचायचं नाही व आक्षेपार्ह वाटायचं कारण ते परंपरेच्या विरुद्ध होतं. त्यांचं कार्य मराठी नाट्यसंगीताच्या क्षेत्रात मर्यादित होतं, पण ते लहानपणी बालगंधर्वांची हुबेहूब नक्कल करायचे व नंतरच्या आयुष्यात 'मला भावलेले बालगंधर्व' अशा काही नावाखाली कार्यक्रम सादर करायचे. त्यांनी भक्तिसंगीतात बरंच भरीव कार्य केलं असं म्हणावं लागेल. पण या लेखात त्याचा उल्लेख करणं उचित होणार नाही. कारण हा लेख नाट्यसंगीताबद्दल आहे. असो ते एक थोर गायक होते, त्यांचं निधन १२ जानेवारी १९९२ साली झालं. त्यांचं वाक्य सांगून हा लेख संपवतो. 'संगीतापासून होणारा आनंद हा उच्च कोटीचा आनंद आहे. तो तृप्ती आनंद आहे.तो आनंद फक्त आनंदच आहे अन्य काही नाही. आनंदाचे डोही आनंदतरंग. असा हा आनंद साक्षात ईश्वराचेच स्वरूप मानलेला आहे.' कुमार गंधर्व.

*

कथा

# नकोशी पोरगी

**✶ सुरेश नवलकर ✶**

''अहो, ऐकलत का आज ना मी मंदासोबत शॉपिंगला जाणार आहे. तिच्या डोहाळेजेवणाची खरेदी व आमंत्रणे करायची आहेत. आज आपण बाहेरच डीनर घेऊया. चालेल ना?'' संजीवनीने पतीला विचारले.

''अगं चालेल म्हणून काय विचारतेस? धावेल. आज चायनीजमध्ये जाऊ.'' शिवाजीराव गणवेश घालून जायच्याच तयारीत होते. त्यांच्या मनात विचार आला ही आपली पत्नी जिला मधुचंद्रातच झालेल्या अपघातामुळे स्वत:चे अपत्य होणार नसल्याचे कळूनही ती आपल्या नणंदेच्या होऊ घातलेल्या मुलाचे किती अगत्याने करीत आहे.

''ड्रायव्हर हरीला सांगितले आहे. तो तुम्हाला एमजी रोडच्या शॉपिंगसाठी घेऊन जाईल. टेक केअर. बाय.''

वहिनीसोबत शॉपिंग करायला मंदाला खूपच आवडत असे. डीएसपीची पत्नी असल्यामुळे दुकानदार तिला अगदी रेड कारपेट ट्रीटमेंट देत असत.

''वहिनी, अगदी मनपसंत शॉपिंग झाली. माझ्यासाठी ड्रेस घेऊन मी येते तोवर तू हरीला दुकानाबाहेर गाडी आणायला सांग व बाहेरच थांब. मला वेळ नाही लागणार. अगं, मी आधीच ठरवलंय काय घ्यायचं ते!''

संजीवनीने बाहेर येऊन हरीला मेसेज पाठवला व दुकानाचे नावही कळवले.

''एक्सक्युज मी मॅडम, प्लीज हेल्प मी. माय बेबी इज क्राईंग. हर मदर हॅज गॉन टू केमिस्ट शॉप ॲण्ड दी ट्राफिक पोलीस इज आफ्टर मी टू पार्क द कार प्रॉपरली. इफ यू टेक केअर ऑफ बेबी आय विल कम विथइन फ्यु मिनिटस् आफ्टर पार्किंग द कार.''

एक सुटाबुटातील गृहस्थ एक वर्षाच्या रडणाऱ्या मुलीला कडेवर घेऊन- संजीवनीला विनवणी करीत होता. लहान मुलं ही तिची दुखरी नस असल्यामुळे तिने लगेच त्या मुलीचा ताबा घेतला. तिचे सांत्वन करून रडणं थांबविण्याच्या गडबडीत तो गृहस्थ कुठे गेला हे तिने बघितलेच नाही.

''अगं वहिनी, हे काय; ही बेबी कुणाची?'' असं जेव्हा मंदा म्हणाली तेव्हा कुठे ती भानावर आली.

''तिचे बाबा गाडी पार्क करून येतात. ही रडत होती म्हणून माझ्याकडे दिली. आता बघ किती शांत झाली आहे आणि हसतेय पण बबडी छकुली!''

''अगं पण, हरी आलाय. हॉर्न वाजवतोय. हिचा बाबा कुठे आहे? आता काय करायचे?''

''थांब मी ह्यांना फोन करते. अर्धा तास होऊन गेला तरी ह्यांचा पत्ता नाही'' असे म्हणत तिने पतीला फोन करून सर्व कहाणी ऐकवली.

''संजू, घाबरू नकोस. मी इन्स्पे. सर्जेरावला पाठवीत आहे, तो सर्व परिस्थिती सांभाळेल.''

थोड्याच वेळात मोटारसायकलवरून रुबाबदार इन्स्पे. सर्जेरावचे आगमन झाले. सोबत आलेल्या स्केच आर्टिस्टच्या सहाय्याने त्या गृहस्थाचे स्केच तयार करण्यात आले. त्याच्या आधारे सर्व दुकानांतून विचारपूस करण्यात आली. वाहतूक पोलीसालासुद्धा विचारले. पण तो गृहस्थ जणु काही अदृश्यच झाला होता.

५ जुलै १९९० रोजी रीतसर एफआयआर करण्यात आला. बेबीचे वय १ वर्षाच्या आतील असल्यामुळे तिची कस्टडी पालक मिळेपर्यंत संजीवनीबाईंकडे रहावी अशी कोर्टाची ऑर्डर घेण्यात आली. अर्थात शिवाजीरावांच्या संमतीमुळे हे सहजासहजी साध्य झाले.

५ जुलै १९९१ पर्यंत मुलीचे पालक शोधण्यात यश न मिळाल्यामुळे पोलिसांनी एफआयआर क्लोज करून टाकली आणि त्या मुलीला दत्तक घेऊन शिवाजीराव व संजीवनी ह्यांनी तिला आपल्या मुलीचा दर्जा दिला. समारंभपूर्वक तिचे बारसे करून तिला दामिनी असे नाव दिले. जन्मदात्याने मुलगी नको म्हणून त्याग केलेली मुलगी अशा रितीने लाडाकोडात वाढू लागली.

लाडावलेली असली तरी दामिनी अभ्यासात आणि खेळातही चमकत होती. आबासाहेबांप्रमाणे पोलीस होण्याची तिने इच्छा केली आणि आयपीएस परीक्षा देऊन पोलीस दलातही सामील झाली. अर्थात आबासाहेब (शिवाजीराव) आणि माई (संजीवनी) हे तिचे जन्मदाते आईवडील नाहीत हे गुपित तिच्यापासून लपवून ठेवण्यात आले होते. परंतु अशी एक घटना घडली की सत्य अचानक तिच्यासमोर उघड झाले.

झाले असे की, दुबईहून मुंबईस येणाऱ्या विमानाला बॉम्बस्फोटाने उडविण्यात आले. दुर्दैवाने त्यात शिवाजीराव होते. जळलेल्या मृतदेहाची ओळख पटण्यासाठी नातलगांची डीएनए चाचणी करण्यात आली. मंदाआत्याचे डीएनए एका देहाशी जुळले, परंतु दामिनीचे जुळले नाहीत. त्यावेळी प्रथमच माईनी तिला सांगितले की, ती त्यांची दत्तक मुलगी होती. दत्तक विधान आणि एफआयआरची जुनी फाईलसुद्धा तिला दाखविली. त्यातील तिच्या खऱ्या जन्मदात्याचे स्केच पाहिल्यानंतर त्यांना शोधून काढण्याचा आणि शिक्षासुद्धा करण्याचा तिने पण केला.

कामानिमित्त कोल्हापूरच्या पाटील कुटुंबाशी दामिनीचा संबंध आला. विनय पाटीलसोबत तिचे सूत जमले आणि माईच्या संमतीने लवकरच तिने त्याच्याशी विवाह केला. लग्नानंतर प्रमोशन मिळून दामिनीची पुण्याला डीएसपी म्हणून नेमणूक झाली.

विनय पुण्याच्या टाटा मोटर्समध्ये एचआरए मॅनपॉवर ह्या पदावर असल्यामुळे पुण्यातच स्थायिक होता.

आता दोघांचा संसार पुण्यनगरीत सुरू झाला.

''अगं डॉमी,'' लाडात आला की विनय दामिनीला ह्या नावाने संबोधित असे, ''आज संध्याकाळी आपल्याला अनीलच्या साखरपुडा पार्टीला जायचे आहे. ठाऊक आहे ना?'' विनयचा परममित्र अनीलची आणि दामिनीची चांगलीच मैत्री होती. अनीलच्या वडिलांचा इंपोर्ट-एक्सपोर्टचा व्यवसाय होता. अनील पुण्याचे ऑफीस सांभाळायचा तर वडील आणि आई दुबईत राहून तेथील ऑफीस सांभाळायचे. होणारी वधू रश्मी दामिनीच्या कॉलेजची कॉलेज सुंदरी म्हणून तिला चांगलीच माहीत होती. अनीलच्या आईवडिलांना मात्र तिने बघितले नव्हते.

''काय रे, आज त्यांच्या आई-बाबांना भेटण्याचा योग दिसतोय नाही का? अनीलला भाऊबहीण आहेत का रे?''

''नाही गं, एकुलता एक म्हणून तुझ्यासारखाच लाडावलेला आहे आमचा अनु!''

''वा रे वा, लाडावलेली मुलगी डीएसपी होते का?''

''बरं बुवा आमची डॉमी हुषारच आहे!''

''दामिनी, हे माझे पप्पा आणि ही आई!'' अनीलने दामिनीची ओळख करून दिली.

''ह्या माझ्या दोस्ताला विनयला तुम्ही ओळखताच. त्याची ही बायको. डीएसपी आहे.''

पप्पा आणि आई ह्यावर काय बोलले हे तिच्या लक्षातच आले नाही कारण पप्पा बघताच तिला प्रचंड धक्का बसला होता. ज्या जन्मादात्याचे स्केच तिच्या पोलिसी डोक्यात ठासून बसले होते तीच व्यक्ती आज अचानक तिच्यासमोर उभी होती. वयोमानाप्रमाणे बदल जाणवत होता. सफेद केस, जाडा चेहरा, चष्मा वगैरे. शामराव दांडेकर तिचा पिता होता.

मोठ्या थाटात अनीलचा विवाह साजरा होत होता. हजारो माणसे जमा झाली होती. रोषणाई लाजवाब. खास पार्किंगची सोय. आतील एका कक्षात खाजगी पार्टी रंगात आली होती. शामरावांचे विमान खूपच उंचावर पोहोचले होते. त्यांच्या ग्रुपमधल्या नामदेव नावाच्या मित्राला हिणवणे चालू होते.

''नाम्या, तू काय मर्द आहेस? सात पोरींना जन्म दिलास! अरे, पापी माणसांनाच पोरी होतात. माझ्याकडे बघ. आमच्या घराण्यात गेल्या शंभर वर्षात पोरगी नाही जन्मली. आम्ही खरे मर्द. काय?''

इतक्यात पोलीस गणवेषात आलेल्या दामिनीने त्यांना अडवले. ''थांबा. शामराव मला तुमच्याशी बोलायचं आहे खाजगीत.''

''कोण दामिनी? आणि लग्नाला ह्या गणवेषात?''

''अहो, मला तुमच्याशी खाजगीत बोलायचे

आहे.''

''अगं, हे सर्व माझे खाजगीतलेच आहेत. तू बिनधास्त बोल.''

''बरं, तशी तुमची मर्जी असेल तर ठीक. ५ जुलै १९९० रोजी तुम्ही पुण्याच्या एम.जी. रोडवर गेला होतात का?''

''तू काय थट्टा करतेयस? एव्हढं मागचं आठवेल का कुणाला? तुम्हीच सांगा हो मित्रांनो.''

''मी सांगते. पुण्याच्या एमजी रोडवर त्या दिवशी हातातल्या रडणाऱ्या तान्ह्या मुलीला एका तिऱ्हाईत बाईच्या हाती देऊन, जरा सांभाळ। गाडी पार्क करून आता येतो, असे सांगून तुम्ही तेथून पसार झाला होता.''

''ही काय भाकडकथा सांगते.''

''गेल्या शंभर वर्षात तुमच्या घराण्यात पोरगी जन्मली नाही त्याचे कारण तुम्ही त्यांना जन्मण्यापूर्वी किंवा जन्मल्यानंतर शिताफीने मारलेत किंवा फेकून दिले. हीच तुमची मर्दानगी! आणि हो त्यादिवशी तुम्हाला नकोशी असलेली पोरगी मी होते. अशा किती पोरींची विल्हेवाट लावलीत ते सांगायला तुम्हाला माझ्यासोबत पोलीस स्टेशनवर यावे लागेल. चला.''

''मला माझ्या वकीलाशी बोलायचे आहे.''

''खुशाल बोला. तोवर मी माझ्या आईला भेटून येते. ती तुमच्याविरूद्ध कोर्टात साक्ष देणार आहे.''

*

**लेख**

# नशा

## ★ शैलेश विजयकर ★

नशेला कधी जात, धर्म, गोत्र असतं कां? असतो फक्त रंग, जसा चढतो तसाच उतरतो. नशा फारच विचित्र असते. कारण कोणाला पैशाची, कोणाला जुगाराची, कुणाला बाईची तर कोणास दारुची.

काय गंमत आहे ना! ह्या खेरीज गंमतीदार नशा गाडी वेगात पळवायची, मुली फिरवायच्या तर कोणास काही नसताना हाय फाय गिरी करीत माय बापाच्या पैशावरती. नशेला कधी जात धर्म गोत्र असतं कां?

नशेत भेदभाव, फरक, रंग असायलाच हवेत नां, त्या शिवाय नशाच कसली ती, नशेची मजाच काय? आम्ही मात्र त्यातले नाही हो बुवा! सिगारेट ओढत होतो पण ती सोडली. नशा आहे फक्त तीची अर्थातच बाटलीची. बाटलीत असलेलीची ओळख ती काय हो, जशी रमा रमी रम ऊतार देती सारा गम ब्रांडी पळवते थंडी, कविला लिहीण्यास साथ देते व्हीस्की नेते त्याला भ्रमात, डोळ्यासमोर आणते सिन तीच तर महा वोडका आणि जीन! नशेला कधी जात धर्म गोत्र असते कां?

ह्याला चढली त्याला चढली. चढली का? काही कळेना

दुसऱ्या दिवशी विचारता, काल काय घडले तेही सांगता येईना.

बायकोचा ओरडा, मुलाची बडबड कान माझे पिकले.

तरीही दुसऱ्या दिवशी ग्लास घेऊन बसले. पुरानी यादे, पुराने गीत, मेरे दिल से हे का? मग सांगा नशेला कधी जात धर्म गोत्र असेल का?

*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Social Media & Us

## ✶ Milind Kothare ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

These days the moment you browse your face book account your notification is flooded with various posts from Pathare Prabhu Foodies our own community group which has three thousand two hundred members. I don't think any other formal informal community related groups interact so voluntarily & passionately with each other & that too in such large number. Well that's the strength of social media.

What it does is it brings in the community population closer on one platform & remain connected with each other's food events at list say for example someone cooking a fancy Ghada in the U S winter shares with all the folks here on the group like in olden days a small portion use to be sampled out to the neighbours similarly someone cooking authentic Shewandi or a Kata recipe displays with great pride & ends up getting about hundreds s of likes from PPs all over the globe.

This is then followed with a warm request by many for recipe as quite a few authentic recipes have remind with a few but with this we are reviving two things.

I have myself punched likes on yummy mouth watering food pics posted on the group by members who are otherwise unknown to me.

**Wealth of our recipe**

Our bonding  Pathre Prabhu members with such rich linage of exotic culinary display makes me really proud as a community member  with rich cultural heritage.

Look at the larger Picture-

**We Have Revived The Lost Connection**

About six decades ago the community population was concentrated around Thakurdwar & then the overall economic strata of the community was much lower than today but there was a community bonding & people helped each other on all walks of like may it a help in emergency or referring to a jobs in two or three organisations where our community had a upper hand.

Today the scenario has changed the community has progressed in the economic strata but at the same time it is dispersed all over the place so the connect which was there had vanished.

Hence I was very pleased to see three thousand four hundred members of the community connecting on the social media platform voluntarily & actively connecting on this platform.

Which reconnects the bonding so it's a very good development of technology getting together.

What we can achieve out of this?

Hence my appeal to the young members & professionals similar group can be formed on Linkdin where professionals from various expertise we have experts seniors in various fields as well students making career in the same subject be connected through the Linkdin group & be bonded as well as share benefit of knowledge experience opportunities with each other.

Look forward for active response from the readers.

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# LIFE AT SEA

## ✶ SUDEEP NARAYAN KOTHARE ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Hello readers!!! Good day to you all!

First and the foremost, I would like to thank the Editors and Board of Trustees of the Prabhu Tarun for giving me this opportunity to pen down before you my experiences of 42 years of Sea Service and present the harsh realities faced by a seafarer and his family!

Yes, it gives great visual delight to the viewer to see the smart uniform being donned and hear about the handsome earnings in dollars. But to earn that, a common man may not realize the hardships faced by us seafarers and the sacrifices we must make to sport that smart uniform, earn and travel around the world.

Well, I joined The Shipping Corporation of India way back in May 1974 as a Trainee Marine Engineer and was subsequently posted as a Jr. Engr (Fifth Engineer Officer) on the MT JAWAHARLAL NEHRU, a one lakh ton cargo carrying capacity tanker which in those days was the biggest ship in the Indian fleet owned by The SCI Ltd.

This tanker was converted into a bulk carrier in Japan and we proceeded to the USA to load grain (wheat) for India. On our outward passage, we were without cargo (on Ballast) and crossed the Pacific to reach Portland, USA. We loaded 90, 000 tons of wheat from three different ports in the USA, Portland, Seattle and Tacoma and sailed back for India.

Now, we were fully loaded and hardly had any freeboard (the distance in terms of height between the main deck and the sea level).As we were crossing the Pacific, the same Pacific Ocean which was like a lake, on our outward voyage had turned into a deadly monster raging with waves rising up to the bridge(navigation deck) at a height of almost 70 feet and the main deck almost submerged under water with the waves crossing from one end to the other.

A very scary scene indeed. When our Captain realized that we were heading into a storm, we tried to turn the vessel 360 degrees, so that we don’t head into it and the storm passes from the rear end of the vessel (Aft). By then, it was too late, and can you imagine a huge

1 lakh tonner with a 22,700 BHP (HORSE POWER) engine, making -2 knots! Not moving forward at all but being pushed back. These are trying times for us engineers as we must ensure that the engines don't stop. Quite many ships have gone down because of engines failures. So, we had to keep the stand-by generator running as well as all the other stand-by machinery in readiness and be very vigilant in the engine room. We were being tossed and turned with heavy rolling and pitching. For 3 days, our cooks could cook

nothing being difficult to place utensils on the hot plate. Thus, we had to survive only on dry provisions like bread, butter, jam, biscuits etc. We literally earned our bread and butter!!!! Don't you think so? Well, the climax was on the second night. After my duty hours had finished at midnight, I was relaxing in my cabin, when suddenly, there was a lot of commotion in the alleyway. I saw one of the crew members running towards the bridge with a

life jacket and shouting "JAHAJ PHAT GAYA". The Emergency Stations alarm was sounded. Can you imagine our state of mind???!!!! We all ran down to the crew accommodation and were shocked to see the alleyway full of sea water and pouring endlessly in from the steering gear compartment.

This is when I learnt how to keep cool and handle such emergency situations from my Chief Engineer Mr.A. K Singh and Captain T.S. Khara. This very combination of KHARA-SINGH saved our vessel. The hatch cover on top of the steering gear compartment had opened due to heavy vibrations caused by rolling and pitching and sea water waves were just gushing in. Someone needed to go up on the deck and shut the flap. Our Chief Engineer himself tied a life line and with the help of another crew member went up on the deck. In those furious conditions, he managed to shut the hatch cover and arrest the gushing sea water and thus saved our lives. Those days there was no Internet, no WhatsApp, no satellite phones. The only communication was by means of radio by Morse Code and we had lost contact with land for 3 days. Our ship the MT. JAWAHARLAL NEHRU was reported missing. It was only after the storm had subsided, we could establish contact again. Since our ship was fully loaded with such powerful engines, we survived and of course salutes to the efficient handling by the Chief Engineer and the Master.

This experience on my very first voyage transformed me into a different person. I learnt a lot from my seniors on handling such trying situations which were later useful to me when became a Sr. Engineer.

With this first experience, I sign-off here and Wish all the readers A VERY HAPPY DIWALI, PEACEFUL, HEALTHY AND PROSPEROUS NEW YEAR!!!

Good- Bye!

*

**कविता**

## खोटारडा देव

देवा, तू खोटारडा आहेस
हे कबूल करशील ना रे?
मानवाच्या भावविश्वाची अशी
फारकत करतोस का रे?
चौऱ्याऐंशी दशलक्ष योनींमधूनी
भ्रमण केले या मानवाने
मोक्षप्राप्ती होता त्यासी तो
क्षणिक सुखावे तव स्वर्गस्थाने
मानवी जन्माचे अमिष तेव्हा
तू त्या निरागस आत्म्यास दाखविलेस
सुखाच्या मृगजळी जंजाळात
त्याला तू फसविलेस
स्वतः मात्र मेनका उर्वशीच्या
नृत्यात तू रंगलास
मानव मात्र कर्म - जबाबदारीच्या
जोखडात पूर्ण अडकला
आस्थेने आज हा मानव
तुझ्या देवळात घंटानाद करतो
तू मात्र पूर - दुःष्काळाने
त्याचा पूर्ण भ्रमनिरास करतोस
ऐहिक सुखाच्या क्षणिक मोहात
या वासनामयी जीवाला तू गुंतविलेस
परी वास्तव दुःखाची जाणीव त्यास होता
शरीर त्याचे गलितगात्र झाले.
म्हणूनच आता हा आरोप
या मानवाचा तुझ्यावर आहे
आता तरी तू कबूल कर ना
की, देवा, तू खोटारडा आहेस.

**-हेमंत विनायकराव तळपदे**

*

लेख

# एक स्पंदन

✶ रसिक विजयकर ✶

प्रिय वाचक,

**''कोर्ट आता पुढील निर्णय देणार आहे, मकर संक्रांतीत २० फुटापेक्षा जास्त उंच पतंग उडवू नये. त्यामुळे विमानाच्या जीवाला धोका आहे''** हा संदेश तुमच्या नजरेखालून आतापर्यंत गेलाच असेल. ह्यातील गमतीचा भाग सोडल्यास एक नक्की की २० फुटापेक्षा जास्त उंच दहीहंडीला मनाई करणारा आदेश न्यायालयाने काढला म्हणून त्याला अनुसरून नाराजीने हा संदेश कोणीतरी प्रसारित केला आहे.

आठ थर लावून हंडी फोडावयाची, त्यानंतर कोणीतरी नऊ थर लावून विक्रम करावयाचा व त्यातला थरार अनुभवायचा. अर्थात त्यापाठी गोविंदाची कठोर परिश्रम, अथक मेहनत आहे, चिकाटी आहे हे मान्य केलेच पाहिजे. पण हंडीभोवती कोटीकोटीचे प्रलोभन आल्यानंतर हंडीची उंची वाढत चालली. 'स्काय इज द लिमिट'प्रमाणे गोविंदांची जोखीम घ्यावयाची तयारी असते. पण रेकॉर्ड ब्रेक करण्याच्या हव्यासापायी कित्येक तरुणांचे हात, पाय 'ब्रेक' झाले आहेत, हे पण ध्यानात ठेवले पाहिजे. काही ठिकाणी तर लहान मुलाला हंडी फोडायला वरती पाठवतात, जरी त्याने शिरस्त्राण व इतर संरक्षक आवरणं घातली असली तरी ते जोखमीचे वाटते. गोविदाचा मनोरा कोसळताना वरील थरावर असणाऱ्या त्या लहान मुलाला खाली पडताना पाहून आपल्या ह्दयाचा ठोका चुकतो. ह्याला जर थरार असे म्हणत असतील तर म्हणो बापडे!

हल्ली रस्ते अडवून गणेशउत्सव साजरा करावयाची फ्याशानच झाली आहे! स्थानिक राजकीय वरदहस्त असताना कोणाची काय बिशाद! काही ठिकाणी दहा दिवस तो रस्ता रहदारीला बंद. तेथील रहिवाशांना काय त्रास होतो ह्याची आम्ही का चिंता बाळगावी? उद्या तेथील रहिवाशी आजारी पडला आणि त्याला अँम्बुलन्सने हॉस्पिटलात न्यावयाचे असल्यास; ती आत येवू शकत नसल्यास आम्हाला त्याची काय चिंता? सकाळपासून रात्रीपर्यंत जोरजोरात गाणी लावून ध्वनीप्रदूषण केले तर काय बिघडते? मला आश्चर्य वाटते; अजून बाप्पा आपले हात आशीर्वादासाठी वर न करता; कानावर कसे हात ठेवीत नाही? तसेच सार्वजनिक गणेशोत्सवासाठी वर्गणी गोळा करण्यासाठी येतात त्यांची कित्येक वेळा जबरदस्ती असते. हल्ली गल्लोगल्ली हे गणेशोत्सव साजरे होत असतात, (त्यातले अर्थकारण न समजून घेतलेले बरे!) त्यामुळे प्रत्येकाला वर्गणी देण्याची आपल्यावर सक्ती असते. तुम्ही आम्हाला वर्गणी द्या; त्यांना देवू नका ही गोड ताकीद!

तसेच गणेशाच्या मूर्तीच्या उंचीबद्दल! मोठमोठ्या सार्वजनिक मंडळांना उंचचउंच मूर्ती बनवण्याचा फार आग्रह असतो. त्याना त्यामुळे कोणती 'उंची' गाठावयाची असते ते त्यांनाच ठाऊक. अर्थात त्यात मूर्तीकाराचे कसब असते. नुसती मूर्ती उंच असून चालत नाही तर ती प्रमाणबद्ध असावी लागते. हे सर्व जरी खरे असले तरी मूर्ती आणताना किंवा विसर्जन करताना किती खबरदारी घ्यावी लागते ते वेळोवेळी आपण पहातोच. त्यात विशेषत: मुंबईतील रस्ते कधी खड्डेमुक्त होतील ते त्या गणेशालाच ज्ञात! खड्डेमय रस्त्यातून गणेशमूर्तीचे विसर्जन म्हणजे आणखी एक चिंता. हे सर्व माहिती असूनदेखील तो बाप्पा बिचारा दरवर्षी न चुकता परत येतो! लोकमान्य टिळकांच्या नावाखाली आपण सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करीत असलो तरी मला खात्री आहे की त्यांनी जर पुनर्जन्म घेतला तर आजच्या गणेशोत्सवाचे आधुनिक

## वात्रटिका

### मेनू

त्याला आहे अचाट
खाण्याची आवड,
पदार्थांची नावं सतत
घेतो धडा-धड
झोपताना ऐक म्हणतो
'उद्याचा मेनू,'
झोपेत ताप चढून मंग
ती लागते कण्हू

**-डॉ. सुमन नवलकर**

स्वरूप पाहून ते नक्कीच न्यायालयात याचिका सादर करून तावातावाने आपली बाजू मांडतील आणि ह्यावर बंदी घालण्याची मागणी करतील!

२० फुटावरील दहीहंडीला मनाई, गणेशमूर्तीच्या उंचीवरून वाद, नवरात्रीत गरबा नृत्याच्या जाहीर कार्यक्रमाला रात्री १० वाजल्यानंतर बंदी, दिवाळीत रात्री फटाके फोडायला बंदी, ह्या सर्वासाठी नेहमी न्यायालयाला का आदेश काढावा लागतो ह्याचा आपण कधी विचार केला आहे? एक कारण असे आहे की, आम्ही सर्वसामान्य माणसे आम्हाला आवडो किंवा न आवडो विरोध करावयास धजावत नाही. आपला आवाज चिरडला जाईल अशी सारखी भीती वाटत असते. त्याबरोबरच आपले सामाजिक भान आपण हरवत चाललो आहोत. ह्या सर्व उत्सवांचे सार्वजनिक स्वरूप नाहीसे होऊन त्याचे व्यापारीकरण इतक्या प्रमाणात झाले आहे की उत्सवाचा मूळ उद्देश बाजूला पडून त्याला एक भोंगळ स्वरूप आले आहे, उन्माद वाढला आहे, हम करे सो कायदा ही प्रवृत्ती बोकाळत चालली आहे. त्याला कोठेतरी चाप बसला पाहिजे. आणि हे जर आपण स्वत:हून स्वत:वर काही निर्बंध घालून घेतले तरच शक्य आहे अथवा न्यायालयाचे आदेशावर आदेश निघतच रहातील आणि मग त्याचे निषेध करीत राहायचे, किंवा आदेशाची पायमल्ली करावयाची हे कितपत समर्थनीय आहे ह्याचा जरूर विचार केला पाहिजे.

काही दिवसात नवरात्री व दिवाळी सण मोठ्या उत्साहाने, धुमधडक्यात साजरा होईल. खरेदीची लगबग चालू होईल. वातावरण मंगलमय असेल. अशावेळी आपण आपल्या सीमेवर अहोरात्र गस्त घालणाऱ्या जवानांची आठवण ठेऊया. त्यांनादेखील कुटुंब असते. आई, वडील, बायका मुले येथे असतात. तो तेथे एकटाच मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी लढत असतो. त्याला जाणवू द्या की तू एकटा नसून आम्ही तुझ्याबरोबर आहोत. तुझ्यामुळे सणच काय, एरवी प्रत्येक रात्र आपण सुखाने झोपी शकतो, स्वातंत्र्याचा क्षण नि क्षण उपभोगू शकतो, निर्भय श्वास घेऊ शकतो. जर प्रत्येकाने एक कृतज्ञता म्हणून ,जवानासाठी असलेल्या सरकारमान्य 'आर्मी वेलफेर फंडा'त आपला खारीचा वाट उचलून मदत केली तर ही दिवाळी आणखी प्रकाशमय होईल !

पुढील येणाऱ्या सर्व सणानिमित्त ज्ञातीबांधवाना शुभेच्छा !

*

## व्यंगचित्र



कथा

# नाईलाज

## ✶ उज्ज्वला र. ब्रह्मांडकर ✶

''आई, काय ठरवलंस?'' अंकुरनं विचारलं.

''कशाचं रे?'' अर्पितानं न कळून उत्तरादाखल पुन्हा प्रश्नच विचारला.

''छान! एवढ्यात विसरलीस? अग, मोबाईलचं म्हणतोय मी.'' अंकुर उत्तरला.

''हां... हां... अं.. घेऊ... हं..'' अर्पितानं मोघम उत्तर दिलं.

''घेऊ म्हणजे? नक्की कधी घेणार ते सांग...''

''सांगेन रे. जरा पैशाचं जमू दे मग सांगते.''

''तसं नाही. आत्ताच सांग कधी घेणार ते म्हणजे पुढच्या आठवड्यात की पुढच्या महिन्यात? एक महिना, दोन महिने, किती थांबू?''

''अरे, अनुयाला कॅलक्युलेटर हवाय नं?"

''हां - आतां समजलं तिची खरेदी पहिली. माझी काय? केव्हाही केली किंवा केलीच नाही तर चालेल, असंच नं? ती तेवढी लाडकी?"

''अरे, खरंच पैशाची सोय करायला हवीय. सगळे पैसे गुंतवलेयत नं!''

''त्यात काय? एक गुंतवणूक मोड.''

''त्यानं नुकसान होतं नं?''

''असं कितीसं नुकसान होणारेय? उगीच काहीतरी सबबी.. निर्मलाआत्याच्या श्रीनादचं लग्न झालं तेव्हा मोडलंतच नं एक एफ.डी.?''

''तो नाईलाज होता रे अंकुर.''

''अच्छा! म्हणजे मुलांच्या गरजा हा नाईलाज असू शकतच नाही?'' अंकुरनं रागानं विचारलं.

''अंकुर, ही तुझी गरज नसून चैन आहे.''

''ठीक आहे. ते तुमचं कर्तव्य म्हण.''

''अं... कोणतं मॉडेल हवंय तुला..'' अर्पितानं अंकुरचा राग थोडा तरी निवळावा म्हणून विचारलं, ''आणि काय खास आहे त्यात?''

''तुला कळणार नाहीत ते फीचर्स.''

''सांग मला. मी काय अशिक्षित, अडाणी आहे?''

''त्यात उगीचच वेळ फुकट जाईल. माझ्या आत्ताच्या फोनपेक्षा त्यात कितीतरी जास्त सुविधा आहेत. फक्त पस्तीस हजारांचा आहे.''

''बापरे! अनुयाचा कॅलक्युलेटरही महाग आहे. कुठून आणायचे एवढे पैसे?''

''ते तुमचं तुम्ही बघा. अजूनही महागडे फोन आहेत. पासष्ट हजारांचा नाही ना मागितला मी? माझ्या मित्रांकडे, सगळ्यांकडे लेटेस्ट महागडे फोन, टॅबलेट, पी.सी., बरंच काही आहे. काहींच्या स्वतंत्र मोटारी आहेत. मी तुमच्याकडे मोटर तर नाही ना मागत?''

थक्क होऊन ऐकत असलेली अर्पिता म्हणाली, ''मोटार दिलीच नसती सरळ नाहीच म्हणाले असते.''

''ह्याचा अर्थ तुम्हाला मोबाईल परवडतोय, पण तुम्हाला द्यायचा नाहीय. नाहीतर तू सरळ नाहीच म्हणाली असतीस.'' अर्पिताला शब्दात पकडत अंकुर म्हणाला.

अर्पिता मनात म्हणाली- पुढच्या मागणीला आता सरळ नाहीच म्हणेन मी...

तेच वाक्य अंकुरनं मोठ्यानं उच्चारलं , ''पुढच्या मागणीला सरळ नाहीच म्हणशील तू....''

अर्पिता मनोमन दचकली - अंकुर मनकवडा आहे की काय? पूर्वी हा खेळ उलटा असायचा. लहानग्या अंकुरच्या मनातले विचार ओळखणं अर्पिताला अशक्य नसायचं. तिनं ते तसे ओळखले की निरागस अंकुर विचारायचा. ''तुला कसं कळलं मी काय विचार करतोय ते? आता प्रक्रिया उलट

झालीय... म्हणजे काळ पुढे सरकला की प्रक्रिया उलटीपालटी होते?... की दोन माणसांच्या विचारांची एकमेकांमध्ये उलटापालट होते?....

अंकुर तिचा हात हलवीत विचारत होता- ''आई पुन्हा एखादी सबब शोधतेयस की काय? तुला आधी फक्त पुढच्या महिन्याच्या शेवटपर्यंत कारण अनुयाची परीक्षा जवळ आलीय.''

''खरंच की... अनुया म्हणत होती कॅलक्युलेटरवर हात बसण्यासाठी अगोदर हवाय. आशीषला म्हणाली - तुम्हाला नाही कळायचं बाबा. तुम्ही म्हणताय तसं फक्त लक्षात ठेवून नाही वापरता येणार. काही कळणार नाही... केवळ टेक्नॉलॉजी पुढं गेल्यानं आमची बुद्धिमत्ता काही न कळण्याइतकी मागासली? की कुचकामी ठरली?'' - हे वाक्य अर्पितानं नकळत मोठ्यानं उच्चारलं...

नी तिथं आलेल्या आशीषनं विचारलं, ''अर्पिता, एकटीच काय बडबडतेयस?''

अर्पितानं भानावर येऊन बघितलं - अंकुर तिथून केव्हा गेला नी आशीष केव्हा आला तिला कळलंच नव्हतं...

''काही नाही ही मुलं आपल्याला मोबाईल मधलं, कॅलक्युलेटरमधलं काही कळणार नाही म्हणतायत. आपण दोघंही पहिल्यापासून स्कॉलर होतो पण आता चक्क 'अडाणी' ठरतोय...''

''अहं... हल्लीची पिढी खूप चलाख आहे. आपण सतरा प्रश्न विचारून खरं काय ते जाणून घ्यायचा प्रयत्न करतो. आपण त्यांच्या बेतात सरळ मोडता घालू म्हणून आपण प्रश्नच विचारू नयेत ही पार्श्वभूमी तयार करतात ते आपल्याला अडाणी ठरवून...''

''अहो, काय करायचं आता त्यांच्या मागण्यांचं?'' अनुया पुन्हा त्याच प्रश्नाच्या उंबरठ्यावर अडखळली... त्या प्रश्नाच्या उंबरठ्यावर ठेचकाळण्याच्या भीतीनं त्यानं विचारलं, ''तुला स्वच्छ नाही का म्हणता येत नाही गं त्यांना?''

''नाही कुठे? मोटार वगैरे मागितली तर मी नाहीच म्हणणार ना?''

''म्हणजे ह्या वस्तू त्यांना द्यायच्याच असं तुझ्या मनात आहे!''

''पण अनुयाच्या परीक्षेचा प्रश्न आहे हा.''

''चौकशी तरी केलीयस कां की खरंच असेल सायंटिफिक कॅलक्युलेटर्स वापरू तरी देतात का ह्याची? तुझ्या ऑफीसमधल्या मैत्रिणींना, सहकाऱ्यांना विचार नं!''

''एक बाई सांगत होती की तिचा मुलगा सतत नवीन नवीन सॉफ्टवेअर कॉम्प्युटरमध्ये घालून घेत असतो. तरच नीट अभ्यास करता येतो म्हणे!''

''बापरे! म्हणजे आता विंडोजबरोबर तो ही खर्च वाढणार!''.. खर्च कुठून भागवायचा? दुसरी नोकरी बघावी लागेल. मी रविवारी ट्युशन्स घेईन. रोज क्लिनीकचे तास मर्यादित नसतात पण रविवार मोकळाच असतो ना! बारावीच्या सायन्सच्या बायॉलॉजीच्या ट्यूशन्स घेईन...''

''आशीष, एक तर आठवड्याला एकदाच ट्युशन घेऊन उपयोग नाही. शिवाय आताच्या अभ्यासक्रमाची, प्रश्नपत्रिकांची पूर्ण माहिती करून घ्यावी लागेल. आणि जे प्राध्यापक अजून कॉलेजमध्ये शिकवतात, त्यांच्याकडे विद्यार्थी जातात. शेअर्सचा तर फायदा कमवायचा विचारही करू नका. त्यापेक्षा मी बँकेतून कंझ्युमर लोन घेते... आम्हां कर्मचाऱ्यांना वस्तू घेण्यासाठी मिळतं. पगार सारखा वाढतच असतो. पुढे हप्ते जड जाणार नाहीत. शिवाय तो मोटार वगैरे मागणार नाही म्हणतोय नं!''

''छान! म्हणजे उपकार करतोय का? मला हेच कळत नाहीय की दाता कोण आहे!''

''आशीष, आईवडील आणि मुलं यांच्यात ही भाषा नको.''

''अर्पिता, आपणही आईवडिलांपुढे लहानच होतो नं! पण आपण असे हट्ट कधी केले नाहीत. तेव्हांही आपले श्रीमंत मित्र, मैत्रिणी होतेच की!''

''आशीष, आता काळ बदललाय? आपण आजुबाजुच्या परिस्थितीप्रमाणे बदलायला हवं पाण्यासारखं. ज्या भांड्यात भरलं जातं त्याचा आकार पाणी घेतं. अगदी सहजपणे...''

''आपण पाणी बनायचं? आणि त्यांनी काय बनायचं? पाण्यातले दगड? कोंड्यामुळे पाणी वर येईल नी अखेरीस सांडून जाईल?.. की त्यांनी कावळा होऊन दगड टाकून पाणी वरवर आणून मनसोक्त प्यायचं?'' आशीषनं कासावीसपणे विचारलं.

''काही का असेना, पाणी उपकारक असतं. पाणी जीवन देतं.''

''म्हणजेच आपण उपकारक ठरायचं नं? मघाशी तूच ह्या शब्दावर रागावलीस. पण अगं, शब्द बदलले तरी परिणामांचं परिमाण तेच नं? आपण मुलं होतो, तेव्हाही आपण पाणीच होतो नी आताही पाणीच बनायचं? तेव्हा आईवडील बरोबर होते नी आता मुलं बरोबर आहेत? पाणी असूनही आपण तहानलेलेच. आपल्या माणसांच्याच प्रेमासाठी फक्त आपल्याच पिढीचं जगणं नेहमीच दुसऱ्या पिढीसाठी.''

''कधी अगोदरच्या तर कधी पुढच्या. जाऊ दे. ह्या विषयावर जेवढा विचार करू, तेवढेच चिखलात खोल खोल जाऊ. पाणी बनून आपणच तयार केलेल्या चिखलात...''

''आशीष, मला वाटतं तुमची लाईन चुकली. डॉक्टर न होता..'' अनुया बोलताना तिचं वाक्य अर्धवट तोडत आशीष म्हणाला -

''चला, तुला तरी पटलं की मी डॉक्टर व्हायला नको होतं. इंजिनियर किंवा दुसरं कुणीही पण पप्पांच्या इच्छेनुसार झालो.''

''तसं नाही. तुम्ही कवी, लेखक व्हावयाला हवं होतंत. कधी कधी असं काही बोलता नं की समोरचा गुंग होऊन जातो....''

''हे मात्र खरं हं! दुसऱ्याला गुंगी आणणं हे फक्त डॉक्टरांचंच काम.'' आशीष मिस्किलपणे हसत म्हणाला.

''आतां गप्पा पुरे. रविवारच्या साप्ताहिक सुट्टीचे कार्यक्रम नव्हे - कामाचे व्याप खूप असतात आपल्याला.''

अर्पिता उठली... कर्जाच्या रकमेचा मनानं अंदाज घेऊन... आशीष बसून राहिला... कर्जाच्या रकमेचा अंदाजच नसलेला; पण कर्जाशिवाय नाईलाज असलेला.

*


**With Best Compliments**
**from**

# A WELL WISHER

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# IT IS IMPORTANT TO EXPRESS ONESELF

## ✶ DILIP NAVALKAR ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

**"It is important to express oneself...provided the feelings real and are taken from your own experience."**

**by Berthe Morisot**

This thought inspired me going deeper into a different world of art. Since, four decade, I was fully occupied with Advertising field.

There was no time to look for alternate activities. I was happy sharing my knowledge and creativity through advertising to the masses and fortunate to work with great Advertising personalities in International Agencies. It was different world with fame and glamour.

In 2012, after hectic advertising career and social activities, I decided to take a break and focus on my illustration field which I studied in Sir J.J. School of Applied Art as my special subject.

In the meantime, I came across Japanese Artists **Masaaki Waka** and **Kayomi Nakai**. Great artists working on intricate details of birds in colours. That gave me motivation to do something, which I have never tried and tested.

**John James Audubon** another illustrator was with precision and every detail with great care, feather by feather in distinct colour for each layer of feathers and expression in their eyes.

This passion gave me, my interest to join in Ornithology Course. Being a member of **Ela Foundation,** headed by **Dr. Satish Pande** which runs short course on ornithology in Garware College, Pune. Which gives you in detail informative insight of birds. Even thorough knowledge of birds species such as their Whereabouts, Habit, Behaviour, Habitat, Food, Migration pattern even Field study on various tours.

In the entire ornithology course, we came across various species of birds. This fascinated my artistic mind to go for realistic and intricated detailed colour drawings of birds.It was great pleasure to draw and colour them to bring each bird alive.Every frame of bird took 5 to 6 days to complete. Concentration and dedication, that fulfilled my satisfaction for my efforts.

In 2014 **'ARRCN INDIA'** an International Rafter Conference which was held in Pune, attended by World's best ornithologists and experts, that gave me an opportunity to showcase my talent with different types of Birds drawings, such as Tawny Eagle, Indian Eagle Owl, Red Necked Falcon, Brahminy Kite,Osprey, Eurasion Sparrow Hawk etc. I was felicitated with an award for displaying my original Rafter birds paintings in the conference. It was great honour to be part of this project.

At the end, I would appeal our younger generation to be part of our beautiful nature. Nature has a lot to offer, it is upto us to acknowledge and grab it.

We are attaching birds images as follows:



**Mackaw**



**Fod**



**Golden Swan**



**Common Hoopoe**



**Java Sparrow**



Bearded Barbet



Swallow Tanager



Red Whiskered Bulbul



Rose Breasted Cockatoos



Vanga

# Searching for Stripes

✶ **Mrs. Shubhada Suresh Agaskar** née Miss. Vaishali Madhav Jayakar ✶

A bead of sweat rolled down my back. I was sweltering, thirsty and cranky. And to top it all, I really wanted to lie down and go to sleep. For the past 2 days, I had woken up at the crack of dawn and rushed for a darshan. But he thought so much of himself that he wouldn't even give me a small glimpse. I mean, what did he think of himself? Was he really so famous? Hordes of people aspired to see him.

No! I wasn't talking about any Bollywood or Hollywood film star. Oh...he was a star all right! But the star of the jungle-the Indian tiger! My husband-Suresh had decided that during this May vacation, we were to take a trip to Central India i.e. Madhya Pradesh and visit the Kanha Tiger Reserve. We had caught the early morning flight to Nagpur, a decision that my daughter-Radhika, totally abhorred. According to her, waking up before the sun rose, in the summer holidays, was sacrilege! From there, we had driven to one of the many MP tourism resorts within quick driving distance of the national park gates-a long journey that took us through the outskirts of urbanised Nagpur and then the vast plains and farmlands, occasionally going through bumpy railway crossings. The fields seemed endless and at intervals, seeming to break the monotony, were tendua trees. Our driver explained that the village women would pluck the selected leaves by hand and then dry them, before bunching them in groups of hundreds and selling them to the local cooperatives. Called 'tendua patti', these were then used to make beedis. Apparently, the fruit of these 'tendua' trees was very tasty and was consumed by the locals so voraciously that it hardly made it to the local markets.

The temperature was well into the high 30s and maybe the early 40s. As we travelled, our driver gave us some more information on the Reserve that we were to visit. Kanha is the largest national park in Madhya Pradesh- almost 940 sq. kms. All nature reserves are



**Gawa**



**Tiger**



**Tiger on Ridge**

divided into two main areas-the core area and the buffer area. Imagine 2 concentric circles, the one inside being the core and the one outside being the buffer. Just 20% of the core area is accessible to the public. Villagers are not permitted to build huts in the core area nor cut down any trees or do any agricultural activities. The remaining 80% core area is reserved exclusively for the animals and no one is allowed to venture into it-think of it as a sort of withdrawing room for ladies in an ultra orthodox household-people may come as guests but may never see the wives of their host, unless they chose to show their faces.

The buffer area surrounds the core area and is mostly made up of the surrounding villages and fields. There are 3 entry gates-Khatia, Mukki and Sarhi-all roughly 60 kms. apart. The reserve is divided into 4 zones-Kanha, Mukki, Kisli and Sarhi. Animals may choose to pass unhindered between any of these zones and it is your sheer luck that allows you to spot them. No outside vehicles are allowed so the mode of transport is either a Gypsy jeep or a canter-an 18-seater open aired bus. One needs to book a permit to enter the reserve and these are zone specific so be sure to check out beforehand for the zone that has the most recent sightings.

Checking into our Resort and having a hasty lunch, we then clambered into a Gypsy jeep- that would take us into the Reserve, to spot the elusive tigers. We had to show our Aadhaar cards at the checkpoint and then we were off. The advantage of a canter is that one is pretty high off the ground in an open aired vehicle so visibility is marvellous. But the downside is the bulk! If one needs to reverse quickly on the narrow trails to chase an animal, a canter is not your buddy! There, the jeeps win hands down!

As the jeep rumbled through the buffer area, our guide mentioned that tigers could be seen even in the buffer areas, occasionally hunting for prey if they didn't find a suitable one in the core area or in search of water. Apparently, a few years back, there was a female tiger, which used to walk along the trail to get to a particular water hole and people used to get a fantastic view of her as she would unhurriedly go about her daily walk! But, she had passed away since so we needed to keep our fingers crossed for a sighting!

We saw numerous gawa, wild pigs, peacocks, barking deer and even a jungle cat-its ears shaped like that of a puma's. Kanha is respected worldwide for its significant efforts to save the Barasingha from near extinction and we could spot herds of these magnificent animals, grazing away in peace as our jeep rumbled by. But, we had seen most of these animals previously, on our trip to Kabini, as past readers of my articles would recollect. The one animal that had eluded us then, was the tiger.

So, there we were, our jeep pulled up a few feet from a popular waterhole, waiting for the



**Jungle Cat**



**Machaan**

tiger to show itself. Our guide's reasoning was that it had not rained and water was scarce. This was one of the larger waterholes in the area, we were to maintain pin-drop silence and the tiger was sure to come. Two other jeeps too pulled up around the clearing and we all waited with baited breath. The jungle made its own noise. Monkeys passed insults to one another, high up in the trees, birds sang melodiously and the leaves rustled in the slight breeze. Suddenly, we could hear a nervous cough- it was the deer, alerting us, that there might be a predator nearby. A monkey let out a scream and all was still. The grass parted and we saw.... a family of deer making its way to the waterhole. What a letdown!

Our first trip into the reserve proved unsuccessful and so did the second, made in the wee hours of the morning. By now, Radhika was fuming! She almost refused to go on the third trip in the afternoon, citing a lack of sleep and extreme heat as the reasons. Somehow, we convinced her to give it a try. And deep down, a sixth sense told me that this would be it! We would get lucky this time!

As we entered the Kisli zone, this time on a canter, emotions ran high. We spotted a likely area and settled down to wait it out. And then, it happened! High up on a ridge, a splash of orange and black became visible. The tigress ambled up the ridge and sat down at the edge. Just as we all were ooh-ing and aah-ing, another one appeared and yet another. In all, there were 5 tigers up there. A proud mama and her 4 cubs! They lay there; all soaking up the sunlight, like those foreigners that one sees, sunbathing on Goan beaches. Through the camera lens, we could see each one in detail. The profuse whiskers of one, the tawny tail of another, and the white underbelly of the third....it was a sight to behold! The cameras went crazy and we got shot after shot of these fabulous beasts. Radhika was so excited that she was shaking and jumping on the seat. They were there on that ridge for almost 20 minutes and then, as if they had got an invisible signal, one by one, they all descended into the gully and vanished from view. And then, all of us on the canter broke silence. It was truly an amazing experience. The Royal Bengal tiger is endangered and some estimates put them at fewer than 2500 individuals. I was happy to see the cubs as it meant that the numbers were increasing. It gave me great satisfaction to see them with my own eyes and to show them to our daughter. By the time, she grows up and has her own child; she might not be able to do the same!

We left Kanha, happy to have ticked off 'seeing real tigers' on our bucket list and drove up to Bedaghaat to see the Marble Rocks and from there to Pachmarhi-MP's only hill station. While we were there, we were once trapped in our resort, due to a really heavy thunder shower. And as my husband was talking with the driver, he floated the idea of ending our trip on a high note by visiting Pench. Pench is a National Park of about 758 sq. kms., bordering Maharashtra and situated in the Seoni and Chinndwara districts of Madhya Pradesh. The name 'Seoni' sounded familiar until I recalled teaching my daughter a chapter from her Rapid Reader, entitled 'Mowgli and friends'. It then hit me-Rudyard Kipling's 'Jungle Book' was based in the 'Seeyooni Hills'. We had to go there!

The next day, we woke up at the crack of dawn...again... and started for Pench. The journey was tedious in the heat and we were glad to reach our resort. This time, we stayed in a machaan...albeit one with an attached bath and AC. And after our lunch, we set out to try our luck. Pench, by contrast, was pretty dry. The trees were brown and there didn't seem to be many animals in the buffer area. We were in

a canter this time and as we reached the start of a trail, a jeep passed us. Our canter's driver and the driver of the jeep had a hurried conversation and our driver turned to us and said "You are lucky! They just passed a tigress, seated underneath a tree. Let's check out if she's still there!" And she was...seated under a tree, in the shade, about 50 metres away from the trail. She was not at all bothered by the excited whispers and yawned to show her disdain of it all! We waited there for close to 10 minutes and she didn't seem to want to budge from the spot so we moved on. As we crisscrossed the various trails, one thing struck me. One occasionally passes other jeeps or canters on the trail, and there we were, in the jungle for almost 4 hours and not a single vehicle had passed us. How very strange!

And then, as we doubled back and came onto the trail that we had seen the tigress on at the start of our trip, we saw about 20 jeeps and 2 canters all spread out. We learnt that the tigress had not moved from her spot at all and that was why we had not seen anyone anywhere else....they were all clustered around her! An elderly uncle in our canter exclaimed "What a lazy thing!" And lo and behold...as if he had said magic words, the tigress stretched out her paws and stood up. We were 15 metres away from her at this point, all frantically recording her on our cameras, and to our amazement, she slowly ambled towards our canter. There were screams of "Keep the kids away from the edge of the canter" and we all watched as she ventured near. One often hears of models 'cat-walking'. Believe me when I say that at that moment, I understood the very origin of that word. She strutted her stuff and gave us her best poses, stopping occasionally, as if to say "Hurry up! Here's another angle!" She calmly went past our canter-we could have just reached out and touched her at this point- and the jeep behind us and then crossed the trail. All the jeeps immediately reversed and went after her while both poor canter drivers got screamed at to turn the canters around and follow them. But it was not easy! By the time we got turned around, she had made her way off the trail. But we were more than satisfied! What a fantastic way to end our holiday!!!

✳

**कविता**

# मैत्री जन्मजन्मांतरीची

**-सौ. निकेता प्रशांत राणे**

असावी मैत्री जन्मजन्मांतरीची
जाणीव होते अनोख्या नात्यांची।।

उदारात होते मातेच्या
मैत्री बालकाची
जाणीव होते त्यास ममत्त्वाची।।

बालपणी होते मैत्री भावंडांशी
जाणीव होते बंधू भगिनी नात्याची।।

शालेय जीवनात मैत्री होते अनेकांशी
जाणीव होते मैत्री करावी
मदत करणाऱ्या एकाशी।।

तरुणपणी मिळतात
जीव ओवाळून टाकणारे अनेक
जाणीव होते नाते जोडावे
एका जीवनसाथीशी।।

पतीपत्नीत दाट असावी मैत्री
जाणीव करून देते निरंतर प्रेमाची।।

अशीच मैत्री असते
देहाची आपल्या आत्म्याशी
जाणीव करून देते नाते जोडावे परमात्म्याशी।।

तुटतात जेव्हा मैत्रीचे पाश
जाणीव होते; हे मैत्रीचे मोहपाश।।

✳

# JULLAY

**✶ Anuradha Simit Desai ✶**

Always on the look out for new experiences, Ladakh had been on my bucket list for long. Friends shared their adventures in this land and amazing pictures to go with their stories that whetted my excitement. So one night, on a whim, the tickets got booked. I could've gone by myself, I was so keen to go, but the hubby decided to join too. This was a promising start.

While most of my friends had taken the drive / ride route, we were going to be less adventurous and take a direct flight to Leh. The 4am flight was not fun at the end of a hectic work week, but we spent the next day sleeping it off for 20 hours straight! First impressions on the drive from the airport to the hotel are hazy, what with us in zombie state and trying to be heroes going without medication to help with acclimatization. In hindsight, we really should've taken the meds, but well.

By the next day we were totally mesmerized by the landscape, the magnificence that surrounded us, and the unique beauty of the region. And this was just in Leh, the city – town. In Leh we visited the Kargil War Memorial that gave us goosebumps. We all know the history (or should), but it's when we get up close to the stories that we feel the insignificance of our daily struggles and the importance we attach to them. The Memorial houses weapons used during that war, information about all the award winners, unparalleled stories of courage and bravery beyond the call of duty, personal letters written by the jawans to their families before they went to war, a wall with the names of all the brave jawans martyred during the war. All through the time we spent in Ladakh, we were struck with how harsh the conditions were and the terrain challenging and how our army toils under these conditions almost thanklessly.

The other few places we visited in Leh was the Magnet hill… this place is supposed to have a magnetic field. We were told that due to this magnetic force, the cars and bikes get pulled automatically, but since it was slightly downhill anyway, that didn't impress us much. Another view we got was that though it was downhill, due to the magnetic force the vehicle does not go downhill. That made more sense, but neither was very convincing. The place made for good



**Sangam – the confluence of Indus and Zanskar rivers**

pictures though. Sangam, the confluence of the Zanskar and Indus rivers, is beautiful, and one can actually see the two different colours of the rivers coming together. The Shanti Stupa as expected was peaceful, surrounded by snow capped mountains, and offered a bird's eye view of Leh. We spent the evening there watching the sun go down behind the mountains.

We next ventured out to Pangong Tso, the lake made famous in the climax scene of 3 Idiots. It was like we were transported into a picture postcard. The blues of the sky and the lake were so bright, no picture could do justice. The meaning of life could unfold just sitting by the lake. We camped by the lakeside for the night. At 18000 feet plus, it was a cold and stormy night. A group of some twenty French bikers were at the camp too and made for interesting conversation. Their biker group is more than 50 years old, most of them were 60 plus, and really enjoying their ride across Ladakh. Some things worth emulating.

The other place we spent quite a bit of time in and totally fell in love with was Nubra valley. I



**The Pangong Tso Lake**

think it is the most beautiful place on earth and beats Switzerland hands down. The Nubra valley just goes on and on and along flows the Shyok river all the way into Pakistan. We camped near Disket, in a clearing in the trees, with a fresh water stream flowing nearby, and surrounded by mountains. The solitude was complete as we were the only tourists there. It was truly blissful just gazing at the play of light and shadow on the mountains and the shifting clouds. The only sounds were the chirping of birds and the stream flowing by. Enroute to Disket, we crossed the spot where some scenes of Bhaag Milkha Bhaag were shot. Given the natural beauty of the place, it is not surprising that our movies have made use of these locations. Another spot we saw was where some of Jab Tak Hai Jaan was shot.

While staying at Disket, we also drove further to Turtuk and ahead to the LOC. Access



**Our camp at Disket in the Nubra Valley**

to this point has recently been opened for civilians and once more it was overwhelming to experience what our Army does for us. The



**The double humped camels against a magnificent backdrop**

tricolor flying high at the northern most village of India, safely under the vigilance of our Army.

The drives everywhere were enchanting, the mountain ranges extending as far as the eye could see, each mountain a different hue. Most mountains were barren, some covered in snow, but each with its own raw beauty. Ladakh is also known as the land of passes. We crossed the Khardungla and Changla passes and had the mandatory Maggi and hot chocolate in the biting cold weather. It snowed while we were at Khardungla and how magical that was! To try to capture the snowflakes on the palms of our hands and see the different shapes of the ice crystals. As beautiful as the drives were, they were even more interesting because of our driver. He was a descendant of the Aryan race and it was enlightening to hear about his home near the Batalik sector, life there, the history of the region, and challenges of the local people. The locals are extremely friendly and humble. Everywhere we walked and came across locals, we were greeted with a cheery 'Jullay'. It's a greeting like 'Namastey' or 'Hi' and also used as 'Bye'.

As beautiful as the journey was, we started missing our little ones by the end of the week and decided to cut our trip short by a couple of days. The airlines made good money that day! On our hasty last evening in there, we did the token Bullet ride around Leh just to put the check in that box. As we bid farewell to this beautiful land and people, it felt as if I was leaving a piece of my heart behind. Maybe I shall go back for it someday. Till then, 'Jullay'!

*



**Leh market – pedestrians only!**

## मुखपृष्ठावरील चित्राविषयी पु. ल. देशपांडे यांचे 'गणगोत'मधील हस्ताक्षर



ती एक लोकविलक्षण त्रिमूर्ती होती.
ती आमची स्फूर्तिदेवता.
त्या त्रिमूर्तीला समर्थ रामदासस्वामी, लोकमान्य
आणि शिवाजीमहाराज अशी तीन तोंडे होती.
[illegible] देव ब्रह्मा विष्णु महेश होते. कळला
ना कळला तरी [illegible]
[illegible] 'पुढारी' हा शब्द [illegible]
[illegible] वापरण्यात येत होता.
त्यांच्या काळी [illegible] होता तो लोकमान्यांचे-
समर्थांचे आणि शिवबाचे [illegible] आठवण्याचा—
त्यांच्या चरित्रांतून आमच्या तुमच्या जीवनात कांही
चैतन्य येते की काय ते पाहण्याचा.

पु. ल. देशपांडे

प्रवासवर्णन

# श्री स्वामी समर्थ अष्ठ मठ यात्रा

⋆ सौ. अचला सुभाष देसाई ⋆



२०१५ साली आला योग पहिल्या अष्ठ मठ यात्रेचा. अक्कलकोटवासी श्री. स्वामी समर्थ यांच्या रायगड जिल्ह्यातील आठ मठांची ही यात्रा. सौ. प्राची व श्री. राजीव साळगावकर ह्यांची ही संकल्पना. गेली १५ वर्षे हे दोघे स्वामीभक्तांना अष्ठ मठ यात्रा घडवताहेत. डोळे भरून दर्शन, नामस्मरण, अर्चना, शिस्तबद्ध दोन दिवसांचा प्रवास आणि काही आनंद देणारे क्षण.

आम्ही अनेक दिवस वाट पाहत होतो तो दिवस उजाडला. साळगावकर आयोजित १०८ वी अष्ट मठ यात्रा. १७, १८, १९ ऑगस्ट हे ते तीन पवित्र दिवस. एकूण यात्री ८९. कुठे घाई गर्दी, अडचण नाही. सर्व काही शिस्तबद्ध.

यात्रेचा पहिला मठ चेंबूरचा. स्वामींचा मानस पुत्र स्वामीसूत महाराज ह्याने स्थापन केलेला. अतिशय पवित्र वास्तू. मनाला शांत करणारी. आजही नलावडे कुटुंबीय या मठाची उत्तम देखभाल करताहेत. प्रार्थना व स्वामी नामाचा १०८ वेळा जप करून यात्री पुढे निघाले. आपट्याला निसर्गरम्य ठिकाणी आणि काळूंद्री नदीच्या तीरी असा हा दुसरा मठ श्री. स्वामीसमर्थ विश्व कल्याण केन्द्र. चहा नाष्टा करून आम्ही परिसरातली इतर देवस्थाने पाहून मठात दर्शनासाठी गेलो. इथल्या सुबक मूर्तीला पोशाख चढवला होता आमच्या बसच्या १७ यात्रेकरूंनी.

पोलादपूरच्या श्री. कुलकर्णी गुरुजींच्या उपस्थितीत गणेशपूजा व स्वामी याग संपन्न झाला. मंत्रपाठाच्या जल्लोषात भव्य स्वामीयाग झाला व प्रत्येक उपस्थित भक्ताला आहूती वाहून धन्य वाटले. महाआरती, प्रसाद व पुरणपोळीचे भोजन. मग धरली वाट एका आदिवासी पाड्याची - गावाचे नाव सावरसाई. हा मठ स्थापन केला माईंनी. त्या म्हणजे स्वामींची मानस कन्या सुमन वरेरकर. खूप कष्टांनी व तिथल्या आदिवासींच्या विरोधाला न जुमानता माईंनी हे कार्य पुढे चालू ठेवले. तिथल्या रहिवाश्यांना व्यसनमुक्त करून मार्गी लावले. सौ. विभावरी शिंदे साळगावकरांच्या सहशिक्षिका यांनी प्रत्येक मठात सुंदर निवेदन करून थोडक्यात माहिती दिली. त्यांच्यासोबत आम्ही भक्त मंडळींनी १०८ वेळा स्वामीनामाचा जप केला. सायंकाळ होताच यात्री निघाले नागोठण्याला, अर्थात रात्रीचे भोजन कामत हॉटेलचे रुचकर जेवण. पहिल्या दिवसाचा प्रवास जरा उशीराच संपला. महाडच्या 'साईतेज' हॉटेलमध्ये पोहोचताच मध्यरात्र झाली. रहायची उत्तम सोय.

दुसऱ्या दिवशी सकाळी ६.६० ला बसकडे हजर रहायचे होते. 'गणपती बाप्पा मोरया'च्या गजरात आमची वाहने कशेळीच्या घाटाकडे निघाली. पावसाच्या सरी पडत होत्या व निसर्ग पूर्णपणे नटलेला होता. घाटातली मनमोहक वळणे घेत आम्ही कशेळीच्या माथ्यावर पोहोचलो. गरम चहा नाष्ट्याचा आस्वाद घेऊन आम्ही स्वामींच्या दर्शनाला जमलो. हा भव्य मठ दादर उपासक मंडळाच्या विश्वस्थांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. स्वामींची मूर्ती ही पंचधातूंची व ६५० किलो वजनाची आहे. प्रख्यात मूर्तीकार श्री. सोनवडेकरसरांची ही कलाकृती. स्वामींना मंगल अभिषेकाचा सोहळा इथे आयोजित केला होता. प्रत्येक भक्ताला आपल्या हाती उटणे लावून दूधाचा अभिषेक करायची संधी मिळाली. महाडचे श्री. आखवे गुरुजी उपस्थित होते. १५ जोडप्यांमध्ये गुरुजींनी लकी ड्रॉ काढला आणि नाव आले श्री. सुभाष व सौ. अचला देसाई. खूप आनंद झाला कारण ह्या पवित्र स्थानी गणेशपूजन करायचा मान आम्हाला मिळाला. मन भारावून गेले. पूजा, आरती, स्वामींचा अभिषेक, प्रसाद वाटप करून रूचकर भोजनाचा आस्वाद घेतला. उरणहून श्री. संजय पाटील व साथीदार येऊन सज्ज होते. अतिशय मधुर असा भक्तिसंगीताचा कार्यक्रम होता. दोन तास संगीतमय होऊन चहा वडे घेऊन निघालो शिरगावकडे. इथल्या मठाला दादलीचा मठ असे म्हणतात. स्वामींचे दर्शन व १०८ वेळा जप करून निघालो. श्री गोरे गुरुजींच्या निवासस्थानी. तिथे आहे स्वामींची मठी. ह्या पुण्यवंताच्या हस्ते आम्हाला प्रत्येकी संक्षिप्त श्री. गुरुचरित्र देण्यात आले. गोरे गुरुजींचे आशीर्वाद घेऊन निघालो आमच्या निवासस्थानी हॉटेल साईतेज. भोजन व रात्रीसाठी आराम.

तिसऱ्या दिवशी सकाळी आपल्या बॅगा घेऊन निघाली स्वारी रातवडच्या दिशेने. अतिशय पवित्र असा हा मठ व भक्तांच्या हाकेला धावणारे स्वामी ह्या मठाचे नाव श्री. स्वामी समर्थ मानव जीवन विकास केंद्र. आमचे स्वागत गावकऱ्यांच्या ताशाने झाले. श्री. कुलकर्णी गुरुजींच्या उपस्थितीत श्री. गुरुचरित्राचे सामुहिक वचन झाले तृप्त मनाने. दुपारचे भोजन करून निघालो आठव्या मठाकडे. पळसधरीचा मठ ही स्वामींची पुण्यनगरी. प्रवासात स्वामी समर्थ ह्या ठिकाणी विश्राम करीत. त्यांच्या शयनगृहात सागाचा पलंग व सुगंधी गादी. त्यांच्या अस्तित्वाचा अनुभव देतात. इथल्या सभामंडपात अनेक यात्रेकरूंनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वांनी उत्तम प्रतिक्रिया दिली. खरंच ८९ यात्रेकरूंना तीन दिवस मंगलमय अनुभव देऊन उत्तम व्यवस्था करणे ही काय साधी सोपी बाब नाही. श्री. स्वामींची कृपा आहे म्हणून राजीव, प्राची व चिन्मय साळगावकर हे कार्य करू शकतात. सायंकाळची आरती व शेजारतीचा अनुभव घेऊन आमच्या यात्रेची सांगता झाली. सर्व वाहने मुंबईच्या दिशेने निघाली तेव्हा रात्रीचे १० वाजले होते. सर्व मंडळी मध्यरात्री आपापल्या निवासस्थानी पोहोचली. तीन दिवसांच्या प्रवासातसुद्धा अजिबात शीण आला नाही, फक्त धन्य वाटले.

तशा छोट्या छोट्या अडचणी आल्या. बसच्या टायरचा पंक्चर, एक चाक शेतात रुतणे, हायवेला जड वाहनाचा अपघात, एका स्त्रीयात्रेकरूची अस्वस्थ तब्येत, अधून मधून जोरदार पाऊस. पण आम्हाला कुठेही त्रास जाणवला नाही. ही स्वामी समर्थांची कृपाच म्हणायची! खऱ्या अर्थानं ते आमच्या पाठीशी होते.

श्री स्वामी समर्थ। जय जय स्वामी समर्थ।।

प्रवासवर्णन

# कच्छचे रण

**✶ अपर्णा उदय कीर्तिकर ✶**

पाठारे प्रभु महिला सामाजाच्या ज्या सहलीची आतुरतेने वाट पहात होतो त्या 'कच्छच्या रण"च्या सहलीचा १७ जानेवारी २०१८ चा दिवस उजाडला आणि आम्ही २६ महिला- तरुण, प्रौढ व ज्येष्ठ नागरिक अशा रात्री १० वाजता वांद्रे टर्मिनसवर जमलो. बाहेरच सहल आयोजक बिम्बा नायक व त्यांची सून गौरी नायक स्वागतासाठी हसतमुखाने उभ्याच होत्या. गेल्या गेल्या त्यांनी आम्हाला प्रत्येकीला एक सुंदर पिशवी भेट म्हणून दिली. त्यात खाऊ, चहा-कॉफीसाठी लागणारे साहित्य (प्लास्टिकची सुरी, कागदी बशा, पेपर नॅपकिन्स, चमचा) तसेच लवंगाची पुडी (पुढील बस प्रवासात कुणाला त्रास झाल्यास) यांचा समावेश होता. विचारपूर्वक ह्या साहित्याचा पिशवीत भरणा केलेला दिसला. त्याबद्दल दोघींचे कौतुकच करावयास हवे.

प्लॅटफॉर्मवर जाऊन आम्ही सर्व एकत्र जमलो व गाडी आल्यावर (वांद्रे-भुज) आपापल्या डब्यात जाऊन स्थानापन्न झालो. रात्रीचा प्रवास असल्याने लगेचच पथारी पसरली. १८ तारखेला दुपारी भुज स्टेशनवर उतरून हॉटेल 'प्रिन्स रेसिडन्सी' ह्या आमच्या निवासस्थानाकडे रवाना झालो. खोल्यांमध्ये स्थानापन्न झाल्यावर ताजेतवाने होऊन दुपारचे भोजन करून स्थलदर्शनासाठी बाहेर पडलो.

प्रथम 'प्राग महाल' बघण्यास गेलो. १७६१ मध्ये राव लखपतजी यांनी बांधलेला हा महाल इटालियन गॉथिक पद्धतीने बांधलेला असून तो जीर्णावस्थेत आहे. त्याची फारशी देखभाल केलेली दिसली नाही. तिकीट काढून महाल पहाण्यास गेलो; पण निराशा झाली. एका मोठ्या दरबार हॉलमध्ये राजेशाही फर्निचर (जीर्ण झालेले) मांडून ठेवले होते. महालाच्या गच्चीवर उंच टॉवर असून तेथून भुज-दर्शन होते. प्राग महालच्या बाजूलाच आरसे महाल होता; पण त्या दिवशी तो बंद होता.

तेथून जवळच असलेला 'कच्छ म्युझियम' पहावयास गेलो. फारसे काही आकर्षक नव्हते. हमीरसर सरोवरासमोर असलेले हे म्युझियम १८७७ साली बांधलेले असून ते गुजरातमधील सर्वात जुने म्युझियम आहे. कच्छच्या संस्कृतीचा व इतिहासाचा मोठा भाग असलेल्या आदिवासी जमातीची माहिती येथे उपलब्ध होते. प्राचीन कलाकुसरीच्या वस्तू, लोककला व हस्तकलेचे नमुने येथे पहाण्यास मिळाले.

त्यानंतर स्वामीनारायण मंदिराला भेट दिली. भूजच्या मध्यवर्ती भागात असलेल्या ह्या मंदिराची देखभाल स्वामी नारायण संप्रदायाकडून केली जाते. सुंदर परिसरात असलेले हे मंदिर अतिशय देखणे आहे. प्रार्थना करण्यास, लॉनवर बसून संध्याकाळ मजेत घालवण्याच्या दृष्टीने हे स्थळ उत्कृष्ट आहे.

संध्याकाळी 'हिरालक्ष्मी क्राफ्ट पार्क" किंवा 'वंदेमातरम मेमोरियल"ला भेट दिली. मोठ्या प्रांगणात संसद भवनाची प्रतिकृती उभारलेली असून तेथे रोज संध्यकाळी प्रकाश व ध्वनीच्या (लाईट ॲण्ड साऊंड) खेळामार्फत भारतीय पौराणिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक ठेव्याची झलक दाखवली जाते. सुमारे एक तासाचा हा कार्यक्रम असतो. मुख्य कार्यक्रमाअगोदर वातावरणनिर्मितीसाठी चित्रपटातील राष्ट्रभक्तीपर आधारित गाण्यावर प्रकाशाचा खेळ दाखविला जातो.

१९ तारखेला नाश्ता करून कालो डुगर (कालो डुंगर/ब्लॅक हिल) पाहाण्यास गेलो. ४५८ मी. उंचावरील हे ठिकाण कच्छमधील सर्वात उंच ठिकाण आहे. वर जाण्यासाठी रस्ता चांगला आहे. अर्ध्या वाटेपर्यंत उंटाच्या सवारीचीही सोय आहे. वरून खाली दूरपर्यंत समुद्रासारखे दिसणारे सफेद वाळवंट (व्हाईट डेझर्ट - मीठाचे वाळवंट) दिसत होते. ह्या टेकडीवर दत्तात्रयाचे सुंदर मंदिर आहे.

येथून कच्छचे रण पाहाण्यासाठी धोर्डो येथे गेलो. येथील गेटवे टू रण रिसोर्टमध्ये आमची रहाण्याची व्यवस्था केलेली होती. खूप मोठ्या प्रांगणात (कुची भुगाज/मड हट) सदृश्य लहान लहान स्वतंत्र पण आतून आधुनिक स्वयंपूर्ण घरात केलेली होती. याची अंतर्गत सजावट पारंपारिक मातीकामाने करून त्यात छोटे छोटे आरशाचे तुकडे बसवून नक्षीकाम केलेले होते. छताला पारंपारिक कापडी पॅचवर्क केलेले छत लावले होते. भिंतीवर आतून व बाहेरून पारंपारिक चित्रकला रेखाटली होती. झोपडी असूनसुद्धा एसीची व्यवस्था होती. भोजन करून थोडी विश्रांती घेऊन ह्या पर्यटनाचा परमोच्च बिंदू (हायलाईट) असलेले कच्छचे सुप्रसिद्ध 'शुभ्र रत्न'' (व्हाईट डेझर्ट) पाहाण्यास निघालो.

आपल्या भारतातील थरच्या वाळवंटातील कच्छच्या भागात खाऱ्या पाण्याची दलदल (सॉल्ट मार्श) असून सुमारे ७५०५ चौ. कि.मी. असलेले हे वाळवंट जगातील मोठ्या मीठाच्या वाळवंटापैकी एक आहे. येथे सूर्यास्त पहाण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर पर्यटक जमतात. पौर्णिमेच्या रात्री चंद्र प्रकाशात हे वाळवंट खूप सुंदर दिसते असे म्हणतात.

बसने प्रवास करून आम्ही तेथे गेलो. बस स्थानकामध्ये (पार्किंग) बस थांबवून आम्ही वाळवंटातून चालत निघालो. जवळच कॅमल शो चालू होता. सर्कशीतील घोड्यांच्या, हत्तींच्या कवायतीसारखाच हा खेळ होता. रिंगमास्टरच्या सूचनेनुसार सर्व उंट शिस्तीत वंदन, दौड, विविध कवायती करून दाखवत होते.

सफेद मीठाचे वाळवंट व तेथील सूर्यास्त पहाण्यासाठी जाताना व येताना आम्ही उंटाच्या गाडीतून व्हिवींग टॉवरपर्यंत गेलो. समोर पाहिले तर वाळूऐवजी दूरपर्यंत पसरलेले मीठाचे वाळवंट किंवा समुद्रच. सर्वत्र खडे मीठ पसरलेले असून त्यातूनच चाललो, फिरलो, सूर्यास्तापर्यंत थांबावयाचे असल्याने तेथेच बसलो. एरवी आपण मुंबईला क्षितिजावर होणारा समुद्रातील सूर्यास्त पहातो. पण येथे मीठाच्या अथांग वाळवंटात होणारा सूर्यास्त पहाणे हा अतिशय सुंदर अनुभव होता. पावसाळयात हा सर्व प्रदेश पाण्याने भरून जातो पण त्यानंतर मात्र कडक उन्हामुळे त्या पाण्याचे बाष्पीभवन होऊन मीठाच्या रूपाने समुद्र रहातो.

२० तारखेला सकाळी नाश्ता करून मांडवीकडे प्रयाण केले. समुद्राकाठी असलेले मांडवी हे शहर एकेकाळी प्रमुख बंदर होते. कच्छच्या महाराजांचे येथे उन्हाळी निवासस्थान आहे. समुद्रकिन्नयावर असलेला 'विजय विलास पॅलेस'' हे १९२९ साली बांधले गेलेले कच्छच्या जाडेजा राजाचे उन्हाळी निवासस्थान आहे. सभोवती सुंदर उद्यान केलेले असून रेड सँडस्टोनपासून बनविलेल्या महालाची चांगली देखभाल ठेवलेली आहे.

'७२ जिनालया' हे जैन धर्मियांचे धार्मिक स्थळ असलेल्या मंदिर संकुलात सफेद संगमरवरी ७२ मंदिरे असून त्यात पूज्य महावीरांच्या ७२ शिष्यांच्या खूप सुंदर व देखण्या संगमरवरी मूर्तींची स्थापना करण्यात आली आहे.

संध्याकाळी मांडवीच्या समुद्रकिनाऱ्यावर गेलो. किनारा अतिशय स्वच्छ व सुंदर होता. आम्ही तेथे थांबलो, चाललो, पाण्यात गेलो, जलक्रीडा (वॉटर स्पोर्टस) केल्या, बोटीत बसलो, बोटीत गाण्याच्या तालावर नृत्याचा आस्वाद घेतला व सूर्यास्त पाहून परतलो.

२१ तारखेला सकाळी नाश्ता करून आशापुरा येथील नारायण सरोवराकाठी असलेल्या 'मातानु मठ' ह्या ऐतिहासिक स्थळाला भेट दिली. हे एक छोटेसे गाव असून हिंदुधर्मीयांचे तीर्थक्षेत्र आहे. दुपारची वेळ असल्याने मंदिर बंद होते.

त्यानंतर 'कोटेश्वर महादेव'' मंदिराला भेट दिली. कोटे हे लहानसे गाव कोटी खाडीच्या मुखाशी वसलेले आहे. कच्छमधील हे शहर भारताचे अति पश्चिमेकडील टोक आहे. येथून सुमारे १६५ कि.मी. अंतरावर कराची शहर आहे. छोट्याशा टेकडीवर स्थापलेले हे मंदिर पूर्वी भरतीच्या वेळी मुख्य भूमीपासून वेगळे होत होते. आता रस्ता बांधून ते जोडले गेले आहे. देऊळ वालुकाश्मापासून बनविलेले असून समुद्राच्या लाटांनी टेकडीचा पायथा धुतला जातो. (आपल्या महालक्ष्मीच्या देवळासारखा)

येथून परत भुजला जाऊन थोडी मिठाई खरेदी करून रात्रीचे भोजन करून भुज-दादर गाडीने परतीच्या प्रवासाला निघालो. सर्व प्रवासाचे नियोजन व्यवस्थित केले गेले होते. त्यामुळे माझ्यासारख्या ज्येष्ठ नागरिकांचा प्रवास अतिशय सुखकर झाला.

बिम्बा नायक व गौरी नायक यांचे अभिनंदन व धन्यवाद!

*

प्रवासवर्णन

# समयाचे पंख [WINGS OF TIME]

## (सिंगापूरला गेलात तर जरूर बघा)

✶ विनय त्रिलोकेकर ✶

आमची मुलं-मुलगी, मुलगा आणि सून, अर्थात आमची नातदेखील (Oh, Sarah dear , how could I not include your name?) ह्या सर्वांना एक सुंदर कल्पना सुचली. माझ्या सत्तराव्या जन्मदिवसानिमित्त एक अमूल्य आणि अविस्मरणीय भेट म्हणून आम्हा दोघांना सिंगापूर-मलेशियाचे पॅकेज देऊन आनंद लुटण्यास १५ - २० दिवसांकरिता परदेशी पाठवायचे!

आम्हाला काहीच करायचे नव्हते, अगदी सामानसुमनांची बांधाबांधीदेखील नाही. बॅग भरणे म्हणजे मला धडकीच भरते. packing my luggage bags - I always dreaded the very idea. एक दिव्य पार पाडण्यासारखे असते. आपण बॅग भरण्यास घेतो, किती शर्ट आणि कोणते घ्यायचे इथून सुरुवात आणि समोरून बायकोच्या प्रश्नांचा भडिमार- इतकेच का? चारच टीशर्ट? बापरे इतक्या पॅंट्स, आपण किती महिन्यांसाठी जात आहोत? काय भरून झाले आणि बाकी काय हे मला लक्षात येत नाही. दाढीचे सामान? टूथ ब्रश घेतला का? (वास्तविक, हे सारे हॉटेलात मिळते) पत्त्यांचा जोड? हे घातले आत, पण ते घालायचेच राहिले वाटते. मग साऱ्या नीट बॅगेत लावलेल्या वस्तू बाहेर. अरे हे काय, ही तर आतच होती. डबल मेहनत! दरम्यान बॅग पुन्हा भरताना लक्षात येते आपण टूथपेस्टच्या ट्यूबवर पाय देऊन अर्ध्याहून अधिक पेस्ट बाहेर काढून ती काही वस्तूना लावली आहे. हे शर्टाला काय लागले ? शेविंग क्रीम! ट्यूबवर बसलो वाटते! Oh, shit!अरे, विष्टा नाही रे, गोदरेज मेंथॉल शेविंग क्रीम - थंडथंड गारगार! असो!

आमच्या मुलीनेच केले आमचे सर्व सामान पॅक. ती त्यात अतिशय प्रवीण आहे. आम्हा दोघांच्या दोन बॅग्स. प्रत्येकाची स्वतंत्र एक. माझे सर्व कपडे इस्त्री करून, व्यवस्थित घडी घालून. मोजे, रुमाल नीटनीटके बॅगेत! हॅन्डबॅगेत लागणारी महत्त्वाची कागदपत्रं इ-तिकीट, प्रवास कार्यक्रम (travel itineraries), पासपोर्ट इत्यादी अगदी सुबकरित्या सहज सापडतील अशा!!

आणि सुरू आमचा प्रवास. सिंगापूरमध्ये बरेच काही बघितले. सिंगापुरात सेंटोसा बेट अप्रतिम आहे.

पण सेंटोसाचे प्रवासवर्णन लिहीत असताना माझ्या ध्यानात आले की, ‘समयाचे पंख’ किंवा ‘वेळेच्या पंखावरून’ अथवा पंखावरून काळाच्या पलीकडे `[Wings of Time'], एक वेगळा भाग म्हणण्यापेक्षा एक स्वतंत्र अध्याय असला पाहिजे. तो होता आमचा सिंगापूरातील दुसरा दिवस. नेमके सांगायचे झाले तर दिवस होता १७ जानेवारी, २०१७. दुपारचे जेवण उरकून, आम्ही म्हणजे आम्ही दोघे आणि आमचा नव्याने परिचित झालेला मित्र परिवार - नेपाळ दांपत्य श्रीराम शर्मा व मोमिता आणि कानपूरचे जोडपे, अनुरूप भारतीय व निकिता; आमचा गाडी चालक राईससोबत सेंटोसा बेटाच्या दिशेने निघालो. एखाद्या सराईत मार्गदर्शकाप्रमाणे राईसने केबलकार, स्कायलाईन-ल्यूज, सेंटोसा बेट, चौपाटी आणि ‘विंग्स ऑफ टाईम’ ह्या सर्वांची माहिती देत आणि गाडीवर संपूर्ण ताबा ठेवत गाडी वेगाने नेत आम्हाला केबलकार हार्बर पॉईंटच्या पायथ्याशी सोडले.

केबलकारने आम्ही इंबिह लूकआऊट (Imbiah Lookout) स्टेशनवर उतरलो आणि निघालो स्कायलाईन ल्यूजकडे. ल्यूज आणि आकाशस्वारी (Sky-ride), असे दोन अद्वितीय व आगळेवेगळे अनुभव होते (unique experiences). केबलकारचा अनुभवदेखील अविस्मरणीय होता. ह्या साऱ्याबद्दल

दुसऱ्या भागात सविस्तर लिहिले आहे.

अनुरूप आणि निकिताने ल्यूज राईड आणि स्काय राईड दुसऱ्यांदा करण्याचे ठरवले असल्यामुळे आम्ही चौघे बस नं. २ पकडून पुढे निघालो. आम्ही चौघे बीचवर येऊन 'विंग्स ऑफ टाईम' शोसाठी रांगेत उभे राहिलो. गर्दी बरीच होती. आमच्यापुढे १०-१५ लोकं असावीत, पण पाठीमागे बरीच मंडळी. साऱ्यांना पद्धतशीररित्या आत सोडले जात होते. धक्काबुक्की किंवा रेटारेटी नाही. कोणताही गोंधळ नाही. ह्याला म्हणतात शिस्त! सारे काही शिस्तबद्ध असल्यामुळे आम्ही लौकरच आंत गेलो.

कदाचित 'Wing of Times' हा जगातील एकमेव कायम स्वरूपी रात्रीचा खेळ/प्रयोग असावा (the only permanent night show in the world) जो एका खुल्या समुद्ररुपी पडद्यावर दाखवला जातो. आम्ही ६ जणं प्रयोगासाठी रांगेत उभे राहिलो. आमच्यापुढे दहाएक लोकं असावीत. पाठीमागे बरीच मंडळी होती. साऱ्यांना पद्धतशीर आत सोडले गेले, धक्काबुकी किंवा रेटारेटी नाही. कोणताही गोंधळ नाही. ह्याला म्हणतात शिस्त! समुद्र किनाऱ्याच्या काही अंतरावर अर्धवर्तुळात प्रेक्षकांसाठी बाकडे/खुर्च्या मांडल्या होत्या, एखाद्या स्टेडियम किंवा सर्कसमध्ये असतात त्याप्रमाणे. बरेच प्रेक्षक वर चढून मागील खुर्च्या पटकावू लागले. आम्ही मात्र तसे न करता पहिल्या रांगेतील बाकड्यांवर ठाण मांडलं. आमच्यापुढे कोणी नसल्यामुळे फोटो काढणं व व्हिडीओ शूट करणे मला सोपे झाले. प्रेक्षक अजून आत येतच होते, पण ते सारे आमच्या पाठीमागून जात होते, समोरून कोणी नाही. मला फोटो काढण्यास कोणताही अडथळा येत नसल्याचे जाणून मी फोटो शूट करू लागलो.

अरे हे काय? का कोणास ठाऊक, समोरील दृश्य पाहून मला मॅक्सिकन आणि इटालियन खाद्य पदार्थांची आठवण झाली. मी शेजारीच बसलेल्या ममीताला विचारले, *"Mamita, have you ever eaten 'tacos'?"*

*"Why, of course! Those traditional Mexican - corn or wheat tortilla folded triangular things with some fillings, I simply love them. Those things right in front of do remind us of them, don't they?"* ती म्हणाली.

*''मला ते नॅचोस ('nachos' )किंवा मॅड अँगल ('Mad Angles') सारखे अधिक वाटतात, ''* माझ्या बायकोने उत्तर दिले. आम्हाला वास्तविक नेत्रसुख घ्यायचे होते, मग अशावेळी आम्ही खाद्य पदार्थांचा विचार का करीत होतो? (Why were we thinking gastronomically?) कदाचित आम्हा साऱ्यांना भूक लागली असावी, हा हा!

संयोजकांचा वक्तशीरपणा वाखाणण्याजोगाच होता. बरोबर आठच्या ठोक्याला कार्यक्रमाला सुरुवात झाली. सारे घडू लागले. आमच्या समोरील खुला भव्यदिव्य सागर समुद्रवर आणि ते देखील 'larger-than-life' पाणीरुपी वाईड पडद्यावर, ७० एम एम पडद्याचा कितीतरी पट रुंद अशा पडद्यावर घडत होते. घडणारे सारे चित्त थरारक होते. एक साधीसुधी काल्पनिक कथा. परी कथा म्हणा. पण तिची मांडणी काय सांगू! सारे अंगावर एक रोमांच उभे करणारे होते. ३डी प्रोजेक्शन वापरून मल्टीमीडिया इफ्फेट आणणे, लेसर बीम, रोबोटिक पाण्याचे फवारे व चिळकांड्या (ह्या फवाऱ्याचे व चिळकांड्यांचे पाणी थेट आमच्या तोंड-अंगावर वारंवार उडतही होते आणि म्हणूनच आम्हाला थेट त्या परीकथेत गेल्यागत वाटत होते.) आणि परीकथेतील नेहमीचे घटक- माया-जादू, गूढता, शौर्य आणि प्रेम विणून तयार झाली ती 'विंग्स ऑफ टाईम'. अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून ECA2 ह्या जगप्रसिद्ध फ्रेंच मनोरंजन कंपनीने सेंटोसातील स्थानिक तंत्रज्ञांसोबत ह्या अवॉर्ड वीनिंग 'विंग्स ऑफ टाईम'ची निर्मिती केली आहे. मला आजही फेअरी टेल्स आवडतात. माझ्या आतले लेकरू बाहेर येते. त्यामुळेच हे सारे बघताबघता हा ७० वर्षाचा माणूस ७ वर्षाचा झाला! असो.

आणि मी हे सारे व्हिडियो शूट करू लागलो.

समोर वाळूवर किशोर वयातील मुलं बागडत आहेत. कोण आहेत ती? ही चुणचुणीत मुलगी कोण?

ही आहे रचेल. ती आहे चौकस, जिज्ञासू, साहसी आणि उत्सुक. ती किनाऱ्यावर असलेले खडक आणि दगड न्याहाळत बारकाईने पाहत पुढेपुढे बिनधास्त धावत आहे.

हा कोण तिच्या मागे मागे धावत आहे बरे? थोडा भित्रा वाटतो? होय!

हा आहे फेलिक्स. वाटतो खरा भित्रा आणि भ्याड. पण आंत दडलेल्या त्याच्या शौर्याची त्याला जाणीव होईल. पण कधी ? अहो, जरा धीर धरा.

होय, फेलिक्सचा स्वभाव रचेलच्या अगदी उलट. तो जरी भित्रा आणि पुराणमतवादी असला तरी आहे तो अतिशय प्रेमळ

*''रचेल, रचेल , आहेस तरी कोठे तू?''*

*''कोण, फेलिक्स का?''*

*''हां, तर येथे आहेस तू!''*

*''माझा पाठलाग करतोस की काय?''*

*''वर्गातील सारे तुला शोधीत आहेत.''*

*''हे ठिकाण पहा. मी तुला काही दाखविते. किनाऱ्यावरचे हे विचित्र आणि विक्षिप्त खडक बघ. चल जवळून पाहूया.''*

*''त्यात नवखे असे काय? साधे दगड तर आहेत ते.''*

*''पण मला हे अद्‌भूत आणि अनोळखी दगड जवळून न्याहाळायचे आहेत, किती मोठे आहेत हे! चल, शक्य असेल तर पकड मला.''*

*''नको. थांब!''*

*''घाबरत असशील तर दुसरे आहेत त्यांच्या बरोबर रहा. इतका भित्रा-भागूबाई राहू नकोस.''*

*''रचेल, थांब wait... माझ्यासाठी थांब!''* असे *म्हणत तो तिच्या मागे धावत सुटतो.*

*''ऊंहां!''*

*फार उशीर झालेला दिसतो. अखेर ती धडपडून पडते. आणि समोर हा कोण? एक गूढ प्राचीन कालीन पक्षी रुपी भला मोठा प्राणी!*

*हा आहे शाहबाझ. त्याच्याकडे आहेत काळाच्या पलीकडे नेणारे जादूचे पंख.*

*''बापरे! कोण रे तू?''*

*''मी आहे शाहबाझ! मी नुकताच जागा झालो आहे एका दीर्घकालीन झोपेतून. होय, हजारो वर्षांच्या निद्रेतून! आता मला केवळ सुरुवातीच्या काळात आणि माझ्या घरी परत जायचे आहे, बस.''*

*''आणि ते तुम्ही कसे करणार?''*

*''अर्थात माझ्या ह्या पंखांवरून!''*

*''वाह, ह्यात मोठे साहस वाटते! मी तुमच्या बरोबर येऊ शकते?''*

*''रचेल! काय गं, तुझे डोके ठिकाणावर तर आहे ना?''*

*''ही , ही , ही ! (फिदीफिदी हसत म्हणते) अहो शाहबाझ राजे , तसे मी आहे रचेल आणि हा आहे माझा मित्र फेलिक्स.''*

आणि दोघांना आपल्या पाठीवर घेऊन उडू लागला!

*''काळाच्या प्रवाहातून तुम्ही वाटचाल कशी काय करणार , आम्हाला सांगणार का?''*

''माझ्या पंखांमुळे, अर्थात!''

(चला उडूया त्यांच्यासोबत)

आणि उडू लागला शाहबाझ आणि त्याच्या पाठीवर रचेल आणि फेलिक्स - आणि झाला सुरू त्यांचा प्रवास. (आणि त्यांच्याबरोबर आपलादेखील) काळाचे रहस्य उलगडत, शतकामागे शतके ओलांडत, निघाले एकविसाव्या शतकापासून पलीकडे. ती पहा खाली उंच उंच स्काय स्क्रॅपर्स, उड्डाण पूल, मोनो आणि मेट्रो गाड्या. अरे, ते पहा 'ट्वेन्टीएथ सेंचुरी फॉक्स' ग्लोब चिन्ह. सारे पाठीमागे

---

## व्यंगचित्र



गेले की.

"हे पहा! आपण येत आहोत १९व्या शतकातील ग्रेट ब्रिटनमध्ये. आता माझी रनिंग कॉमेंटरी बंद केलेलीच बरी.''

सादर केले जाते. आपल्यासमोर येते. कलात्मक रीतीने सादर केलेली एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश औद्योगिक क्रांती. एकमेकात गुंतलेली ही काटेरी चक्र (गिअर), वरखाली होत असलेले दट्टे आणि तराफे आणि त्या सर्वांचा होणारा खणखणाट.

''किती अविश्वसनीय! फेलिक्स बघ, आपण आता रेशमी रास्ता ह्या युगापर्यंत आलो आहोत.''

इ. ख्रिस्तापूर्वीच दुसरे शतक ते चौदाव्या शतकाच्या शेवटापर्यंत, ह्या काळात देवाणघेवाण आणि व्यापाराचा मार्ग पूर्वेतील चँगएॅन (आता झीएॅन) म्हणजे चीनपासून पश्चिमेतील रोमन साम्राजापर्यंत जोडला होता. आणि रेशमाचा व्यापार अधिक असल्यामुळे १८७७च्या दरम्यान जगप्रसिद्ध जर्मन भूगोलकर, फ़ेर्डिनंड फॉन रिचतोफेन (Ferdinand von Richthofen) ह्यांनी ह्या मार्गाला रेशमी रास्ता (Silk Road) असे नाव दिले आणि ह्या युगाला पण हेच नाव पडले. केवळ व्यापारच नव्हे तर चीन, भारत, पर्शिया, ग्रीक आणि रोमन संस्कृतींची देवाणघेवाण झाली. मायान पिरॅमीड हे माया लोकंना वास्तुकला ३००० वर्षापूर्वीपासून अवगत होती पुरातनवास्तू शास्त्रीय दाखला देतात. असो.

''ते पहा पाण्याखालचे जग.''

''आणि हे बघा आफ्रिकेतले सवान्ना.''

डसवान्ना किंवा सवानाह ही एक कुरण आणि अरण्यप्रदेश अशी संमिश्र पर्यावरण व्यवस्था होय. म्हणून वन्यजीवन आणि झाडी झुडपे फार. .

रचेल खाली पाण्यात पडते. फेलिक्स तिला वाचवण्यासाठी पंखांवरून पाण्यात उडी घेतो.

''ओ ! रचेल,रचेल!''

फेलिक्सला आपल्यातील अंतर शक्तीची जाणीव होते. आणि रचेलला लक्षात येते की फेलिक्स नक्कीच भित्रा नाही.

मग तिघांचा पुढील प्रवास चालू राहातो. पंखांवरून काळाच्या पलीकडे!

*''...आपण प्राचीन काळात म्हणजे माझ्या मायदेशाजवळ आलो आहोत, आणि मला आता विरामाची गरज आहे ...हुश !''*

''कदाचित कोणीतरी मदत करेल. ''

''मीच एक मोठा रक्षणकर्ता आहे!''

आणि सुरू झाले एक अर्थपूर्ण गाणे : या गाण्यात यमक नव्हते. पण लय आणि लयबद्धता होती. तसेच पार्श्वसंगीत सुरेख होते. आणि गाण्याचे बोल आमच्या वर्तमान परिस्थितीला साजेसे होते.. गाणे इंग्रजीतच जसेच्या तसे ठेवीत आहे. .

*When you are travelling far from home, don't be scared!* (आमचा पण घरापासून लांब प्रवास होता )

*When you are travelling far from home, don't be scared!*

*You are not alone* (अर्थात् मी एकटा नव्हतो, सोबत माझी बायको होती. हा,हा!)

*You are not alone.*

*Find Courage, find courage in you* (आम्हा दोघात 'ते' ठासून भरले आहे! हा,हा!)

*Courage within you!*

*Let the dream come true!*

*Keep on hoping! Dream will come true!*

*Keep on hoping!*

*Keep hoping! Keep hoping! Keep hoping...*

आणि घर आले शाहबाझचे ...

''पुरातन काळ! हं, आलो एकदाचे घरी! आपल्या सहवासाबद्धल आभारी!''

''किती रम्य आहे इथे!''

''होय. पण आपल्या पार्टीचे काय?''

''चिंता नसावी. मी व्यवस्था करेन.''

शाहबाझ होतो अदृश्य. पण रचेल आणि फेलिक्स जादूने येतात वाळूवर! एकमेकांचे हात पकडून निघून जातात.

''ओ , फेलिक्स! काय साहस होते!''

(मी रेकॉर्ड केलेला व्हिडिओ आपण फेसबूकवर बघू शकता )

एक गोड अंत.

गोष्टीचा शेवट झाला तरी कार्यक्रम संपला नव्हता. जोरदार दारूकाम झाले. (त्याचेही विडिओ शूट आपण फेसबूकवर पाहू शकता).अशा रीतीने आमच्या सेंटोसातील त्या दिवसाची सांगता झाली. ह्या विंग्स ऑफ टाईमने आम्हा सर्वांना संमोहित केले आणि डोळ्यांचे पारणे फेडले!

*

कथा

# अनिच्य..अनिच्य..अनिच्य..

**✶ मीरा ✶**

*(माझ्या मैत्रिणीचा हा स्वानुभव तिच्याच शब्दात... त्याला नकळत कथारूप आलेय. -संपादक)*

गुरुजी बोलत होते...''आपका मन आपके पूरे शरीरसे गुजारो! सरसे लेकर पाव तक.... सिरसे लेकर ऊपर नीचे तक अपने पाँवकी ऊंगलीयोंतक शरीरके हर एक हिस्सेपर अपना मन ले जाओ! एक एक हिस्सेसे पहले कुछ स्थूल संवेदनाए; बादमें आप मान जाओगे.... सूक्ष्मसी संवेदना, लहरें मिलेंगी... आएगी और चली जाएंगी... क्योंकी उन संवेदनाओंका स्वभावही ऐसा है...

अनिच्य....अनिच्य...अनिच्य...

मनस्विनी डोळे बंद करून नीट ऐकण्याचा आटोकाट प्रयत्न करत राहिली. विपश्यनेचा हॉल विद्यार्थ्यांनी पूर्ण भरला होता. जवळजवळ शंभर स्त्री पुरुष! विपश्यना करायला, शिकायला आलेले. पण काहीजण अनुभवी तर काही नवखे..... तिच्यासारखेच,

पण आज पहिलाच दिवस होता. संपूर्ण दिवस मौन राखून सकाळी ४ वाजल्यापासून मनस्विनीने या कार्यामधली शिस्त राखली होती. निमूटपणे, अगदी निमूटपणे! ती तिकडे प्रामाणिकपणे शिकायला आली होती ! विपश्यना! गेली १०-१२ वर्षे आपल्याला याची गरज आहे असं तिला वाटायचं! पूर्ण मौन! आपल्याला जमेल का ११ दिवस पूर्ण मौन पाळायला? असा प्रश्न विचारीत विचारीत स्वत:लाच, ती आली होती, पण जे १०० जणांना जमतं ते आपल्याला का जमू नये? असा सूज्ञ विचार करून ती आता ध्यानाला बसली होती.

सकाळी ४ ते रात्री ९ एवढ्या वेळात जवळ जवळ १० ते ११ तास ध्यानस्थ बसायचं, ध्यान कसं करायचं ते शिकायचं आणि मग ध्यान लावायचं! ध्यानाचा तो वर्ग संपला आणि घंटा झाली. मनस्विनी इतरांबरोबर आपल्या जागेवरून उठली आणि बाहेर आली. ब्रेकफास्ट टाइम होता तो! ब्रेकफास्टच्या हॉलमध्ये सात्विक असा ठराविक ब्रेकफास्ट होता. ताटल्या, वाट्या, चमचे फक्त वाजत होते. बाकी आवाज नाही. ५० स्त्रिया एकत्र जमूनही आवाज नाही बोलण्याचा! मनस्विनीने ब्रेकफास्ट घेण्याआधी चौफेर नजर टाकली. कोणी गृहिणी होत्या, कोणी विद्यार्थिनी, तर कोणी वृद्ध स्त्रिया! मनस्विनीला एकदम हसू आलं, ती ही आता एक वृद्धाच होती. ६० वर्षांची पण अजूनही पांढऱ्या केसांची कोणी दिसली की तिच्या मनात यायचं, म्हातारी आहे वाटतं!

सर्व बायका एकमेकींकडे फक्त पाहत होत्या. कारण बोलायचे नाही एकमेकींशी असा दंडकच पाळायचा होता पुढील १० दिवस! मनस्विनीला हे काही कठीण आहे असं वाटत नव्हतं! सगळ्या अनोळखी व्यक्ती आहेत. काय बोलणार आहोत आपण?

न्याहारी संपवून मनस्विनी आपल्या खोलीत आली. तिला आत शिरता शिरता आणखी एका गोष्टीची मजा वाटली. खोलीला कडी नाही की कुलूप नाही. काल फक्त एका स्वयंसेविकेने ही खोली दाखविण्यासाठी कुलुपाची चावी लावून उघडली; आणि म्हटले की ही चावी व कुलूप नीट ठेवा. शेवटच्या दिवशी लागेल खोली बंद करायला. किती छान स्वातंत्र्य! खोली बंद करायची गरजच नाही दहा दिवस! किल्ल्या सांभाळायला नको की काही नको! रोजची एक कटकट नाही!

खोली तशी अगदी लहान होती! एकच लहानशी

## वात्रटिका
### निर्णय

लहानपणी केले होते पाढे तोंडपाठ
तरीदेखील गणितात त्याची लागे वाट
स्पेलिंग पाठ करणंदेखील त्याने दिलं सोडून
'निर्णय चुकला', **याचंच वाईट वाटतंय राहून राहून''**

**-डॉ. सुमन नवलकर**

खिडकी, तशी उंचावरच! बौद्ध भिक्षू असेच रहात असावेत यापेक्षा लहान खोलीत! बंद करून घेत असावेत स्वत:ला. खिडकी उघडून ती बाहेर पाहू लागली. बाहेर पाऊस नुकताच थांबला होता. लांबवर असलेले डोंगर नुकतेच धुतले गेले होते. त्यांच्यामध्ये आणि टेकडीमध्ये जिथे हा बौद्ध विहार होता त्यावर धुक्याची मंद छाया पसरली होती. खिडकीबाहेरच्या झाडाची एक फांदी पाण्याने निथळत असलेली तिला दिसत होती. दूरवर अगदी सौम्य आवाज ट्रॅफिकचा।

मनस्विनीला थोडे बरे वाटले. ती खोलीतल्या कॉटवर थोडी विसावली. आता आंघोळ वगैरे आवरून पुन्हा ध्यानाला बसायचे आहे. आपल्याला इतके शांत, गप्प रहाणे जमणार आहे का दहा दिवस? बरोबर मोबाईल, पुस्तक काहीच नाही, चष्मा देखील नाही. लिहायला पेन, कागद नाही. सर्व काही आधीच पिशवीत ठेवून दिलेले, जमा केलेले होते काऊंटरवर! रोजचा पेपर नाही वाचायला! किती विचित्र पण ध्यानासाठी योग्य परिस्थिती.

सगळ्या जगापासून दूर, अलिप्त रहायचे हा उद्देश आहे!

गुरुजी म्हणाले त्याप्रमाणे हा स्वत:च्या आत पहाण्याचा एक मार्ग आहे. अजून तर तीन दिवस फक्त श्वासाकडेच पूर्ण लक्ष द्यायचे आहे. मनस्विनीला आठवलं की गरम पाणी फक्त दोनच तास आहे. ती बाथरूममध्ये गेली आणि तिने पाणी सुरू केले. थोड्या वेळाने छान गरम पाणी येऊ लागले. आंघोळ आटपून ती ताजीतवानी झाली आणि परत खिडकीपाशी आली. बाहेरच्या झाडाच्या फांदीवर एक छोटासा पक्षी बसला होता. काळ्या तपकिरी रंगाचा. आपले पंख फडफडवत तो शांतपणे फांदीच्या झोक्यांवर डुलत होता. अरे, या झाडावर बौद्ध विहारासमोर बसला होता म्हणून तो ही मौन पाळून होता वाटतं! मनस्विनी स्वत:शीच हसली.

त्यानंतरच्या ध्यानाच्या सत्रात तिने मनापासून ध्यान लावून स्वत:च्या श्वासाकडे लक्ष देऊन अजिबात हालचाल न करता एका जागी बसण्याचा व एकाग्र चित्त ठेवण्याचा यत्न सुरूच ठेवला. आता तिला गुरुजींचे शब्द अचानकपणे ऐकू येईनासे झाले. मिटलेल्या डोळ्यांपुढे तिला काय काय दिसू लागलं! प्रदीपचा बिछाना, त्याच्या नाका-तोंडातल्या अनेक नळ्या, हॉस्पिटलचा कॉरिडॉर, आयसीयूत असलेली टोकाकडली प्रदीपची खोली! ती दचकली आणि ही सगळी दृष्यं न बघण्याचा, टाळण्याचा प्रयत्न करू लागली. इतके वेळा मला हे का दिसते आहे? प्रदीपला ती काही तरी सांगते आहे, ''अरे तू बरा होणार आहेस, थोडी अधिक कळ काढ'' असं तिला ऐकू येऊ लागलं!'' तुझ्या तोंडाला चव नाही, एकदम तू हॉस्पिटल स्टाफला दूषणं देऊ नको'' असा आवाज तिला तिचाच ऐकू येऊ लागला. काय होतंय हे मला? माझं मन आत्ता तरी शांत होत नाहीये! तेवढ्यात तिची मुलंच येऊ लागली डोळ्यासमोर! तारवटलेल्या डोळ्यांचा सागर तिला सांगतोय, 'आई आज रात्री पण मीच झोपायला येतो आहे. तू घरी झोप घे. दमशील आणि तू आजारी पडशील. मग काय करायचे? क्षणार्धात डॉक्टरांसमवेत आयसीयूमधून बाहेर पडणारी इरा, तिची मुलगी तिला दिसली. तिच्या खांद्यावर थोपटत म्हणत होती, ''आई, अगं चिंता करण्यासारखं काही नाही, बाबांना हॉलूसिनेशन्स होताहेत'' डॉक्टरांकडून सगळं समजून घेतलंय मी, तुलाही सांगीन. तू आत्ता इथे बस, मी केमिस्टकडून औषधे घेऊन येते. मागोमाग थाळीवर डाव ठेवून ठण् ठण् ठण् आवाज! रात्री झोपेतून उठवण्यासाठी प्रदीपने केलेला. आयसोलेशनमध्ये ठेवलेला प्रदीप, दुसऱ्या खोलीतून मला व मुलांना उठवण्यासाठीचं हे साधन! कसली मरणाची झोप येत होती मला! पण हे सगळं काय दिसतंय?'' अपनी सांस की तरफ, सिर्फ सांस की

तरफ अपना ध्यान दो, अंदर जाती हुई सांस, बाहर निकलती हुई सांस सिर्फ देखो! कुछ मत करो, सिर्फ देखते रहो. साक्षीभावसे देखते जाओ, देखते जाओ..... 'मनस्विनी पुन्हा भानावर आली, तिचा देह थरथरला आणि ती पुन्हा एकदा ऐकू लागली गुरुजींचे म्हणणे काय आहे ते! दोनच मिनिटांनी पुन्हा तिच्या मनात आलं की ह्याच श्वासावर जगणं - मरणं अवलंबून! प्रदीपचा श्वास असाच थांबला आणि तो संपला कारण परत त्याला श्वास नाही घेता आला! ''जगणं मरणं एका श्वासाचं अंतर''! बहिणाबाई, किती गं सखे खरं बोललीस!

ध्यानाचे सत्र संपले आणि जेवण, चहा वगैरे आटपले व मनस्विनी खोलीत आली. आज काही ध्यान जमले नाही. मनातले विचारांचे डोंगरच्या डोंगर तिच्या मिटलेल्या डोळ्यांसमोर आडवे उभे ठाकले होते आणि गुरुजींचं म्हणणं, त्यांच्या इंस्ट्रक्शन्स काही तिच्यापर्यंत पोचेनात. कसे तीन दिवस गेले ते मनस्विनीला कळले नव्हते. या तीन दिवसात तिने आपल्या मनातल्या अनेक आठवणींना मिटलेल्या डोळ्यांनी उजाळा दिला होता. आपल्या आत खोलवर पहाणे आणि श्वासावर लक्ष केंद्रित करून फक्त एका जागी बसणे किती अशक्यप्राय होते!

चौथ्या दिवशी मनस्विनी हॉलमध्ये शिरली. गोएंका गुरुजींचे गेले तीन दिवस ध्यान सत्र आणि रात्री डीसकोर्स असं दिवसाचं रुटीन थोडंसं अंगवळणी पडत होतं. आज मात्र देहधारणा सुरू करायची होती. मनस्विनीने पाहिले की तिच्या बरोबरच्या काही बायका सगळं माहित असल्याप्रमाणे वागत होत्या. तिच्यासारख्या नवखेपणाने नव्हे. जणू त्या खूप वेळा इथे येऊन गेल्या होत्या. कधी तरी त्यांना नेमलेल्या शिक्षिकेबरोबर त्या बोलायच्या. काय ते कळायचे नाही. कारण फक्त शिक्षिकेबरोबर बोलणे शक्य होते, एकमेकींबरोबर नाही.

रात्री गोएंकागुरुजी बोलत होते, आपल्या प्रवचनात त्यांनी अनेक विचार मांडले. ते सांगत होते, ''विपश्यना म्हणजे आपण आपल्याला पहाणे. आपण आपले कर्तव्य आपल्या वयानुसार, हुद्यानुसार करीत राहिले पाहिजे. त्या कर्माचे फळ काय असेल ते परमेश्वर बघेल. आपल्याला काळजी करण्याचे कारण नाही. हे कर्मफळही त्या भगवंतालाच अर्पण करायचे आहे आपल्याला.... असे अनेक विचार. ती ऐकत होती आणि तिला सारखे वाटत होते की अरेच्या! आपण गीतेतही हेच शिकलो आहे. हे नवीन असे काही नाही.

विपश्यना म्हणजे बौद्ध धर्माचा प्रसार नव्हे. खरे आहे ते! गोएंकांना कुठलाही एक धर्म श्रेष्ठ असे माणणे मान्य नव्हते. त्यांच्या प्रवचनात अनेकदा ही गोष्ट विविध दृष्टांत देऊन त्यांनी हे सांगायचा आतापर्यंत प्रयत्न केला होता. त्या रात्री मनस्विनी नीट झोपू शकली नाही. तिच्या आयुष्यातले नाना प्रसंग एखाद्या चित्रपटासारखे तिच्या डोळ्यासमोर येत होते. अगदी लहानपणापासून ते आता ६० व्या वर्षापर्यंत ती स्वत:च स्वत:ला झोपेत पहात होती. पण पहाटे चारला गजर झाला आणि दचकून ती उठली की मात्र काही आठवायचे नाही!

मनस्विनी जेवण झाल्यानंतर शेजारच्या मोकळ्या जागेत खूप चालायची तेव्हा मात्र तिचं मन स्वत:शी बोलून बोलून थकलेलं असायचं! इतर सर्वजणी मात्र त्यांच्या त्यांच्या विचारात गढलेल्या असायच्या. मनस्विनीला कळत नव्हते की या बायकांना पण आपल्या सारखंच काही वाटतंय का?

नित्यनेमाने ध्यान करीत असलेली मनस्विनी एका दिवशी स्वत:शी बोलून बोलून व्याकूळ झाली. मन:चक्षुंसमोर काय काय पहात होती ती! प्रदीपचा, आईचा अचेतन देह! तिचे आणि प्रदीपचे सुख दु:ख संवाद! आय केअर मॅडम फॉर यू ॲण्ड युवर जॉब!

## वात्रटिका
### तुमडी

मंत्री झाल्यापासून त्याने
घेतली मोठी गाडी,
गाडीत बसून-बसून सुटली
पोटाची तुमडी
जनता म्हणते, ''पैसे खाऊन
सुटलंय बघा पोट!''
मंत्री म्हणतो, ''तुम्हीच तर
दिलं मला वोट.''

**-डॉ. सुमन नवलकर**

# वात्रटिका

## धडा

शेजारच्या घरात गाण्याचा क्लास
तंबोरा, तबला आवाजाचा त्रास
फोनचा, टीव्हीचा, अभ्यासाचा बोऱ्या
आपापसात उगीचच व्हायच्या मारामाऱ्या
गोळ्या किती घेतल्या, बाम किती लावले
मोठमोठ्याने बोलून घसेदेखील सुकले
दरवाजा ठेवतात आता सतत उघडा
फुकटात घेतात संगीताचा धडा

**-डॉ. सुमन नवलकर**

असा त्याचा आवाज! घर दणाणून सोडणारी तिची आणि त्याची ती भांडणे! मधेच आईचे समजावणे, ''तू ना मनू, आता सगळं सोडून दे आणि ओरडत जाऊ नको! कारण त्याचा तुलाच खूप त्रास होतो.'' ''बाई, वयाच्या मानाने तुम्ही फारच वृद्ध दिसता हो!'' देशमुख बाईंचे खोचक बोलणे! ''काहीही करा आणि मला कोणीतरी किडनी डोनर पहा'' प्रदीपचे आर्जव व त्यानंतरचे दुसऱ्या माणसाचे थंड बोलणे! कॉलेजचे तिचे कलीग आणि त्यांनी केलेले कळत नकळत वेगवेगळे अपमान! इरावतीची म्लान मुद्रा आणि तिचे हरवलेले डोळे! सागरचं गंभीर होणं आणि कधी तरी दोन्ही मुलांचं तिला हेटाळणीच्या रूपात काही बोलणं!

मनस्विनी ध्यान करायला बसली रे बसली की अशी दृश्ये झरझर एखाद्या चित्रपटासारखी तिच्या डोळ्यासमोरून जात होती. देहधारणा कमीच आणि हे असे भूतकाळात जाणे जास्त! दिवसामागून दिवस कालगतीप्रमाणे जात होते. पाऊस रोजच कमी-जास्त प्रमाणात पडत होता. मनस्विनीला वाटत होते की आपण काही शिकत नाही नवे इथे येऊन!

दिवस रात्र हे सत्र! ती अगदी निराश होत होती. गुरुजी रोज सांगायचे, ''आपका ध्यान अपने पुरे, शरीरपरसे गुजारो! अपने सरपरसे शुरू करना है और नीचे पाँवतक धीरे धीरे लाना है! हर अवयव में आपको एक प्रकारकी लहरें, संवेदनाए, महसूस होगी उनको पहचानो और अपना शरीर पूरे संवेदनाओंका मिश्रण है यह महसूस करो! वह संवेदनाए आयेगी आणि जाएगी, दूसरी संवेदनाए जागृत होती इनका अनुभव लेना है।

मनस्विनीचं लक्ष प्रत्येक अवयवांवर तर जात होतं, कधीतरी सूक्ष्म संवेदना मिळत होत्या पण त्या क्षणार्धात लुप्त होत होत्या. तरल अशा संवेदना नव्हत्या मिळत. एक आठवडा उलटून गेला पण तिचे डोळे मिटले की विचारांचे, प्रसंगांचे, संवादांचे लोटच्या लोट तिच्या डोळ्यासमोरून जायचे पण तरल संवेदना काही जाणवत नव्हत्या.

रात्री गुरुजींचा डिसकोर्स तिने ऐकला आणि त्यांनी दिलेल्या दृष्टांतांमुळे तिला ते प्रवचन फार आवडले. बुद्धाचे वर्तन, त्यांनी जगाला दिलेली शिकवण, आपल्या वर्तनातून त्यांनी लोकांची केलेली कानउघाडणी आणि उपदेश हे सगळं ऐकून तिला खूप शांत वाटत होतं. पूर्ण दिवसाचा अस्वस्थपणा कुठल्याकुठे पळून गेला. पण तरीही कुठेतरी मनस्विनीला असं वाटत होतं, हे सर्व आधीच आपल्या कानावर पडलं आहे, आपल्याला कुणीतरी सांगितलं आहे. मग आपल्या आईची तिला प्रकर्षाने आठवण झाली. आज गुरुजी म्हणाल्याप्रमाणे आई पण आपल्याला सांगायची, की कुठलीही वस्तू दुसऱ्याला देताना तिचा मोह मनात ठेवू नये. ती एकदा दुसऱ्याची झाली की तिचा विचारही आपल्या मनात येता कामा नये. वडीलही हे सर्व नुसतं सांगायचे नाहीत तर पाळायचेसुद्धा आपल्या वागणुकीत.

'अ जंटलमन इज ऑलवेज अ जंटलमन'' हे त्यांचं लाडकं वचन होतं. इतके संतापी असूनही बाबा कुणाला रागाच्या भरात अपशब्द, शिव्यागाळी करताना तिने इतक्या वर्षात पाहिले नव्हते. एखादा माणूस आपल्याशी वाईट प्रसंगांमध्ये कसा वागतो त्यावर त्याची संस्कृती कळते आणि आपलीही असं ते नेहमी म्हणायचे.

पुढच्या दिवसांमध्ये मनस्विनी देहधारणा शिकली पण ज्या तरल संवेदना अनिच्यपणे देहातून अनुभवायला मिळायल्या हव्यात त्या तिला सूक्ष्मपणे जाणवल्या. इतर बायका काय आणि कशी प्रगती करताहेत हे जाणून घ्यायची काही सोय नव्हती कारण मौन पाळायचे होते ना! मनस्विनीला निक्षून वाटले की हे मौन काही खरे नाही! आपल्या मनाशी आपण

किती बोलतोय इथे आल्यापासून! अक्षरशः दर सेकंदाला अनिच्य (अनित्य) असा वेगळा विचार. तो गेल्यावर मागे पडल्यावर दुसरा विचार, ही साखळी सुरुच!

गुरुजींची प्रवचने ऐकताना तिच्या एकदम लक्षात आले की आपल्या सगळ्या संतांची वचने हेच तर सांगतातः ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, रामदास सगळ्या संतांची हीच तर शिकवण आहे. गुरुजींच्या प्रवचनात कबीर हा संत वारंवार डोकावला होता, त्याची बोधकारक वचने उद्‌धृत केली होती त्यांनी. पण हे आपले महाराष्ट्रातले संत मराठी भाषेत हे सर्व सांगतात या अडचणीमुळे किंवा आपण मराठी माणसं प्रसिद्धी पराङ्मुख आहोत म्हणून असेल कदाचित! मनस्विनीचे मन कृतज्ञतेने भरून आले.

दहा दिवस उद्या पूर्ण होणार. बाकीच्या सर्व गोष्टींबरोबर कालही अनित्य बदलणारा आहे. आजचा दिवस गेला की गेला, परत येत नाही तो. मनस्विनी ध्यान संपवून खोलीत आली होती. ९ दिवस घरापासून दूर आहोत. घरात कोणी आठवण काढत असेल का? ती स्व:शीच हसली. सागरचं नवीनच लग्न झालंय. उलट दोघं मजेत असतील. साहजिक आहे, नॉर्मल आहे. राजा-राणी दोघंच घरात असतील तर मजेतच असणार. शेवटच्या दिवशी येणार आहे सागर मला न्यायला! इरावती कदाचित म्हणत असेल की आईला यायला दोनच दिवस राहिले आता. ती आठवण नक्कीच काढत असेल. मनस्विनी दचकली. आपण अजून कसे असे या पाशात राहिलो आहोत? अजून माया सुटत नाही आपली. आपल्याला सगळ्यांची आठवण होते इतकंच नाही तर त्यांना आपली आठवण येते का नाही हा पण प्रश्न उभा राहतो मनात!

गुरुजी सांगत होते ''अगर स्पर्धा करनी है तो अपनेही मनसे करो। दूसरोंसे नही! हमारे मनसे वो सब बातें या विचार जिनसे मल मैला होता है उनको बाहर निकालो जिससे मन पवित्र व शुद्ध होगा!.... जैसे भगवान बुद्ध कहते है की इस दुनिया में चार प्रकारके लोग है - १) अंध:कारसे उठकर अंध:कार की तरफ जानेवाले, २) प्रकाशसे अंध:कारकी ओर जानेवाले, ३) अंध:कार से जागकर उजाले की या प्रकाशकी ओर चलनेवाले और ४) प्रकाशसे उठकर प्रकाश ही की ओर चलनेवाले!...

## वात्रटिका
### वेडी कोण?

कानामध्ये इयर-फोन्स
खिशात मोबाईल
रस्त्यात चालते बडबडत
पाहा हिची स्टाईल

मधेच हसते, मधेच थांबते
करते हात-वारे,
रस्त्यामधली वेडी हिला
वळून बघते नारे!

**-डॉ. सुमन नवलकर**

हम अपना भूतकाल तो बदल नही सकते लेकिन अपना आज और कल जरूर बदल सकते है। हर मनुष्यको अपना अतीत भूलकर आज की हकीकतमें जीना चाहिए। यह विपश्यना से ही हो सकता है।

Make an island of yourself, make yourself refuge there is no other refuge. Make thrugh you island, make thruth your refuge, there is on other refuge.....

मनस्विनीने एक मोठा टप्पा पार केला होता, विपश्शनेचा असं तिला वाटलं! गेले किती तरी दिवस अनेक प्रसंग मनाच्या कानाकोपऱ्यातून बाहेर पडून तिच्या बंद डोळ्यांसमोर आले होते. किती माणसं, त्यांचे संवाद, वादविवाद संगळं काही! मान-अपमान दु:ख, सारं काही खरं तर होऊन गेलं होतं! गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे मनातून सगळं बाहेर टाकून द्यायला हवं! जे होऊन गेलं ते परत येत तर नाही! मन मात्र मलीन होऊन जातं!

दहा दिवस पूर्ण झाले. खूप छान एक माहितीवजा फिल्म दाखवली गेली. गोएंका गुरुजी विनोबाजी भाव्यांच्या सांगण्यावरून ब्रह्मदेशातून भारतात आले, किरण बेदींनी त्यांना तुरुंगातील कैद्यांकडून विपश्यना करवून घ्यायला सांगितली, त्यांनी काही कैद्यांमध्ये आमूलाग्र बदल घडवले, मनस्विनी विस्मित झाली होती.

आज सर्वात शेवटचे ध्यानसत्र. मनस्विनी परत

## चिंतनिका
### संकलक: सुहासिनी कीर्तिकर

### कुलूपबंद घर

‘घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती’
या ओळी अनेक घरात सुशोभन करतात
भिंतीचं. पण आज ‘घर’ म्हणजे काय?
लहान मुलं पाळणाघरात,
मोठी माणसं वृद्धाश्रमात,
नवराबायको दिवसभर घराबाहेर...
कारण घराचे हप्ते भरायचेत.
हे हप्तेवाले घर?
त्या घराला दिवसभर कुलूप

*

---

आपल्या जागी ध्यानस्थ बसली. गुरुजींच्या सूचना सुरूच होत्या. आज तिच्या मन:चक्षूसमोर कुणाचेच चित्र नव्हते. देहधारणा करता करता ती आपल्या श्वासाशी, प्राणाशी एकरूप होण्याचा, स्वत:च्या देहाला स्वत:च पहाण्याचा, संवेदना कुठे कुठे आणि कशा जागृत होत आहेत आणि कशा लगेच लुप्त होत आहेत हे पहाण्याचा प्रयत्न हळूहळू सफल होतो आहे असं तिला वाटत होतं! अचानक तिच्या डोळ्यात अश्रू दाटले आणि गालावरून सहजपणे ओघळले! कित्येक महिन्यातून अश्रू दाटले नव्हते आणि बाहेरही आले नव्हते.

आज खोलीत ती परत आली आणि समाधानाने तिने तिचे सामान भरले व बॅग सज्ज केली. तेवढ्यात शेजारच्या खोलीतून मोठ्या गडबडायचा आवाज तिला ऐकू आला. मनस्विनीने दार उघडले. ‘‘आओ ना इधर, हमारे साथ बाते करने’’ तिला बघून एका बाईने बोलावले. हसून मनस्विनीने होकार दिला.

मनस्विनी त्या खोलीत गेली तेव्हा तेथे चार-पाच जणी आधी येऊन बसल्या होत्या. प्रत्येकीने आपली ओळख करून दिली.

ज्योत्स्नाबेन, दोन मुलांची आई आणि गृहिणी ‘‘घरातल्या सर्व कटकटी पासून १० दिवस छुटकारा, रसोईत पण सुटी मिळते, म्हणून मी इकडे येते.’’ असं ती सांगत होती. दुसरी एक छाया नावाची तरुणी म्हणाली, ‘‘माझी सासू घरी छळते आणि ऑफीसमधली सासू म्हणजे बॉस, तो ही तसाच. म्हणून मग ही पळवाट म्हणून इकडे मी येते.’’ लगेच एक डॉक्टरीण होती, ती म्हणाली, ‘‘पेशंटस्, मुलं, घर, नवरा, एवढं सगळं करून मी अगदी दमून जाते, त्यातून मला ही १० दिवसाची रेस्ट मिळते.’’ अशाच काही कारणास्तव ह्या बायका तिथे आल्या होत्या. ‘‘छान वाटतं! फील गुड फॅक्टर’’ हीच कारणं होती सगळ्यांची!

मनस्विनी आपल्या खोलीत परतली तेव्हा तिला असं वाटलं की ध्यान म्हणजे काय? ते कसे करायचे अथवा लावायचे? यावर फारसा विचार ह्या स्त्रिया करतच नव्हत्या तर! अजूनही एकमेकींचे प्रश्न, रोजच्या कटकटी, वैतागाचे प्रसंग एकमेकींना सांगणे चालूच होते. मनस्विनीबद्दल त्या सर्वांनी विचारून घेतलेच होते. तिनेही तिच्या कुटुंबियांबद्दल सांगितले होते आणि ध्यान मार्ग म्हणजे काय हे शिकण्यासाठी ती इथे आली आहे असेही सांगितले.

मनस्विनी परत खिडकीपाशी आली आणि समोरच्या झाडाला निरखून पाहू लागली. झाडाच्या अर्ध्या भागावर लख्ख ऊन पडले होते आणि अर्ध्या भागात सावली होती. प्रत्येक पान अक्षरश: वेगवेगळे दिसत होते. हिरवाच रंग पण किती विविध छटा त्या! कोवळा हिरवा, गडद हिरवा, पिवळट हिरवा, लालसर हिरवा आणि रंगाची छटा सांगता येणे अवघड अशा हिरव्याच्या छटा! माणसांचेही असेच असते! तीही निसर्गाचीच निर्मिती! भगवंताने किती प्रकारची मने, विचारसरणी बनविली आहे!

मनस्विनीला त्या रात्री शांत झोप लागेना. आज प्रथमच दहा दिवसानंतर ती बोलली होती. तिचं मौन जे इतरांबरोबर होतं ते सुटलं होतं! या दहा दिवसात तीच तिच्याबरोबर किती वेळा छान बोलली होती, हसली होती, रडली होती! किती आठवणी पुन: पुन्हा येऊन गेल्या होत्या आणि आता परतायचं होतं नेहमीच्याच जगात! पुन्हा प्रदीपच्या अस्तित्वाशिवायच्या जगात! तिच्या इरा आणि सागरकडे परत जायचं होतं!

सकाळी चार वाजता उठून, जेमतेम आंघोळ करून मनस्विनी तयार झाली. हे असं दुसऱ्याच बाथरूममध्ये आंघोळ करणं तिला जमायचं नाही! किती छोट्या गोष्टींची खोड असते आपल्याला! life is

the series of adjustment असं नव्हते का आपले बाबा म्हणत! इतकं वय झालं, रिटायर झालो पण शिकलो का काही? कपडे बदलता बदलता मनस्विनीच्या मनात आले, खरंच आपण ६० वर्षे जगलो ? इतक्या लवकर ६० वर्षे जगूनही झाले! परतीचा प्रवासही सुरू झाला?

गुरुजी प्रवचनात सांगत होते, आयुष्य सार्थकी कसे लावाल ते. मरणसमयी ज्याच्या मुखात भगवंताचे नाम येते त्याचे आयुष्य सार्थकी लागले.'' नर नारी बाळे अवघा नारायण। ऐसे माझे मन करी देवा। असे तुकारामांनी देवाला आवर्जून सांगितले. आता तेच गुरुजी सांगत होते. दुर्जनांमध्येही देवाचा अंश हा असतोच. त्यांच्याकडूनही काही वेळा लोक कल्याणाची कामे होत असतात. तो भगवंतच करून घेत असतो.

मनस्विनीच्या मनात परत विचारांचे ढग साचले पण त्यांचा निचरा एका वेगळ्या आनंदात होऊ लागला होता. प्रवचन संपले होते आणि विपश्यनेचा तो कोर्सही संपला होता.

चहा-कॉफी-दूध परत सगळ्यांना, हवे असेल तर आहे असे प्रसन्न चेहऱ्याने सांगत स्वयंसेविका मनस्विनीसमोर आली. तिला मनस्विनीने नमस्कार केला. आपण तृप्त झालो आहोत असे मनाशी म्हणून स्वत:ची बॅग उचलून मनस्विनी पुढील हॉलमध्ये आली. तिने तिचा चष्मा, पुस्तक, पैसे व मोबाईल ताब्यात घेतला. कोर्ससाठी पुढच्या साधकांसाठी मदत म्हणून छोट्याशा रकमेचा एक चेक दिला आणि मोबाईल सुरू केला. एक मेसेज तिच्या बघण्याची वाट पहात होता. ''आई, मी तुमच्या या बिल्डिंगसमोर गाडी घेऊन आलो आहे, तुझी वाट पहातो आहे. लवकर बाहेर ये.''

ती सर्वांचा निरोप घेऊन लगबगीने बाहेर आली. समोर गाडी उभी होती. तिला पाहून तिचा लाडका लेक सागर बाहेर आला आणि त्याने तिची बॅग घेतली. गाडीत बसल्यावर त्याने बोलणे सुरू केले तेव्हा मनस्विनी परत आपल्याशीच म्हणत राहिली ''आता खरंच चॅलेज आहे, परीक्षा आहे, जे शिकले ते तंतोतंत प्रत्यक्षात उतरविण्याची. गुरुजी त्यांच्या शिकवणूकीतून आपल्या संतांसारखे, आपल्या पाठीशी आहेत. आधुनिक संत ज्यांना आपण मानतो ते गाडगेबाबा, बाबा आमटे नेहमी सोबत करतात.

''सुख, दु:ख, मनाच्या सर्व अवस्था अनिच्य... संकटं अनिच्य, आनंद अनिच्य...

आयुष्यही अनिच्य... म्हणून आनंदाने जगून घ्यावे, आनंद पसरवावा, आपल्या आत खोलवर पाहून अंतर्मुख व्हावे आणि शांतपणे भगवंताचे नामस्मरण करीत मृत्यू जेव्हा या देहाला येईल तेव्हा श्वासही शेवटचा आनंदाने घ्यावा आणि आपले अस्तित्वही अनिच्य... करावे...'

सागरकडे प्रसन्नतेने पाहून ती हसली आणि तिच्या समोरचा खडकाळ, नागमोडी रस्ता पार करण्यासाठी एकदम सज्ज झाली.

✳

## BEST FRIENDS

**-Aarati Jayesh Kothare**

Best friends are the ones who tell us the spimplicity of rice and curd,

They are the ones who understand our feelings without we saying a word.

Only they support us in our difficult times, and calm us down with their own sweet rhymes.

They can walk with us through all the roughs, Everone says to break them is very tough.

I wish my best friend should be like this, who would always support me and never ever hiss.

One who would miss me a lot,

Even on a day very hot.

The one who would be my best friend, who would always care for me and try to defend.

Who wil say, "I will be there for you whold life long"

"To hear from you, your good-bad song"

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

उद्यम्

# सगळ्यांचा आवडता फास्ट फूड व्यवसाय

**⁎ सुदेश प्रबोध देसाई ⁎**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

फास्ट फुडचे प्रॉडक्ट न आवडणारी व्यक्ती क्वचितच मिळेल. मार्केटमध्ये कितीही मंदी असली तरी फास्टफुडचा व्यवसाय जोमातच चालतो. फास्टफुडचा व्यवसाय पटकन् नफा देणारा असतो. भारतामध्ये फास्टफुडचा व्यवसाय खूप झपाट्याने वाढत आहे. फास्टफुडचे प्रॉडक्ट खूप स्वादिष्ट, टेस्टी व स्वस्तात मिळतात. फास्टफुडच्या दुकानामध्ये मिळणारे प्रॉडक्ट मिसळ पाव, बटाटावडा, कांदा भजी, मूग भजी, कांदा पोहे, उपमा, इडली सांबार, मेदूवडा, मसाला डोसा, उत्तप्पा, मैसूर मसाला डोसा , दाबेली, पावभाजी, फ्रॅन्की, पिझ्झा, बर्गर, Egg Special, Chinese Special, Chikan Special व इतर. आपण आपले फास्ट फूड सेंटर फक्त एकाच प्रॉडक्टवर चालवू शकतो. उदा. मिसळ स्पेशल फास्ट फूड सेंटर किंवा विविध प्रकार असलेले फास्ट फूड सेंटर. तर आपल्याला चॉईस भरपूर आहे आणि आपल्याकडे थोडी कल्पकता असेल तर आपण बरेच Innovative प्रॉडक्ट Launch करू शकतो.

आपल्याला फास्टफूड सेंटर चालवायचे असेल तर आपल्याला असे विचार येतात की, कूक कुठून आणायचा? व कच्चा माल रोज पहाटे कसा आणायचा? ह्यावर सोपा उपाय आहे. आपल्याला सगळे प्रॉडक्ट Ready to Fry form मध्ये मिळतात. (बटाटावडा, समोसा, साबुदाणा वडा, साबुदाणा खिचडी, उपमा, शिरा, पोहे, बर्गर, पॅटीस असे अनेक प्रॉडक्ट आपल्याला चांगल्या Quality चे व स्वस्त दरात मिळतात.) त्यामुळे आपल्याला कूकवर अवलंबून रहावे लागत नाही. तसेच आपल्याला हिशोबपण बरोबर ठेवता येतो.

**फास्ट फुड सेंटरमध्ये कोल्हापुरी मिसळ रेसिपी:**

***साहित्य :***

| क्र. | **साहित्याचे नाव** | **माप** |
|---|---|---|
| १. | कच्चे बटाटे | ३०० ग्रॅम |
| २. | मटकी | १०० ग्रॅम |
| ३. | सुके खोबरे | ६० ग्रॅम |
| ४. | खसखस | २५ ग्रॅम |
| ५. | धने | २५ ग्रॅम |
| ६. | जिरे | १० ग्रॅम |
| ७. | तीळ | ५० ग्रॅम |
| ८. | लसूण | १२ ग्रॅम |
| ९. | लवंग | ५ ग्रॅम |
| १०. | काळी मिरी | ५ ग्रॅम |
| ११. | तेल | १० टिस्पुन |
| १२. | चिरलेला कांदा | १५० ग्रॅम |
| १३. | आले | २ ग्रॅम |
| १४. | फरसाण | ५०० ग्रॅम |
| १५. | महालक्ष्मी चिवडा | ५०० ग्रॅम |
| १६. | कोथिंबीर बारीक चिरलेली | १०० ग्रॅम |
| १७. | सर्व्ह करायला कच्चा बारीक कांदा | २५० ग्रॅम |
| १८. | पाव | ३० नग |
| १९. | हळद | ४ ग्रॅम |
| २०. | लाल मिरची पावडर (२० ग्रॅम तिखट २० ग्रॅम बिनतिखट) | ४० ग्रॅम |
| २१. | कोल्हापुरी मिसळ मसाला | ३ ग्रॅम |
| २२. | लिंबू | ४ नग |

**कृती :**

१ बटाटे उकडून चिरावेत.

२ मटकी वाफवून घ्यावी.

३ खसखसपासून काळी मिरीपर्यंत सर्व मसाले तेलावर परतून घ्यावे.

४ सुके खोबरे भाजून घ्यावे.

५ कांदा तेलावर परतावा.

६ परतलेला मसाला, कांदा, आले सर्व पाणी घालून वाटावे.

७ वाफवलेली मटकी व उकडलेला बटाटा थोडे तेल गरम करून फोडणी करून उसळ घालावी.

८ १० टिस्पून तेल गरम करावे. रंगवाली मिरची पावडर घालावी व वाटलेला सर्व मसाला तेलावर घालून उकडून घ्यावा.

९ ह्या तयार मसाल्यावर शेवटी कोल्हापुरी मसाला घालावा.

१० मिसळ सर्व्ह करताना आधी उसळ, त्यावर फरसाण, चिवडा, कच्चा बारीक कांदा, कट, कोथिंबीर, लिंबू फोड व पावाबरोबर सर्व्ह करावा.

आपल्याला फास्ट फूड सेंटर चालू करायचे असेल तर कमीत कमी ८० ते १०० स्क्वे. फूट जागा लागेल तर फास्ट फूड सेंटरमध्ये किती नफा होऊ शकतो ते बघुया.

आपण फक्त मिसळीचे सेंटर चालू केले तर आपल्याला रु. १८ ते २० प्रति प्लेट खर्च येतो.

मार्केटमध्ये ६०, ८०, ९० रुपये प्रति प्लेट विकली जाते. जर आपण दिवसभरात फक्त २००० प्लेट सर्व्ह केल्या आणि आपण ६० रुपयाना विकली तर आपल्याला ४० रुपये नफा प्रति प्लेट फायदा होईल.

२००० x ४०= ८०,०००रुपये फायदा एका दिवसाचा

८०००० x ३० दिवस = २४,००,००० रुपये फायदा एका महिन्यास

२४,००,००० x १२ महिने = २,८८,००,००० रुपये फायदा एका वर्षास

असा फायदा आपल्याला कोणतीही नोकरी देणार नाही. बरं आपण फक्त मिसळच विकणार नाही, तर त्याबरोबर इतरही प्रॉडक्ट विकणार आहोत आणि आपण घरपोचही देणार आहोत त्यामुळे आपला व्यवसाय अधिक वाढेल.

फास्टफूडचा व्यवसाय करण्यासाठी लागणारे साहित्य :

१ कमीत कमी ८० ते १०० फूट जागा मोक्याच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे . जागा भाड्याची असेल तरी चालेल.

२ फास्ट फूड सेंटरमध्ये इलेट्रिक वा गॅस फायर, फ्रीजर, मायक्रोवेव ओव्हन, Assembling table, डिस्पले बोर्ड यावरील साहित्यासाठी साधारण १ ते १.५० लाखापर्यंत खर्च येईल. जर आपली जागा मोक्याच्या ठिकाणी असेल तर रोजचे २००० प्लेटस् विकणे सहज शक्य आहे. हा व्यवसाय सोपा व कमी खर्चामध्ये चालू करून भरपूर नफा देणारा आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क:
sudesh69desai@gmail.com
मोबाईल : ९२२३३५७२०७

*

## व्यंगचित्र



लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# संवाद

**✶ हेमंत विनायक तळपदे ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारत सार्वभौम झाला. अनेक पुढाऱ्यांनी आपले तन, मन, धन या देशाच्या सेवेसाठी समर्पित केले. अनेक कार्यकर्त्यांनी लाठीमार खाल्ला. प्रसंगी गोळ्याही झेलल्या. प्राणांची आहुतीही दिली. या सगळ्या बाबींकडे आज त्रयस्थ नजरेने पाहिले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती म्हणजे हिन्दुस्थानी नेते आणि तत्कालीन ब्रिटीश सरकार यामधील सुप्त संवादाची प्रक्रिया.

तसे पहाता १८५७ चा उठाव अयशस्वी होण्यास या संवादाची कमतरता प्रमुख कारण ठरली. तत्कालीन राजे, सरदार, बंडखोर, सैनिक आणि जनता यांचा या उठावाच्यावेळी असणारा विसंवाद प्रमुख होता. नेत्यांची धोरणे सैनिकांना स्पष्टपणे उमजत नव्हती. सर्वत्र मानसिक गोंधळ होता. दारुगोळा कमी, नक्की काय करायचे? हेही तितकेसे स्पष्ट नव्हते. याउलट ब्रिटीश सरकारकडे संवादाची स्पष्टता होती. इंग्रज पलटणीच्या सैनिकांना स्पष्ट आदेश दिले जात. अद्यावत तोफा, बंदुका यांची उपलब्धता होती आणि विशेष म्हणजे ब्रिटीश अधिकारी अन् सैनिक यांच्यात सुसंवाद होता आणि याच सुसंवादाची परिणती हिन्दुस्थानी आंदोलन अयशस्वी ठरण्यास कारणीभूत ठरली.

१८८५ ते १९०५ हा तसे पाहता मवाळ नेत्यांचा कालखंड मानला जातो. परंतु या काळात खऱ्या अर्थाने दादाभाई नवरोजी, मोतीलाल नेहरू इत्यादी प्रभृतींनी ब्रिटीश सरकारशी सुसंवाद ठेवला व भारतीयांना आवश्यक असणाऱ्या सुविधा पदरात पाडून घेतल्या असेच म्हणावे लागेल.

त्यानंतर १९०५ ते १९२० हा लोकमान्य टिळक. लाला लजपतराय इत्यादी प्रभृतींचा जहाल कालखंड. त्यांनी या संवादाचे स्वरूप जहाल ठेवले. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवणारच' असे लोकमान्य टिळकांनी ब्रिटीश सरकारला ठणकावून सांगितले. तेव्हा हा संवाद टिळकांच्या आत्मगौरव अस्मितेचा एक भाग होता.

त्यानंतरचा कालखंड गांधीयुग म्हणून मानला जातो. महात्मा गांधींनी या संवादाचा नूरच पालटला. ब्रिटीश सरकारकडून आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी त्यांनी सत्याग्रहाचे प्रभावी संवादशस्त्र उभारले. प्रत्येक जहाल किंवा कठोर संवाद आपले इप्सित ध्येय यशस्वी करते हा भ्रम गांधीजींनी खोटा ठरविला. तर आत्मसंक्रमित परंतु निग्रही संवाद फारच परिणामकारक ठरतो हे त्यांच्या कृतीतून स्पष्ट झाले. आणि तत्कालीन नेते, जनता, कार्यकर्ते यांच्या इच्छाशक्तीमुळे या देशाला स्वातंत्र्य मिळाले.

असो. इतका उहापोह करण्याचा उद्देश संवादाची ताकद कशी असते याचे भूतकालीन दर्शन करण्याचा होता. हा संवाद जेव्हा कौटुंबिक पातळीवर उतरतो तेव्हा त्याचे मोल प्रत्येकालाच उमजते. सध्याच्या धावपळीच्या जगात पती-पत्नी, आईबाबा, मुलगा-मुलगी एकाच फ्लॅटमध्ये रहातात. पण बऱ्याचदा त्यांच्यात चांगला संवाद असतो असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कारणे कोणतीही असोत. जसे ऑफिसमध्ये भरपूर काम असते, संध्याकाळी गृहिणी घरकामे करून दमलेली असते, बाबूची शाळा, ट्यूशन, कराटेक्लास यांच्या वेळेचा ताळमेळ जमविताना दमछाक होते. राधा कॉलेज, शिकवण्या, गायन

क्लासमध्ये गुंतलेली आहे. इत्यादी. पण खरे पहाता कुटुंबातील प्रत्येक घटकाने आपल्या कुटुंबासाठी थोडातरी वेळ राखलाच पाहिजे. जमले तर रात्रीच्या भोजनाच्यावेळी सर्वांनी एकत्र जेवावे. त्यावेळी टी.व्ही. बंद ठेवावा. आजी-आजोबांनी त्यांच्या अनुभवसिद्ध जीवनातील अनुभव सांगावेत. बाबा आणि आईने आपल्या चांगल्या संवादातून बाळांना मनाने जवळ ओढावे. मुलांनी आई, बाबा, आजी, आजोबा यांच्याशी केलेल्या संवादातून मनाला नवीन उभारी द्यावी. असो.

हाच संवाद आपणा सर्वांना समाजात वावरताना बरीच मदत करतो. ज्या इमारतीत आपण रहातो, ज्या इलाख्यात आपले वास्तव्य असते. तेथील परिचित लोकांशी आपण सुसंवाद ठेवला तर आर्थिकदृष्ट्या काहीही खर्च येत नाही. पण एक चांगली व्यक्ती म्हणून आपली छाप कळत नकळत आपल्या आजूबाजूच्या जनमसुदायावर चांगलीच पडते. ऑफिसात, कारखान्यात आपण आपले व्यवस्थापक, मालक, आपल्यापेक्षा कनिष्ठ स्तरावर काम करणारे कामगार यांच्याशी चांगला संवाद करू शकतो. यासाठी केवळ आपल्या मनातील अहंकार, पूर्वग्रह, इतरांविषयीचा आकस इत्यादींना दूर ठेवणे जरूरीचे असते.

माझ्या मते विसंवादाची उगमस्थाने सामान्य वाटली; तर ती कधीकधी भयानक संहारकलेचे रूप घेतात. 'आंधळ्याचे पुत्र अंधच आहेत का?' या द्रौपदीच्या एका विसंवादाने महाभारताची परिणती कुलनाशास कारणीभूत ठरली. याउलट सुसंवाद मानवाला मन:शांती देतोच; पण ती व्यक्ती आपल्या बरोबरच्या व्यक्तीच्या मनावरील ताण कमी करते.

माझ्या मते अबोला हेदेखील विसंवादाचे एक रूपच म्हणावे लागेल. पती-पत्नीमध्ये एखादी गोष्ट खटकली तर दोघेही दोन-चार दिवस अबोला ठेवतात. पण या उलट दोघांनीही समजुतीने सुसंवाद केला तर त्या विसंवादाचे मूळ स्पष्ट होऊन ते दोघेही सुखी जीवन जगू शकतात.

आज राजकीय अथवा राष्ट्रीय पातळीवरही या विसंवादामुळे अनेक प्रश्‍न प्रलंबित आहेत. जर प्रत्येक राष्ट्राने मनोमन असे ठरविले की सर्व समस्या सुसंवादाने सोडवून संपूर्ण मानवजातीचे भले करू, तर तोफा, क्षेपणास्त्रे, बॉम्ब, बंदुका यांची जराही गरज उरणार नाही.

तर मित्रहो, सध्या एवढेच सांगेन की जमेल तेवढा सुसंवाद करा आणि सर्वांचे जीवन आनंदमयी करा.

आपणा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

*

**कविता**

# LIVING BY NORMS

**-Shaunak Jayakar**

**I am a grown up boy,
Adult what the society calls,
I still play lego and hotwheels,
Is it outside the society norms**

**I wear all high end brands,
Hermes, Versace to name a few,
But I don't like to show off,
Why society looks with eww!**

**I feed myself everyday,
Yet nothing to my Insta feed,
`Don't I have a life?' I'm asked
guess so social life is must indeed!**

**I love the colour pink,
Unusual they say for a boy,
Genders wear their hues,
Society laughs at me, but why?**

**If you outstand the crowd,
Why is it not accepted?
Different doesn't mean disabled,
Yet society treats you rejected!**

*

व्यंगचित्रमाला

# लग्नसराई

**डॉ. सुमन नवलकर**



**लेख**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# क्रीडाक्षेत्रात करिअर करा

**✶ विश्वास नारायण अजिंक्य ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

शालेय अथवा महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना खेळातदेखील सहभागी झाल्यास त्याचा फायदा आयुष्यभरासाठी होतो. आपल्याकडे खेळाला केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून पाहिले जाते. खेळ म्हणजे अभ्यासातून वेळ काढून मनावरचा ताण दूर करण्याचे साधन समजले जाते. पण आता ही मानसिकता बदलायला हवी. क्रीडाक्षेत्रातही कारकीर्द करण्याची उत्तम संधी आहे. खेळाकडे पहाण्याचा सरकारी दृष्टिकोनही आता बदलला आहे. आज राज्यात शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. खेळाडूंना वैयक्तिक व सांघिक नैपुण्य दाखविण्याची संधी ही खेळाच्या माध्यमातून मिळत आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच खेळांनाही महत्त्व द्यावे यासाठी सरकारने क्रीडाधोरणच तयार केले आहे. स्पोर्टस् ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून तरूणांना खेळाकडे आकर्षित करण्याचा व त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न सरकारने सुरू केला आहे.

मारून मुटकून कोणाला खेळाडू बनवता येत नाही. त्यासाठी स्वत:ला त्या खेळाचे आकर्षण असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येकाच्या आकर्षणाचे केंद्र वेगवेगळे असते. कोणाला क्रिकेट आवडेल तर कोणाला फुटबॉल. कोणाला नेमबाजी तर कोणाला बॉक्सिंग. तर काहींना कॅरम, बुध्दीबळसारखे बैठे खेळ आवडतील. खेळात कारकीर्द करण्यासाठी हॉकी, टेनिस, अॅथलेटिक्स, स्विमिंग असे कितीतरी खेळ आहेत. खेळामुळे शारीरिक क्षमतेबरोबरच व्यक्तीतील इतर महत्त्वाच्या गुणांचा विकास होतो. खेळामुळे शारीरिक व्यायाम तर होतोच, पण त्याचबरोबर नेतृत्व गुण, खिलाडूवृत्ती, एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती वाढते. तसेच एकाग्रता, सहनशीलता, आत्मविश्वासदेखील वाढतो. तसेच ताण-तणावापासून मुक्ती मिळविण्यासाठी खेळाला मानवी जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठीच प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आवडत्या खेळात सहभागी व्हायला पाहिजे. कारण खेळातील सहभागामुळे शरीर व मन स्वस्थ राहून स्वत:चे ध्येय प्राप्त करता येते. आरोग्य हा मुलांच्या सर्वांगीण विकासामधील महत्त्वाचा घटक आहे. मुलांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर त्यांचे स्वास्थ्य चांगले पाहिजे. बदलत्या जीवनशैलीमुळे सर्वांचेच शारीरिक कष्ट कमी झाले आहेत. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगामध्ये शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम नागरीक तयार करणे आव्हान बनले आहे. तंत्रज्ञानाशिवाय तर पर्याय नाहीच. पण खेळाला देखील नाही.

खेळातील विविध शारीरिक हालचालींमुळ, मुलांवरील ताण तणाव कमी होतो. आनंदी व तणावरहित मुले जास्त कार्यक्षम असतात. म्हणूनच शालेय जीवनात खेळाचे महत्त्व आहे. खेळामुळे शिस्त, जिद्द हे गुणदेखील वाढतात. विद्यार्थ्याची योग्यता पारखण्याचा एकमेव मापदंड म्हणजे, परीक्षेत मिळणारे गुण; अशी परिस्थिती बहुतेक घरामध्ये असल्यामुळे, शाळा, क्लास, संगणक, मोबाईल या सर्वांमध्ये तो मैदानी खेळ साफ विसरून गेला आहे. मैदानी खेळसुद्धा मोबाईल आणि संगणकावरच ही मुले खेळतात. या सर्वातून विद्यार्थ्याची नैसर्गिक वाढ, विकास, अंगभूत क्षमता, त्यांच्या मानसिक गरजा लक्षातच येत नाहीत. परीक्षेतील गुण म्हणजे पुढील आयुष्यात यश आणि समाधान मिळविण्याचा एकमेव मार्ग मुळीच नाही. जीवनात यश प्राप्त करायचे असेल तर वेळेचे नियोजन, समुहात काम करायची क्षमता,

स्वत:च्या व इतरांच्या भावना समजणे, इतरांशी संवाद साधता येणे, नेतृत्व गुण असणे यासारखी जीवनकौशल्ये अंगी असावी लागतात. ही सर्व कौशल्ये, मैदानावर समूहात खेळताना आपोआप अंगी बाणली जातात; विकसित होतात. बालवयापासूनच नियमितपणे खेळ खेळण्याची गोडी लावून घेतल्यास, त्यातूनच उत्कृष्ट क्रीडापटू तयार होतो. निवडलेल्या खेळात विशेष प्राविण्य मिळविण्यासाठी उन्हाळी अथवा दिवाळीच्या सुट्यांमध्ये खेळशिबिरात प्रवेश घेतल्यास, विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सूक्ष्म क्षमतांचा विकास होईल. खेळ हा विजय आणि हार यांचा सामना करण्यास शिकवतात. पराभव पचवण्यास शिकवतात. हरण्यामुळे आपल्यातील कमतरता शोधून नवीन उमेदीने पुढच्या वेळी जिंकण्याचा प्रयत्न करतात. जिंकण्यामुळे मुलांमध्ये नव्या उत्साहाचा संचार होतो. खेळ नियमांचे पालन करण्याची सवय लावतात.

पूर्वी कुस्ती, कब्बडी, विटी-दांडू, लपंडाव, लगोरी इत्यादी खेळ कुठेही फावल्या वेळेत मुले खेळत असत. मात्र अलिकडे मुले एकत्र येऊनही या खेळांऐवजी आपापल्या मोबाईलमध्येच दंग असतात. खेळ न खेळल्याने तोटेसुद्धा होतात. आळस येतो. स्वभाव एकलकोंडा होतो. तरीही क्रीडाक्षेत्रात करिअर होऊ शकत नाही, म्हणून अनेक पालक मुलांना लहानपणापासूनच खेळापासून दूर ठेवतात. ही मानसिकता आता बदलायला हवी. क्रीडाक्षेत्रातही उत्तम कारकीर्द करता येते. आजच्या घडीला कॉर्पोरेट जगता नंतर सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणारी नोकरी म्हणजे क्रीडाउद्योग ठरला आहे. खेळाडूही करोडपती होऊ लागला आहे.

क्रिकेटमध्ये ग्लॅमर आहे, पैसाही आहे. म्हणूनच इतर खेळांच्या मानाने क्रिकेटकडे आकर्षित होणाऱ्यांची संख्या जास्त आहे. बिलीयर्डस् हा खेळ भारतीयांना फारसा माहितही नव्हता. पण मायकेल फरेरा आणि गीत सेठी यांनी बिलीयर्डस्मध्ये विश्वविजेते पद मिळवून हा खेळ आपले करिअर म्हणून निवडला. तत्पूर्वी हा खेळ विशिष्ट क्लब्ज् अथवा शिबिरांमध्येच खेळला जात होता. त्यामुळे याला श्रीमंती थाट मानला जात असे. आता चित्र पूर्णत: बदलले आहे. आज संपूर्ण देशात स्नूकर हाऊस, बिलीयर्ड रूम्स निर्माण झाल्या आहेत. घोडेस्वारी हा तर भारतातील प्राचीन खेळ. राजे महाराजे त्यांच्या काळात मनोरंजनासाठी हा खेळ खेळत. यानंतर इंग्रजांनी या खेळाला प्रसिद्धी मिळवून दिली. भारत सरकारनेही या खेळाचे पुनरूज्जीवन करत इक्वेस्ट्रीयन फेडरेशन ऑफ इंडियाची स्थापना केली. या खेळात करिअर करायचे असेल तर, दिल्लीचा चिल्ड्रन्स रायडींग क्लब उत्तम पर्याय आहे. गेल्या काही दिवसात नौकायन अर्थात 'याचिंग'ची प्रसिद्धी झपाट्याने वाढत आहे. द याचिंग असोसिएशन ऑफ इंडिया भारतात या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे. हॉकी हा तर भारताचा राष्ट्रीय खेळ. पण गेल्या काही दिवसांपासून या खेळाकडे सरकारचे साफ दुर्लक्ष झाले आहे. फुटबॉलसाठीही विविध क्लब्ज् कार्यरत आहेत. बुध्दीबळ हा खेळ भारतात अतिप्राचिन मानला जातो. शालेय स्तरावर ते आंतरराष्ट्रीय स्तरावर या खेळाचे सारखेच महत्त्व आहे. भारतातील अत्यंत जुना खेळ असूनही या खेळाकडे दुर्लक्ष केले गेले. परंतु विश्वनाथ आनंदने या खेळात भारताचा झेंडा इतका भक्कम पणे रोवला आहे की या खेळाला आता भारतात महत्त्वाचे स्थान आहे. याखेळाच्या प्रशिक्षणासाठी ऑल इंडिया चेस फेडरेशन ने राष्ट्रीय केंद्राचीही स्थापना केली आहे. टेनिस, बॅडमिंटन या खेळांनासुद्धा चांगले ग्लॅमर आले आहे. या खेळांबरोबरच नेमबाजी, तिरंदाजी, अँथलेटिक्स, स्विमिंग, बॉक्सिंग, कुस्ती या खेळातही करिअर करण्याची उत्तम संधी आहे.

रिओ ऑलिंपिकमध्ये भारत पदकांचे खाते उघडतो किंवा नाही याबाबत प्रत्येक भारतीयाच्या मनात शंका निर्माण होत असताना, साक्षी मलीक ने कुस्तीत कास्य पदक जिंकून १२५ कोटी भारतीयांची शान राखली. तर बॅडमिंटन पटू पी. व्ही. सिंधुने रौप्य पदक मिळवून सर्व भारतीयांची मान उंचावली. शुटींग मध्येही अंजली भागवत, राही सरनोबत, तेजस्वीनी सावंत, हिना सिध्दू यांनी देदिप्यमान कामगिरी केली आहे. तर धावपटू हिमा दास ने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तसेच आशियाई क्रीडास्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले. पण तसे पाहिले तर इतर देशांच्या तुलनेत आपली एवढी मोठी लोकसंख्या असूनसुद्धा पदक मिळविण्याच्या बाबतीत आपण इतके मागे का?

यावर विचार करणे आवश्यक आहे. खरे तर खेळाची सुरूवात प्राथमिक शाळेपासूनच व्हायला पाहिजे.पण मुले खेळण्यात जास्त वेळ घालवू लागली, तर पालकांची ओरड ठरलेली असते. खरं म्हणजे मुलांनी सकाळी किंवा संध्याकाळी थोडा वेळ तरी खेळणे आवश्यक आहे. पण आज मुलांची सकाळची किंवा संध्याकाळची वेळ ही शिकवणीत जाते. मुलांना शालेय जीवनातच उत्तम मार्गदर्शन मिळाले; गुरू मिळाला, तर ते अनेक स्तरावर आपले नाव व किर्ती मिळवू शकतात. म्हणूनच मुलांना विविध खेळांबाबत जागृत करून त्यांना खेळाकडे आकर्षित करणे आवश्यक आहे. बालवयातच खेळाची आवड निर्माण करून, प्रतिभावान खेळाडू घडविणे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करणे हे राज्य सरकारच्या क्रीडाधोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठीच जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय क्रीडास्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना दहावी व बारावीच्या परीक्षेमध्ये क्रीडागुण देण्यात येतात. तसेच राज्यपातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना अकरावी प्रवेशासाठी विशेष सवलत देऊन उपजत क्रीडा गुण असलेले खेळाडू, खेळाकडे आकर्षित व्हावेत म्हणून त्यांना तीन टक्के जागा राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचबरोबर अत्युच्च गुणवंत खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत पाच टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच गट अ आणि ब या सेवेत खेळाडूंची थेट नियुक्ती करण्याचा निर्णयदेखील सरकारने घेतला आहे. आपल्या कामगिरीने राज्याचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केलेल्या खेळाडूंना वृध्दापकाळात सन्मानाने जीवन जगण्यासाठी सरकारतर्फे त्यांना मानधन देण्यात येते.

राज्यात आज ठिकठिकाणी 'क्रीडा प्रबोधिनी' कार्यन्वित आहे. क्रीडा व युवक संचालनालयातर्फे क्रीडा प्रबोधिनीतील प्रवेशाकरता विविध चाचण्या घेतल्या जातात. अंतिम प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करून क्रीडा प्रबोधिनी साठी प्रवेश निश्चित केला जातो. तर राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य प्राप्त कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना क्रीडा प्रबोधिनीत थेट प्रवेश दिला जातो. क्रीडा प्रबोधिनीमध्ये ज्युडो, जिम्नॅस्टिक, हॉकी, शूटिंग, फुटबॉल, जलतरण, डायव्हिंग, अँथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, तिरंदाजी, हँडबॉल, टेबल टेनिस, वेटलिफ्टींग व बॉक्सिग अशा १५ क्रीडा प्रकारात मार्गदर्शन केले जाते. क्रीडा प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षणार्थीला विविध खेळांचे तज्ञ व मार्गदर्शकांकडून तंत्रशुद्ध प्रशिक्षण सकाळ व संध्याकाळ अशा दोन सत्रात दिले जाते. प्रशिक्षणार्थी खेळाडूंचा निवास, भोजन, शिक्षण, खेळ, गणवेश या बाबतचा संपूर्ण खर्च शासनामार्फत केला जातो. बालवयापासूनच नियमितपणे खेळ खेळण्याची गोडी लावल्यास त्यातूनच उत्कृष्ट क्रीडापटू तयार होतील आणि त्यांना क्रीडा क्षेत्रात कारकीर्द करता येईल .

*

**कविता**

# THE WINTER

**-Aarati Jayesh Kothare**

When the sun shines mildly,
And the heaven comes down the sky,
There comes the winter yes the winter,
waving me a pleasant "Hi!"

The sky goes blue - clearly blue,
with no clouds that high,
But always there are fogs and mists,
Ready to come down and lie.

Wet clothes which the women hung,
Do not always dry,
Causing them to make faces
And a long lasting sigh.

Yet I see the smiley faces,
On the dew, which on leaves lie,
And fall off in the cold soil,
Letting their sparkle die.

*

## अनुवादित कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# मार्जिनलाइज्ड

मूळलेखिका **ईला आरब मेहता**

✶ अनुवाद **सुहासिनी कीर्तिकर** ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

शहराच्या मध्यावर बाग. बाग कसली? एक त्रिकोणाकार हिरवा तुकडा होता. शांतीलाल शहा चॅरिटेबल ट्रस्ट उद्यान असं लांबलचक नाव असूनही लोक म्हणूनच काटछाट करून तिला शांतीबाग म्हणत. ट्रस्ट तरीही खूप काळजी घेई बागेची. मेंदीचं उंच कुंपण, बारमास फुलणारी लहान लहान रंगीत फुलझाडं, रंगीबेरंगी पानं असणारे मनीप्लँटस्, फिरायला मधोमध पक्का बांधलेला रस्ता, दिवंगताच्या स्मृत्यर्थ मांडलेली बाकडी-यामुळं ती बाग खरोखरची शांतीबाग वाटायची. चहूबाजूंनी वाहनांनी वर्दळलेल्या रस्त्यांच्यामध्ये ही बाग आत्ममग्न अशी होती.

या बागेतील बदामाच्या झाडाखाली ठेवलेल्या बाकड्यावर निवृत्त प्राध्यापिका इन्दु रोज सकाळी बसायची. सोबतीला असायचं उमाशंकर नाहीतर सुंदरमच्या कवितेचं पुस्तक. नाहीतर कधी काळी शिकवलेला एखादा गद्यपद्यसंग्रह. गेल्या बत्तीस वर्षात तिनं जे शिकवलं त्याविषयी बऱ्याचदा तिच्या मनात विचार असायचे. समग्र गुजराती साहित्याबद्दलचे विचार - कधीकधी भूतकाळातील घटना, गेलेल्या आठवणींनीही मन घेरले जाई.

आजची सकाळ अशीच होती. का कुणास ठाऊक, आजचा दिवस 'सॉनेट'चा होता. परत मन वळलं दुसरीकडें. गेली काही वर्षे कशी गेली कळलंच नाही. हे पृथ्वीमाते!...

सच्चिदानंदाने खेळ करावा तसा सूर्य हलके हलके क्षितिजावरून किंचित वर आला. बागेतल्या फुलझाडांवर ऊन रेंगाळलं. थोडसं ऊन असंच इथंतिथं सांडलं.. 'मी तर असाच फिरायला आलो आहे'... 'या निरर्थक जगात माझी परिक्रमा मलीन वेषातच चाललीय....' ती जणू वर्गातच बोलत होती... 'पहा.. इथे फिरणं आणि परिक्रमा हे शब्दप्रयोग पहा बरं. एकात कवीचं मनमौजी व्यक्तीमत्त्व प्रकट होतं; तर दुसऱ्यात त्याची आध्यात्मिकता स्पर्श करून जाते.' ऊन वाढलं म्हणून की शब्दप्रयोगांच्या विचारांनी; कारण कोणतेही असो. इंदुचं मन भाजल्यासारखं चरचरू लागलं.

कालचा दिवस अन् रात्र तिच्या मनाला जाळत होती. पुटपुट, बडबड, कानगोष्टी आणि हळूहळू टोमणे, शेरे, लेकी बोले सुने लागेचे प्रयोग. द्वयर्थी बोलणं हे सगळे शब्द इंदुला सुचत गेले. या घरात गेले कितीतरी दिवस, छे! कितीतरी महिने चहूकडून धुराने वेढून जावं तसं घुसमटवणारं वातावरण ती अनुभवत होती.

''एक तर घर छोटं. त्यात आणि..''

''सगळ्यांची घरं लहानच असतात. सगळी काय बंगल्यात थोडीच राहतात?''

''बंगला आहे कुणाच्या नशिबात?''

''पुरे आता. वाढ मला.''

''तुम्ही घ्या वाढून. मी चालले शाळेला.''

''राहू दे मग.''

''राहू दे काय? आज आर्यमनची युनिट टेस्ट आहे.'' मग जरावेळ भांडी आपटल्याचा आवाज. नंतर ''शिकणार कुठून पोरगा? अभ्यासाला घरात जागाच कुठेय?''

आतापर्यंत दोन ओसऱ्या, एक लहान बैठकीची खोली आणि स्वयंपाकघर, अगदी एखादा चौरंग मांडावा तसे आंगण - असे हे घर तिला, स्वर्गीय वडील, स्वर्गीय वडील बंधू आणि स्व. वहिनीला पुरेसे होतं. इंदुला सुरवातीला समजलंच नाही की हेच घर

आता ती स्वतः, भाचा राकेश, त्याची बायको शिल्पा आणि तिचा आठ वर्षांचा मुलगा आर्यमनला कसं पुरत नाही? लहान कसं पडतं?

हं. बैठकीच्या खोलीत टी.व्ही वर 'नच बलिये'चा धिंगाणा चालायचा. आर्यमनची युनिट टेस्ट असायची. ती कुठली बरं कविता? गुलाम महंमद शेख यांची? 'हातात आलं ते विंचरलं, पिंजलं, चाटलं, फोडलं, सांडलं'... बस. शिल्पा तशीच भांडी फेकायची. पाय आपटायची. घटकेत आयर्मनचा कान पिळायची. मुख्य म्हणजे 'घरात जागाच कुठंय?' चा धोशा लावत इंदुच्या डोळ्यांसमोर तरफडायची.

सूर्याच्या उष्णतेपेक्षाही या शब्दांची गरमी जास्त होती. हाऊसिंग बोर्डाचं घर यातायातीनं कसं मिळवलं, कशी शिकली, एम.ए.ला प्रथम वर्गात कशी आली, नंतर नोकरी कशी केली. ती टिकवण्यासाठी काय सहन केलं. सगळ्यांमध्ये राहून सगळ्यांचं औषधपाणी कसं केलं; सगळं मलाही सांगता आलं असतं. पण असं होत नाही. इतकी वर्ष शिकविलेला नरसी मेहता सांगून जातो, 'आपण आपला धर्म सांभाळावा. कर्माचे मर्म विचारी जाणतात. 'स्वतः हे वर्गाला शिकवते. पण इथे?

''इथे धर्म म्हणजे वेगवेगळ्या वेळी वेगवेगळा बदलता धर्म-कर्तव्य आणि त्याचे मर्म जाणणे हे विचारी माणसांचे काम आहे असं कवी म्हणतो.''

अजूनही ते वर्ग डोळ्यांसमोर तरळतात. सकाळी सव्वाआठचा पहिला तास. साडेआठला गांधी यायचा. आपल्या नोकरीची ती सुरुवातीची वर्षे. त्या काळात गांधीजी आणि हा गांधी दोघेही एकदमच तिच्या कपाळी लादले गेले. पहिल्या वर्षासाठी गांधीजीचं दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहासंबंधीचं पुस्तक कोण जाणे कुणी गांधीप्रेमी गाढवानं लावलं होतं. सिनेमाची गाणी पाठ करणाऱ्या या सोळा-सतरा वर्षांच्या मुलांना टॉलस्टॉय, फिनिक्स आश्रम आणि गिरमिटीयाच्या कथा त्यांना रस वाटेल अशा कशा शिकवायच्या?

तो गांधी उशीरा यायचा. शेवटच्या बाकावर बसायचा. वर्ग संपला की 'गांधी महात्म्याचा विजय असो' ओरडायचा. इतरही त्याला सामील व्हायची. वर्ग हसायचा. इतर वर्गातही हे पसरलं अन् काही वर्गात मग 'सत्यनारायण की जय', तर काही वर्गात 'अंबा मातेचा जयजयकार' दुमदुमायला लागला. बऱ्याच वेळा हे होई. मग आपल्या नोटस् भराभर गोळा करून इंदू बाहेर पडे.

आताही हे इतक्या तीव्रतेने आठवलं की ती आताच्या आत्ता बाकड्यावरून उठली आणि बागेबाहेर पडली. डोळ्यांची आग होत होती. सा...ला तो गांधीचा बच्चा सहामाहीत प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरात चित्रपटाची कथाच लिहायचा. नापास केलं त्याला तरी काय बिघडणार? गुजराती भाषेत नापास झाला; तर त्याला काही किंमतच नाही ना?

बागेबाहेर छोटासा फूटपाथ होता. दुरून एक मोठ्या ट्रकचं धूड वेगाने येत होतं. ती भिंतीला चिकटून उभी राहिली. रस्ता ओलंडायची घाई तिनं केली नाही.

असं स्वतःला भिंतीला चिकटून घाबरून उभं राहणं, दुसऱ्याचा मार्ग मोकळा करणं हे नोकरी करता करता तिला शिकावंच लागलं.

''इंदुताई (बहेन) पहा बरं. तुमची क्वालिफिकेशन्स तशी बरोबर आहेत. पण...''

प्राचार्यांनी तिला भेटायला बोलावलं होतं. नोकरी आता कायमस्वरूपी होणार होती. अर्थात दुसरे उमेदवार होते. पण इंदुने इथे चार वर्ष काढली होती. मग आता हा 'पण' कुठून आला?

''तुमचे वर्गावर जरासुद्धा नियंत्रण नाही.''

''मॅडम, मुलं थोडी टारगट आहेत. मी त्यांची नावं तुम्हाला दिली होती. पण पुढे त्याचं...'' इंदु अडखळली. प्राचार्यांवर ती असा आरोप कसा करणार की त्या मुलांना काहीच शिक्षा झाली नाही?

''हं. ठीकाय. जा आता. असं पहा इंदुबहेन, उगवत्या पिढीला आपण मार्गदर्शन करायचं. त्यांना विधायक कामात रस निर्माण होईल असं करायला हवं. बघा संधी आलीय. विद्यापीठाने तीन दिवसांचे ग्रामसेवा शिबीर ठेवलंय. तुम्ही विद्यार्थ्यांची तुकडी घेऊन जा तिथं...'

प्राचार्य हुशार होत्या. मुत्सद्दी होत्या. सरळ कुकरी (हत्यार) बाहेर काढली. इंदुच्या घरची परिस्थिती अशी होती की ती जाऊच शकणार नाही हे त्यांना बरोबर ठाऊक होतं.

''जी... तीन दिवस...''

'बघा विचार करा.''

पुढच्या आठवड्यात पुन्हा प्राचार्यांनी तिला बोलावलं. ''इंदुबहेन, एक चांगली खबर आहे. यासाठी मी किती धडपड केली हे मीच जाणे. पण यू सी, तुम्हाला रस्त्यावर आणलं नोकरीविना तर माझं मन मला खाईल.''

इंदु काहीच बोलू शकली नाही. छातीतील धडधड वाढली होती.

''असं पहा. एक चांगला मार्ग सापडलाय. आपली शिक्षणसंस्था उत्तर गुजरातेत विस्तारत एक महिला कॉलेज काढतेय, हे तुम्हाला ठाऊकच आहे. मी खूप धडपड करून तुमची त्या कॉलेजमध्ये वर्णी लावली आहे.''

''उत्तर गजरातेत? अहो पण....'

''इंदुबहेन, तेथे तुम्हाला आवडेल. असं पहा, महिला कॉलेज म्हणजे सगळ्या मुलीच असतील. मेंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा असं काय काय चालत राहील तिथं. तुम्हाला सोप्पं जाईल.''

पी.एचडी.चा अभ्यास, वडिलांचं आजारपण, वहिनीचं ढळलेलं मानसिक संतुलन. जावं लागलं इंदुला. तिच्या पगारावर घर चालत होतं. घराची काळजी होती. मानवसंस्थेत काळजी एकीकडे आणि माणूस एकीकडे असं होऊ शकतं.

अगदी छोटसं घर रहायला घेतलं. ते पण जेमतेम मिळालं. या छोट्या गावात कॉलेजचे वातावरण म्हणजे मोठ्या कन्याशाळेसारखंच वाटत होतं. आधीच्या कॉलेजचं भव्य ग्रंथालय होतं. अनेक प्राध्यापक इंग्रजीतून गप्पा मारायचे. 'इंडिया टूडे' स्टाफरूममध्ये वाचलं जायचं. त्यावर चर्चा व्हायची. नियमितपणे कार्यशाळा, शिबीरं, चर्चा चालायच्या.

नंतर इंदुला कळलं. तिच्या जागी एका पुरुष प्राध्यापकाची नेमणूक झाली होती. विद्यार्थ्यांना घेऊन तो प्राध्यापक प्रत्येक यूथ फेस्टिवल, नाट्यस्पर्धा सेवायज्ञ अशा कार्यक्रमांना जायचा. कॉलेज आणि प्रवीण संचालिका आता राज्यस्तरावर चमकू लागल्या होत्या.

घरापासून आणि विशेष म्हणजे विद्याव्यासंगी वातावरणापासून दूर राहण्याचं दु:ख हळूहळू कमी होत होतं. इंदूला अनेकदा वाटायचं की मी इथे एकटी, एकाकी आहे का? नाही. माझ्या साहित्याची मला सोबत आहे. आवश्यक पुस्तकांच्या अभावामुळे पी.एच.डी.चं काम हळूहळू चाललं होतं. पण कॉलेजच्या वर्गात तिचं सारं जगणं होतं. काक आणि मंजिरी, सत्यकाम आणि रोहिणी, भीमदेव आणि चौला यांची प्रणयदृश्य, निरंजन भगत अन् राजेंद्र शहांच्या कविता, प्रियकांत अन् रमेश पारेखांची उन्मादक गीते... तारुण्यावस्थेत आलेल्या मुली लाजून लालेलाल व्हायच्या. इथे आता गांधीजी आणि गुणवंत शहांची विचारसृष्टी समजावताना इंदुला भिती नव्हती वाटत. वर्षे जाऊ लागली तसं इंदुला हेही कॉलेज आवडू लागलं.

पण प्राध्यापिकेचं एक जगणं होतं तसं माणूस म्हणूनही एक जगणं होतं. बढती व्हावी, आपल्याला वरचे पद मिळावे अशी इंदुची इच्छा होती. तिला माहीत होतं की इथे वर नेणाऱ्या शिडीपेक्षा फुत्कार करणारे सापच भेटतात. कठीण प्रश्न आणखी कठीण करून ठेवतात.

कॉलेजमध्ये व्हाइसप्रिन्सिपलची जागा रिकामी होती. एक ज्येष्ठ प्राध्यापक म्हणून इंदूनेही रीतसर अर्ज केला होता.

त्या जागेसाठी मुलाखती झाल्या. उपप्राचार्यपदासाठी प्रा. निवेदिताला घेतलं गेलं.

स्टाफरूममध्ये मोकळेपणाने चर्चा झाली.

समाजशास्त्राच्या प्राध्यापिका दिप्तीबहेन म्हणाल्या, 'उपप्राचार्य म्हणून निवेदिताबहेनला घ्यावं हे बरोबर.' इतरांनीही माना हलवून त्याला संमती दिली.

''क्यूं? अैसा क्यूं?'' - हिन्दीचे प्राध्यापक कमलेश ठाकूर विचारते झाले.

''क्यों? अरे, निवेदिताबहेन विज्ञानशाखेतील प्रोफेसर आहेत. त्यांनी मायक्रोबायोलॉजीचा डिग्रीकोर्स सुरू केला. त्यामुळं बघा, संपूर्ण गुजरातमधून सगळे विद्यार्थी इथे यायला लागले. अहो, पुरुषविद्यार्थीसुद्धा ॲडमिशन मागताहेत.''

''पण असं कसं?''

''अहो, ही दुनिया आहे. सगळ्यांना अमेरिकेला जायचंय. ह्या पटेलांच्या मुली तर तिथंच जाणार. हा कोर्स केला तर नोकरी पण लगेच मिळते. नवरे लगेच पसंत करतात त्यांना.''

मानसशास्त्राच्या प्राध्यापिका असलेल्या मंजुबहेनने स्पष्टीकरण केलं.

''भाषाविषय तर आता आऊटडेटेड झालाय. सगळ्याच भाषांच्या बाबतीत हेच. भाषाविषय

कॉलेजमधून काढूनच टाकला पाहिजे. म्हणजे अशी मागणी होतेय हं. भाषाविषयाच्या प्राध्यापकांचे पगार उगाच डोक्यावर पडतात. इंदुबहेन सॉरी हं. मी हे तुम्हाला नाही म्हटलं.'' दिप्तीबहेन म्हणाल्या.

''आता तर कॉम्प्युटर, बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन, एम.बी.एचा जमाना आहे. त्यांचा बोलबाला आहे. माझ्या भावाच्या मुलीनं एम.बी.ए. केलं. पगार किती ठाऊक आहे? महिन्याला एक लाख रुपये!''

हे ऐकून काही प्राध्यापिका तोंड वासून मंजुबहेनकडे पहात राहिल्या. स्वतः इंदु काहीच नाही. वर्गात ती त्या दिवशी शिकवत होती....

'आम्ही तर सुकलेल्या कापसाचं फूल, तुम्ही रंगतदार, रसिलं अत्तर...'

ज्यांना पैसाच बघायचाय त्यांनी भले पैसा पहावा. पण भाषा आणि संस्कृतीचे जतन केल्याशिवाय देशाचं भागणार आहे? आम्हीच नसलो तर या नव्या पिढीला संस्कारांचा, जीवनमूल्यांचा वारसा कोण देणार?

उपप्राचार्य म्हणून इंदूबहेन 'लायक' आहेत तरीही त्या 'नालायक' आहेत. ठीक आहे. घरखर्चाला आणि भाड्याला पगाराची रक्कम वापरून उरलेली रक्कम ती आपल्या घरी पाठवते. आजूबाजूला इतर प्राध्यापिकांच्या जीवनाचा महासागर उसळताना ती ऐकत राहिली आहे. पती, त्याचा पगार लोन (कर्ज), मुलबाळं, त्यांचा अभ्यास, इंदू मात्र स्वतःच्या साहित्यविश्वात मग्न आहे.

उफ. उन्हाळी झळ फारच जाळू लागली तेव्हा तिला भान आलं की ती अजूनही बागेच्या फाटकासमोर भिंतीला चिकटून उभी आहे. ते ट्रकचं धूड केव्हाच निघून गेलं होतं. आता रिक्शा आणि सायकली रस्त्यांच्या मधून धावत होत्या.

रस्ता क्रॉस करण्यासाठी फूटपाथवरून उतरून जरा पुढे जायला ती वळली तेवढ्यात एक सायकल जवळजवळ तिच्या पायावरून गेली. तिनं दुःखानं चित्कार काढला. पाऊल परत फूटपाथवर घेतलं. परत त्याच भिंतीचा आधार घेऊन दुखरं पाऊल तपासलं. दुखापत तशी सुमारच होती. पण धक्का किती जोरात लागला!

''सा...ल्याच्या सायकलमागं धावून त्याची कॉलर खेचून त्याला धोपटायला हवं. तरच अशी माणसं नीट लायनीवर येतील.'' इंदुचं मन रागानं फुणफुणलं. पण त्याचवेळी आपण काहीच करू शकणार नाही या जाणवेनं ते हताश झालं.

ती काही करू शकणार आहे का? लोक तिला वाटेल ते बोलतात. धमकावतात. ती काय करू शकते?

उपप्राचार्यपद नाही मिळालं. पण आताशा इंदू आणि ठाकूर ते हिंदीचे प्राध्यापक - स्टाफरूममध्ये पुष्कळ वेळा एकत्र चहा पितात. इंदुला हिंदी साहित्यात रुची निर्माण झाली आहे. स्वतःच्या पीएचडीच्या संदर्भात काही मुद्दे ती कमलेशला विचारते. कमलेशला हल्ली हल्लीच डॉक्टरेट मिळालीय. तो इंदुला याबाबतीत थोडीफार मदत करत होता.

बस इतकंच. कॉलेज सुटल्यावर ती दुकानातून खरेदी करून घरी चालली होती. तेवढ्यात ती तिच्यासमोर आली... प्राध्यापक कमलेश ठाकूरची पत्नी. हेमाक्षी ठाकूर घोड्यासारखा लांब चेहरा आणि पुढं आलेले मोठमोठे घाणेरडे पिवळे दात. एकदोनदा कॉलेजच्या कार्यक्रमांना हेमाक्षी आली होती. त्यामुळं इंदु तिला थोडीफार ओळखत होती. हेमाक्षीचा सावळा आडदांड देह भिंत बनून इंदूसमोर उभा राहिला. इंदुला थांबावंच लागलं. विचारावंच लागलं, ''कशा आहात?''

इंदुकडे एकटक घुरून पाहत ती म्हणाली, ''मजेत.'' पुढे म्हणाली, ''मजा तर तुमची आहे. तेही अगदी आरामात. रोज दोनचार तासांचं काम. महिन्याला छान पगार मिळतो नं...''

इंदुला कळलं नाही की याला उत्तर देऊन प्रतिवाद करावा की नाही? तेवढ्यात चेहऱ्यावर एकदम विकृत भाव आणून हेमाक्षी म्हणाली, ''हो. तुम्हाला आणि नवरा कुठे आहे? त्याची चिंताच नको.'' ''हे ही काय बोलतेय? वेडीबिडी तर नाही ही?'' इंदुच्या मनात आलं.

''माहीत आहे मला. स्टाफरूममध्ये ठाकूरांबरोबर तुमची चहाकॉफी पिणं चालतं हे मला माहीत आहे. पण याद राखा...''

हो. राहील याद. इंदुला ते चांगलंच लक्षात राहिलं. त्यावेळी मात्र वाटलं तिला की ही राक्षसीण हे काय बोलून गेली? मी काय म्हणे तर ठाकूरांबरोबर... शी. शी. असं वाटलं की तिच्या

पाठी जावं आणि तिची उंदराच्या शेपटीसारखी असलेली पोनी टेल हिसडून तिला झाडावं अन् म्हणावं की मी काय तुझ्या बुटक्या, तंबाखू खाणाऱ्या मोठ्ठं पोटवाल्या नवऱ्यावर प्रेम करते? माहीताय का तुला की मी कोणावर प्रेम करते ते? मी द्वारकाधीश कृष्णावर प्रेम केलंय. सरस्वतीचंद्र आणि सत्यकाम यांना मी चाहते. सक्करबार आणि हेमंतवर मी जीव टाकते. वर्गात शिकवता शिकवता मीच झालेय मंजिरी, कुमुद अन् रोहिणी. प्रेम काय वस्तू आहे; ते तरी तुला माहीत आहे का? अंसुवन सींच सींच प्रेमबेली बोई... पण ती जमिनीवर खिळून राहिली. गटारातलं पाणी तिच्यावर फेकून कुणीतरी निघून गेलं. तिनं आरडाओरडा केला तर लोकं तिच्याकडे विचित्र नजरेनं पाहतील हे तिला ठाऊक होतं. कुणी म्हणेल, काही पाणी मुरतंय म्हणून नं... परक्या गावात बिनलग्नाच्या एकट्या स्त्रीची अब्रू क्षणात होत्याची नव्हती होऊन जाईल. जा जा भुऱ्या म्हशीवाणी असलेली हेमाक्षी जा. जा. 'गळ्यातली घंटा वाजते आणि' अखाचा हा चरण वर्गात समजावताना मारक्या ढोराच्या गळ्यात बांधल्या जाणाऱ्या लोढण्याची गोष्ट सांगितली होती. या मारक्या म्हशीच्या गळ्यात कोण लोढणं अडकवणार?

डोळे भरून आले तिचे. उरात तीव्र वेदना चमकून गेली. हेमाक्षी, खरी गोष्ट अशी होती की रक्तात फुलं फुलत असताना वास्तव जीवनात कुठलं प्रेम मिळालंच नाही!

असाच निवृत्तीचा काळ आला. ज्या स्वप्नांना घरी ठेवून ती गेली होती त्या स्वप्नविहीन घरातच, गावात ती परतली होती.

एक खोल श्वास घेऊन लंगडत्या पायाने तिनं रस्ता क्रॉस करायला घेतला. (ती रस्ता क्रॉस करू लागली.) रिक्षा, मोटारी, सायकली अशा वाहनांना चुकवत ती वेगानं समोरच्या फूटपाथपर्यंत पोहोचली न पोहोचली तोच मागून कुणीतरी हलकासा धक्का देऊन तिला फूटपाथवर चढवलं. तिनं मागं वळून पाहिलं तर कुणी टीनएजर तिला म्हणत होता. ''टेक केअर मॅम!'' त्यानं रस्त्याकडे बोट केलं. इंदुनं तिथं पाहिलं तर एक बस वेगात चालली होती. पायाच्या लंगडण्याने आणि हृदयाच्या आतील वावटळींनी ती क्षणभर सैरभैर झाली होती.

''टेक केअर मॅम!'' मला म्हटलं. माँजी नाही, मावशी नाही, आंटी नाही, आई नाही... फक्त 'मॅम! एक संस्कारी माणूस दुसऱ्या संस्कारी माणसाला त्याच्या शारीरिक अक्षमतेकडे इशारा न करता जसा संवाद साधेल तसे फक्त 'मॅम.'

इंदु हसून म्हणाली, 'थँक्स'! तोपण हसला आणि पुढे निघून गेला. ऊर फोडून धावणाऱ्या बसकडे ती पाहत राहिली. आस्फालटच्या रस्त्यावर पूर्वेकडून पश्चिमेकडे जाता जाता त्या आडकोपऱ्यावर बसच्या वेगानं जे काही झालं असतं, ते झालं असतं. होऊन गेलं!

आता ती वर्गात शिकवत नव्हती. नजरेसमोर पाहत राहिली आहे...

रक्ताच्या थारोळ्यात मांसाचे लचके आणि इंदुचे दोन तुकडे! बोला, कुणाला काही विचारायचे आहे! कुणाला काय विचारायचं आहे? कुणाला काहीही नाही. एवढ्या उभ्या आयुष्यात आजवर कुणी कुठं काय विचारलं आहे?

जीवनाची पाने उलटताना तिला सगळ्यांनी ढकलत ढकलत हास्यास्पद ठरवली. प्राध्यापिका आहे. क्लासकंट्रोल नाही. मारा एक धडक. मारा एक धक्का. गावात फेका तिला. भाषा विषय शिकवता? पैसा किती? चवल्या पावल्या... मारा धक्का. सॉरी, उपप्राचार्य नाही बनता येणार. लग्न नाही केलं. फेका चिखल... मंगळसूत्र मिरवत झुलवत एक अशिक्षित कर्कशा तिला शिव्या देऊन जाते.

आता ती म्हातारी, निवृत्त बाई. घरात तिच्यासाठी जागा नाही. घर लहान पडतंय. एक अख्खी ओसरी तिच्यासाठी ठेवायची? मारा तिला... अंहं, आता धक्का नाही मारायचा. मी नाही मारू देणार. मी माझ्या ओसरीत ठामपणे उभी राहीन. माझ्या पुस्तकांच्या गराड्यात. मी आता हसं नाही करून घेणार. गुजराती शिकवते म्हणून माझी किंमत नाही, नव्हती? तर ठीकाय. ओ.के. मी आता इंग्लीशमध्ये सांगते. आता मी मार्जिनलाइज्ड नाही होणार. इझ इट क्लिअर?

जरा ताठ होऊन ती घराकडे परतू लागली.

*

# अनुवाद-संवाद

## Oh! Dear Mountain

**By Akshay Doble**

Oh Dear Mountain
Why did you do this to me?
You tought me how to walk
On rocks and loose soil
Only to send me back to where
There are no firm foots, no toil
You tought me that every decent
Is followed by an ascent
Here I came back
Trying to avert dead-end
You tought me that every
Step is an acheivement
I came back to a place where even
Gallops come without fulfillment

## अरे माझ्या लाडक्या पर्वता

**-कल्पना सुभाष कोठारे**

अरे माझ्या लाडक्या पर्वता-
हे काय केलंस तू मला?
तूच चालायला शिकवलेस मला
दगडगोट्यातून अन मऊ मातीतून
परत का पाठवलेस इथे
जिथे भक्कम पाय रोवण्याचे कष्टच नाहीत?
तूच शिकवलेस मला की
प्रत्येक उतारानंतर चढाव येतोच
इथे मी परतलोय तर
रस्त्याचा शेवटच मला परतवतोय
'प्रत्येक पाऊल म्हणजे यश'
असे तू शिकवलंस खरं तर
पण मी अशा जागी परतलोय
जिथे उड्यांनाही अपयश येतंय
इथे तुझ्यापासून दूर, दूर
प्रत्येक श्वासाचा धपाप ऐकण्यास
कळवळतेय माझं शरीर
आसावलंय ते चुंबायला आकाश
अन् आसुसलय ते
करण्यासाठी तुला सलाम
रे माझ्या लाडक्या पर्वंता

(हितवाद, नागपूर या वृत्तपत्रातील एक्सप्रेशन्स या सदरातून साभार!)

*

# छोटद्या-मोठ्यांसाठी

# गुण कोणाचा

*** डॉ. सुमन नवलकर ***

खरं तर आई चिंटू आणि पिंटू दोघांचेही सारखेच लाड करते. पण चिंटूला आपलं वाटतं की आईचा पिंटूच लाडका आहे. बाबाही पिंटूचेच लाड करतात. आजी-आजोबांनाही पिंटूच आवडतो.

दोन कंपास बॉक्स आणले तरी पिंटूलाच चांगल्या रंगाचा बॉक्स मिळतो. दोन शर्ट आणले तरी पिंटूलाच  चांगला शर्ट मिळतो. मिठाई आणली तरी चिंटूच्या आवडीची लाल मिठाई पिंटूला देतात आणि चिंटूला हिरव्या मिठाईवरच समाधान मानावं लागतं. पण कधी चिंटूला लाल मिठाई दिली तर नेमक्या त्याच दिवशी त्याला हिरवी मिठाई हवीशी वाटते. थोडक्यात काय, तर जे पिंटूला देतात तेच चांगलं असतं असं चिंटूला कायम वाटत राहतं.

पिंटू अगदी गुणी आहे. त्याची कधीच कसलीही तक्रार नसते. लाल काय, किंवा हिरवी काय - तो कुठलीही मिठाई तितक्याच आवडीने खातो. वर म्हणतो, ''आई, मिठाई खूप छान केलीयस हं का तू. पण आई, ऑफिसातून थकून आल्यावर कशाला मिठाई बनवत बसतेस. आई?''

सकाळी लवकर उठून पिंटू बाबांबरोबर अंगणात जातो. त्यांना त्यांची मोटर-सायकल धुवायला मदत करतो. चिंटूला फक्त मोटर सायकलवर बसायला आवडतं. ती कोण धुतं याविषयी त्याला काहीच माहिती नसते.

त्या दिवशी बाबांनी दोघांसाठी छोटुकल्या खेळातल्या गाड्या आणल्या. सुर्रऽऽ सुर्रऽऽ करून सोडायच्या की पळतायत आपल्या. सुर्रऽऽ सुर्रऽऽ करून करून चिंटूची गाडी बिघडली. पिंटूची गाडी मात्र अजूनही जोरात पळत होती. मग चिंटूने पिंटूची गाडी घेऊन खेळायला सुरुवात केली.

'आता आपलीही गाडी हा मोडकी करून ठेवणार' पिंटूच्या मनात आलं. पण पिंटूची गाडी मोडली नाही. रात्री झोपताना चिंटू म्हणाला, ''पिंट्या आपण बदलूया गाड्या.'' नेमकी चिंटूच्या हातात गेल्यावर पिंटूची गाडी बंद पडली. या उलट चिंटूची गाडी पिंटूच्या हातात आल्यावर झूम-झूम पळायला लागली. आता चिंटूला कळेना, की दोष कोणाला द्यावा? तेवढ्यात पिंटूच म्हणाला, ''चिंटूदादा, तू ना जरा हळूच सुर्रऽऽ सुर्रऽऽ कर, जरा प्रेमाने कर, म्हणजे बघ कशी गाडी पळते ते.''

आणि खरंच. दोघांच्या गाड्या झूम-झूम पळायला लागल्या.

आजोबा म्हणाले, ''चिंटू आपण चांगलं वागलं की जग चांगलं वागतं. थोडा गुण सोन्याचा असतो आणि थोडा गुण सोनाराचा.'' आजोबांचं म्हणणं चिंटूला पटलंच.

*

## अनुवादित कथा

# ड्रॅगन बेटावर अडकून पडलेले

मूळलेखक **जॉन डायसन**

✶ अनुवाद **कल्पना सुभाष कोठारे** ✶

**('रीडर्स डायजेस्ट' मधील ही एक थरारक सत्यकथा आहे.)**

ते युगुल, जंगलातून चालत, चालत त्यांच्या बोटीपर्यंत येऊन पोहोचले. त्यांच्या प्रवासातील ती शेवटची दुपार होती. तीन दिवसांच्या, डायव्हिंग ट्रिपसाठी ते दोघेजण आले होते. 'लाबुन बोजो' नावाच्या खेड्यापासून 'फ्लोअर्स' नावाच्या बेटावर ते आले होते. आतापर्यंत बघितलेल्या जलचरानंतर, आता त्यांना फक्त शेवटची बुडी मारून परतायचे होते.

'सुंदा' बेटाचे पाणी, त्याच्या नितळपणासाठी व सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. 'मंटा रेज' नावाच्या महाकाय जलचरांसाठीही ते प्रसिद्ध आहे. उत्तरेकडे चायना सी, दक्षिणेकडे हिंदी महासागर, यामध्ये हे बेट आहे. या बेटाचे अस्तित्व, अडथळा बनून समुद्र भोवरेही निर्माण करते. वरून बोट जात असताना, तिच्या प्रवाहात झोकून देऊनच इथे डायव्हर्सना पाण्याखाली जावे लागते.

एक इंग्लिश समुद्रकिनाऱ्यावरील बंदराहून, शारलेट डी एक वेट्रेस व आरोग्यसेविका इथे आली होती. तसेच, तिथे आलेला जिम् हा पूर्वी सैनिक व आताचा रस्ता बांधणी कामगार होता. हे दोघेही उत्तम डायव्हर्स (पाणबुडे) होते. या धाडसी मोहिमेत, एकूण अकराजण, सहभागी झाले होते व त्यांचे दोन गटांमध्ये विभाजन केले गेले होते. हेलेना नेव्होलीन, ही अडतीस वर्षीय स्विडीश स्त्री, लॉरेन्स पिनेल हा एकतीस वर्षाचा पॅरिसचा फायनान्सर, हे दोघेही जिम व शालटबरोबर होते. याशिवाय कॅथी मिशिनचन ही पन्नास वर्षीय डायव्हर, तिच्या स्वीडिश पार्टनरबरोबर, या मोहिमेचे नेतृत्व करीत होती.

दुपारी तीन वाजता, त्यांची बोट 'मंटा कॉर्नर' या स्थळी होती. येथे समुद्रप्रवाह इतके जोरदार होते की त्यांना स्कायडायव्हर्सप्रमाणे, सरळ रेषेत पाण्यात उडी मारून खाली जावे लागत होते. जिम व शारलटची पाण्याखाली गाठ पडली. बोटीपासून जवळ, जवळ अठरा मीटर्स खोल, खाली ते असावेत. शारलेटचे लांब सोनेरी केस तिच्या खांद्यावर रुळताना जिमला दिसत होते. दोघांनाही स्नॉर्केल मधून, सुंदर, प्रवाळ (कोरल्स) पाहण्यास मिळत होते. त्यांच्या कॅमेराने, 'मंटारे' नावाच्या जलचराचे फोटोही त्यांनी काढले. एखाद्या बॉंबप्रमाणे हे जलचर दिसत होते.

जवळ, जवळ एका तासानंतर कॅथीने त्यांना वरती परतण्याची खूण केली. थोड्या नाराजीनेच सर्व डायव्हर्सनी परतीचा, वर येण्याचा प्रवास सुरू केला. त्यांची बोट अंदाजे सत्तर मीटर दूर होती. पाण्याच्या पृष्ठभागावर, सूर्यप्रकाशापर्यंत पोहोचण्याची सर्वांनाच घाई झाली होती.

बोटीवरील कर्मचारी, इतर डायव्हर्सना वर घेण्यात मग्न होते. समुद्रप्रवाहाच्या ओढीमुळे काही डायव्हर्स खालीच ओढले जाऊन दुसरीकडे खेचले जात होते. जिम व शारलेटने हात हलविले, आरडाओरडा करून पाहिला परंतु त्यांची बोट लहान होत होत दूरवर जाताना दिसली. पाचजणांनी एकमेकांकडे बघितले, जिम म्हणाला, 'आपल्याला पोहत जाऊन बोट गाठावी लागेल.'

उत्तरेकडची जमीन, जास्त लांब नव्हती. परंतु समुद्रप्रवाह त्यांना दूर खेचीत नेतच होता. दक्षिणेकडे काही अप्राप्य, छोटी, छोटी बेटे होती. डायव्हर्सचे वेटसूट्स व फिन्स (पायातील बूट) यामुळे त्यांना एक

प्रकारची उसळी मिळत होती.

जिम व शारलेट खूपच घाबरले होते. समुद्र प्रवाहामुळे प्रत्येक बेटावर, धनुष्याकृती लाटा फुटत होत्या. फक्त दोनशे मीटरवर किनारा दिसत असूनही, समुद्र प्रवाहाने ते दूर फेकले गेले व हळूहळू ती छोटी बेटेही दूर दूर गेली. तीन बेटांना वळसा घालून होइतो काळोख पडू लागला होता. चौथे बेट, एखाद्या काळ्या राक्षसासारखे समोर आले. त्यांनी परत जोरात पोहण्याचा प्रयत्न केला. परंतु ते परत मागे खेचले गेले. एखाद्या छोट्या रेस्टॉरंटइतके पाचवे बेट समोर दिसले. परंतु परत तेही हरवले.

आता ते पाच पाणबुडे, हिंदी महासागरात अगदी एकटे होते. त्यांची मस्तके चेंडूप्रमाणे वरखाली हिंदकळत होती. पहाटेपर्यंत वाचवणारी माणसे येणे शक्य नव्हते. रात्र पाण्यात काढणे महाकठीण होते.

लाटा पांढऱ्या घोड्यांसारखे आवाज काढीत गर्जत होत्या. इतक्यात जिमच्या लक्षात आले की, भोवऱ्यामुळे शारलेट वेगळी पडून दूर जात होती. जिमने जोरात पोहून इतरांना गाठले. डायव्हिंग गिरअर (ड्रेस) घालण्याकरिता ज्या क्लिप्स वापरतात, त्या क्लिप्सनी जिमने सर्वांना एकत्र जोडले.

सर्वजण एकत्रितपणे वरील ताऱ्यांकडे बघत होते. घाबरलेल्या शारलेटने त्याक्षणी निर्णय घेतला की 'काहीही झाले, तरी मी जगणारच!' दुसऱ्याचक्षणी तिच्या अंगावर काहीतरी काळे धावून आले. 'शार्क!' असे ती ओरडणार होती. इतक्यात तिच्या लक्षात आले की तो एका लाकडी ओंडका होता.

पाय गरम रहावेत म्हणून सारखे पाय हलवीत, सारेजण त्या ओंडक्याला लटकले. काहीजणांनी आपल्या कमरेचे पट्टे, तोंडावर बांधून पाण्यापासून चेहऱ्याचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. जिम काळोखातही सारखे फोटो काढीत होता.

हेलनच्या पोटात खारे पाणी गेल्याने तिला उलट्या सुरू झाल्या. शारलेटने ओंडक्याला घट्ट मिठी मारली व उष्ण श्वास मास्कमध्ये सोडण्यास सुरुवात केली. त्यामुळे चेहरा गरम राहण्यास मदत होत होती. जिम विनोद करीत होता. 'कॅथी, रात्रीच्या या डाईव्हसाठी तू वेगळे पैसे घेणार का गं?' फोटो काढता काढता, सर्वांना उत्साहित करण्याचे त्याचे प्रयत्न चालू होते. 'उद्या यावेळी आपण पबमध्ये बसून, हे सारे आठवीत असू. हंसा बरं! 'असे म्हणून तो भोवऱ्यात गाऊ लागला, 'रिंग रिंगा रोझेसऽऽऽ'

शारलेटचे दात, थंडीमुळे वाजू लागले. तरीही ती स्वत:शीच मोठ्याने बोलत होती. कॅथीने डोके हातात खुपसले तशी शारलेट तिच्याशी गप्पा करू लागली. 'तुझ्या घरी कोणते पाळीव प्राणी आहेत गं?'

'एक कुत्रा आहे'

'आणखी काय?'

''चौदा मांजरी आहेत''

''त्यांची नावं?''

''तुला काय करायचंय ग त्यांच्या नावाशी?''

''अगं सांग न पण...''

''च्युअी...'

'आणि?'

'ब्रूस' बोलता बोलता, शेरलेटला खूप तहान लागली. आता मदत करण्याची कॅथीची पाळी होती. ती म्हणाली, 'कल्पना कर, तू फ्रिजजवळ आहेस. तिथे स्प्राइटचा कॅन आहे. तो कॅन तू तोंडाला लावते आहेस... हे सर्व मनात आणून बघ चल! 'शारलेटने त्या कल्पनेस जवळ केले व तिला खरेच बरे वाटले.

जिम हा एक स्कायडायव्हरही होता. उंचीची भीती जाण्यासाठी त्याने तो खेळ शिकलेला होता. याखेरीज सैन्यातील कसरतींचीही त्याला सवय होती. परंतु हवाई दलाच्या कसरतींपेक्षा कितीतरी पटीने जास्त पटीने, जास्त कठीण अशी ही पाण्यातील कसरत वाटत होती. तिकडे अठ्ठेचाळीस तासांच्या कसरतीनंतर गरम पाण्याचा शॉवर व बिछाना मिळत असे. इथे थकल्या गोठल्या अवस्थेनंतर तीही शक्यता नव्हती.

भविष्य अनिश्चितच होते. मध्यरात्री वारा पडला व सर्व शांत वाटू लागले. डायव्हर्सना काळोखात काहीतरी त्यांच्याकडे येत आहे असे भासले. काळे, मोठ्ठे, चांदण्यांना झाकून टाकणारे काहीतरी जवळ येत होते. ती जमीन होती.

ओंडक्यासह सर्वांनी पाण्यात जोराने पाय मारीत, तो किनारा गाठला. जिमला वाटले की समुद्रप्रवाह परत समुद्रात खेचून नेतील. परंतु त्या खाडीच्या पाण्याने त्यांना ओढून आत किनाऱ्यावर आणले.

मोठमोठ्या खडकांचा तो एक उंच किनारा होता. प्रत्येक लाटेबरोबर ते खडकावर आपटत होते. जिमने पायाचे स्लिपर्स काढले व ओंडका सोडून, प्रत्येकास

किनाऱ्यावर येण्यास हात दिला. बारा वाजून बावीस मिनिटे झाली होती. ते सारेजण जवळजवळ गेले दहा तास पाण्यात होते.

जिम व शारलेट थोडावेळ एकमेकांना बिलगून विसावले. थंड, ओले, वेटसूटस् असूनही त्यांच्या पार्श्वभागाची चामडी, ओंडक्यावर घासून खरचटली होती. कॅथीने सांगितले की बहुधा हे 'पडवा' बेट असावे. 'टेकडीवर कोळ्यांची वस्ती आहे. आपण वर जाऊन त्यांची मदत कदाचित घेऊ शकू.'' असेही ती म्हणाली.

पहाटे जिम व कॅथी खडक चढून मदत शोधण्यास निघाले. कॅथीला चालणे कठीण झाल्याने ती परतली. दूरवर, समुद्रात, मच्छीमारांच्या बोटी दिसत होत्या. हात हलवूनही कुणाचेच त्यांच्याकडे लक्ष गेले नाही.

गवताळ किनाऱ्यावर दगड रचून एस.ओ. एस. लिहून झाले. काटक्या गोळा करून जाळ पेटविण्याचा प्रयत्नही कॅथीने केला. परंतु फक्त धूरच झाला. लॉरेन्सने थोडे पोहून आणखी काटक्या गोळा केल्या.

खडकाळ किनारा, काळी झाडे, काटेरी झुडुपे असा तो किनारा मुळीच आतिथ्यशील नव्हता. पिण्याचे पाणी नव्हते. सूर्य आग ओकीत होता. अजूनही शारलेटचे स्प्राईट कॅन्सचे कल्पनेत आणणे चालूच होते. त्या मोठ्या खडकाच्या सावलीत, अखेर ती कोलमडून पडली. कॅथी व ती वाळूत रेघोट्या मारून अधिक उणेचा खेळ खेळू लागल्या.

इतक्यात एखाद्या विजेसारखी कर्कश्श किंकाळी हेलनच्या तोंडून निघाली. त्यांनी जिथे अंगावरील डायव्हिंग सुट्स काढून ठेवले होते. त्या खडकाकडे हेलनने बोट दाखवले. त्यांच्या वरच्या खडकावर, अवघ्या दहा मीटर अंतरावर, एक अक्राळविक्राळ, भयंकर, सरपटणारा, प्राणी दिसत होता. त्याच्या करवतीसारख्या दातांतून लाळ गळत होती. पालीप्रमाणे दिसणारा तो विक्राळ प्राणी, मनोऱ्यासारख्या पायांवर उभा राहत उसळून आला आणि जवळजवळ एक फूट लांब असलेली त्याची पिवळसर जीभ, आतबाहेर करीत जणू तपकिरी रंगाची आग ओकू लागली. त्याचा पृष्ठभाग राखाडी खवल्यांसारखा चमचमत होता. अवघी पंचवीस वर्षांची शारलेट, ॲलन, घाबरलेली असूनही जणू संमोहित होऊन त्या तीन मीटर लांब प्राण्याकडे बघत होती. तिच्या हाताची थरथर मित्राला जाणवत होती. उन्हाळ्यातील साहसी ट्रिपला आलेले ते डायव्हर्स, दक्षिण पूर्व आशियातील, रिंका नावाच्या बेटावर, एका प्रचंड पालीचे दर्शन घेत होते. फक्त दोन काठ्यांच्या अंतरावर, त्यांच्यासमोर ज्युरासिक पार्कमधील प्राणी जिवंत स्वरूपात उभा होता. इंडोनेशियापासून बाली बेटाच्या पूर्वेस, तीनशेचाळीस किलोमीटर्स अंतरावर, एकशेपन्नास किलो वजनाचा, तीन मीटर लांबीचा ड्रॅगन ते प्रत्यक्षात पाहत होते. २००८च्या जून महिन्यात घडलेली ही सत्यकथा आहे.

शारलेटच्या पोटात भीतीने खड्डा पडला. रिंका नावाच्या गाईडने, 'कोमो ड्रॅगन' विषयी सांगितलेली माहिती तिला आठवू लागली. हे ड्रॅगन्स जमिनीलगत झुडपात लपून बसतात. हरीण, डुकरे, म्हशी यासारखे सावज जवळ येताच ते त्यांच्यावर तुटून पडतात. एका स्विस पक्षी निरीक्षकाला असेच काही वर्षांपूर्वी आपले प्राण गमवावे लागल्याचेही गाईडच्या ऐकिवात होते.

जर या ड्रॅगनच्या हातून सावज निसटले तर ते त्याचा पाठलागही करतात. या प्राण्यांची लाळही, भयंकर जंतूंनी भरलेली विषारी असते. तीही मृत्यूस कारणीभूत ठरू शकते. एक चव्वेचाळीस किलो वजनाचा ड्रॅगन अडतीस किलोचे डुक्कर वीस मिनिटात सहज संपवू शकतो. काही ड्रॅगन्स झाडे तोंडात धरून, सावजाचा पाठलाग करतात.

जिमला या बेटावर ड्रॅगन्स आहेत हे माहीत नव्हते. जिम मदतीसाठी वर, वर चढून गेल्यानंतर, दुपारभर इतर सारेजण दमल्या भागल्या स्थितीत डुलक्या घेत असताना, हेलनच्या किंकाळ्यांनी जागे झाले होते.

यावेळी तो ड्रॅगन फक्त दोन किलोमीटर अंतरावर होता. सर्वांनी दगडांचा मारा करताच तो थोडा मागे सरकला. त्याची जीभ हेलनच्या पायाजवळ येत असताना तिने कमरेचा पट्टा काढून त्याच्याकडे फेकला. ड्रॅगनने तो पट्टा चावून पाहिला व टाकून दिला. कॅथी उडी मारून उभी राहिली व काठीने ड्रॅगनच्या डोक्यावर वार करण्याच्या प्रयत्नास लागली. काठी चुकवीत ड्रॅगन एकाच जागी उभा होता. शारलेटच्या हृदयाची धडधड वाढली. 'हे सारे काय घडतेय?' तिचा विश्वासच बसत नव्हता.

कविता

# माझी बायको

**-सौ स्वागता प्रियेश विजयकर**
(सौ तन्वी विजयकर)

मित्रांचे मला जेव्हा फोन येतात
तेव्हाच तिला सर्व कामे आठवतात।
आणि फोने संपेपर्यंत
किचेनची भांडी आवाज करत राहतात ।।१।।

कपाट तिचे उघडता
ड्रेसचा ढिगारा भसकन  खाली पडतो।
पण कुठेही जायचे म्हटले
की तिच्याकडे घालण्याजोगे ड्रेसच नसतो ।।२।।

रागाचा  पारा तर काय विचाराल
तापलेला कुकूरही थंड वाटेल।
माघार घ्यायला तर जमतच  नाही
प्रतिउत्तर द्यायची तर माझी बिशादच नाही ।।३।।

जेवण तसे ती बरे करते
स्तुती करणे मात्र अनिवार्य असते
व्हॉटस्‌ॲप आणि फेसबुकवर नैवेद्य दाखवल्यावरच
खायची मला परवानगीची असते ।।४।।

स्लिम ट्रिम राहणे तिला आवडते
ढेरीवरून माझ्या नेहमीच टोमणा मारते
सक्तीचा व्यायामही करवते
झोपेतून उठून जॉगिंगहीला धाडते ।।५।।

अवगुणांची यादी जरी तिची वाटते मोठी
माझ्यावरच्या तिच्या प्रेमापुढे ती अगदीच छोटी।
मनात आहे वटपूर्णिमासारखे एखादे व्रत करावे
जन्मोजन्मी हीच पत्नी लाभावी म्हणून देवास
विनवावे ।।६।।

*

तिकडे वरती फक्त डायव्हिंगचे मोजे घातलेला जिम त्या जंगलात रांगत होता. हातांनी एक मीटर लांबीचे साप दूर करीत, खडक पार करीत होता. एकदा पाकोळ्यांच्या थव्याने त्याला दचकाविले. वरती पोहोचल्यावर कोळ्यांचे खेडे सापडण्याऐवजी त्याला आणखी एक किनाराच दिसला. मधेमधे खडकांच्या रांगा होत्याच! सरपटत जाऊन तो थंडगार समुद्राच्या पाण्यात थोडा विसावला. नंतर थोडे पुढे जाऊन पाण्यातील काही मासे त्याने जबरदस्तीने घशात सोडले.

दुपारपर्यंत त्याची पावले रक्ताळली होती. आता चालणे अशक्य झाले होते. मच्छीमारांच्या बोटी दूरवर जात  येत होत्या. जिमजवळ शिट्टी होती परंतु तो ती वाजवू शकत नव्हता, इतके त्याचे ओठ सुकले होते. संध्याकाळी पानांचा बिछाना करून त्यावर आडवे होता होता ‘इतर सुखरूप राहोत’ आशी देवाची प्रार्थना त्याने केली.

दुसरी रात्र अधिक लांब व भयाण वाटत होती. शारलेट डुलक्या घेत होती. आजुबाजूची झुडपे चित्रविचित्र आवाजांनी भरली होती.  काळोखात अजस्त्र प्राण्यांचे भास होत होते. पहाटे लॉरेन्स पोहत एका खडकावर गेला व हातवाऱ्यांनी कोळ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करू लागला.

सकाळचे साडेअकरा वाजले होते. आशा संपत होती. आता समोर ड्रॅगन नसला तरीही ज्या जंगलात ड्रॅगन्स आहेत तिथे शिरून, पिण्याचे पाणी शोधण्याची कोणाचीच इच्छा नव्हती. सारेच तहानलेले होते.

अर्धमिटल्या डोळ्यातून शारलेटला एक बोट दिसली. तीच बोट परत उलट दिशेने जाऊ लागली. हे काहीतरी वेगळेच घडत होते. एक स्पीड बोट त्यांच्या दिशेने येऊ लागली. कुणीतरी हात हलविले. शारलेट जोरजोरात ओरडू लागली. गुडघ्यावर कोसळून ती रडू लागली.

कॅथीच्या पार्टनरने हरवलेल्या पाच डायव्हर्सचा शोध चालू ठेवला होता. तो अखेर संपला. त्या चारही जणांना स्पीड बोटने उचलून प्रमुख बोटीवर नेण्यात आले. किनाऱ्याकिनाऱ्याने जात असताना एक तासानंतर जिम हात हलविताना त्यांना दिसला. त्याला सोडविल्यानंतर त्या साहसी डायव्हर्सच्या नशिबी आलेले थरारनाट्य अखेर संपुष्टात आले.

(उत्तम अनुवादच्या सौजन्याने)

लेख

# परदेशस्थ मराठी

**⁕ प्रणिता प्रभाकर ⁕**

मराठा तितुका मेळवावा! अटकेपार झेंडे! अशी अनेक वाक्ये आपण इतिहासात वाचली आहेत. परंतु आता तर प्रत्यक्ष प्रचिती यायला लागली आहे.

आपला मराठी समाज फक्त महाराष्ट्रापुरता राहिलेला नसून संपूर्ण जगात पसरलेला आहे आणि मुख्य म्हणजे अमराठी प्रदेशातील मराठी लोक एकत्र येऊन आपली संस्कृती व कला जोपासत आहेत. ह्याचा मला सार्थ अभिमान आहे. महाराष्ट्र मंडळ, विविध कलोपासक मंडळे, नाटकसंस्था इत्यादीद्वारे विविध विषयांवर मान्यवरांच्या मुलाखती, नाटकीकरण, शोभायात्रा, दिंड्या, मराठी सणांचे सादरीकरण हे पाहिल्यानंतर मला फक्त अभिमानच नाही तर; अभिमानाने ऊर भरून येतो व मान ताठ होते. नवल म्हणजे ह्या सर्व समारंभांना लहान-थोर सर्व उपस्थिती लावतात. आपल्याकडे मराठी कुटुंबातील तरुण पिढी आताशा इंग्रजाळलेली असल्याने/इंग्रजीचा पगडा बसल्याने मराठमोळ्या चालीरीतींना व सणसमारंभांना नाके मुरडताना पाहिले आहे व पाठ फिरविलेलीही पाहिली आहे. म्हणून केव्हातरी आपली संस्कृती लोप पावणार का? असा प्रश्न पडतो. परंतु बाहेरगावी असलेले मराठीजन विविध संस्थाद्वारे एकत्रित येऊन सण-समारंभ अती उत्साहाने पार पाडतात.

उदा :

कला (Calla- California Arts Association)

Indian Association of South Country

Naatak

Pathare Prabhu North America

Maharashtra Mandal of Sunnyvale

साहित्याचा कट्टा

(सनीवेलला तर चक्क मराठी नाव आहे सूर्य नगरी म्हणून इत्यादी.)

संस्थांद्वारे जे उपक्रम आयोजित केले जातात त्याद्वारे इतरेजनांना आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते तसेच येणाऱ्या पिढीलाही जाणीव होते.

कला ह्या संस्थेतर्फे मा. डॉ. जयंत नारळीकर यांची मुलाखत आयोजित केली गेली होती व त्या मुलाखतीला उपस्थित राहण्याचा योग मला आला. खरोखरच धन्यता वाटली मला त्या कार्यक्रमास उपस्थित राहून. त्या कार्यक्रमास आबाल-वृद्ध, सहकुटुंब सहपरिवार उपस्थित होते. मुख्य म्हणजे डॉ.जयंत नारळीकर व मुलाखतकार अस्खलित मराठीत बोलत होते. म्हणजेच उपस्थितांमध्ये जो काही तरुण वर्ग होता तोही मराठी बोलू व समजू शकत होता. प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात काही प्रश्न इंग्रजीत विचारले गेले; परंतु संयोजक किंवा मुलाखतकाराने त्याचे मराठीत भाषांतर केले व डॉ नारळीकरांनी त्या प्रश्नाचे उत्तर शुद्ध मराठी भाषेत दिले. इतकेच नव्हे तर त्यांनी आपली मराठी भाषा किती सुबोध, सुलभ व समृद्ध आहे ते उदाहरणाने दाखवून दिले. ते स्वतः मराठी बोलतातच; परंतु त्यांच्या कुटुंबियांसोबतही खास करून त्यांच्या नातवंडांसोबत जी सध्या कॅलिफोर्नियात स्थायिक आहेत; त्यांच्याशीही मराठीत संवाद साधतात. जेणेकरून आपल्या भाषेची फक्त तोंडओळख नसावी परंतु नाळ जोडली जावी. असो.

नाटक ही संस्था साऊथ बे परिसरात अनेक वर्षे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करते. ह्या संस्थेच्या एका कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा योग आला . नाटक ह्या संस्थेने 'राशोमोन' ह्या जपानी सिनेमाचे हिंदीत नाट्यरूपांतर करून त्याचे शंभराहून अधिक प्रयोग केले. ह्या प्रयोगाच्या सादरीकरणा-

वेळेस त्यांनी संवादाचे इंग्रजीतून उपशीर्षक दिले होते. ही सुविधा दिल्याने बऱ्याच तरुण/तरुणींना त्याचा लाभ घेता आला असे वाटते.

ह्या दोन्ही कार्यक्रमात एक बाब प्रकर्षाने जाणवली ती अशी की, उपस्थितांनी भारतीय पोषाखच परिधान केला होता. उदा: साड्या, पंजाबी ड्रेस, फ्रॉक, सदरा लेंगा, शर्ट पॅन्ट इत्यादी.

मराठी बांधवाना आपल्या प्रतिभेचा आविष्कार प्रस्तुत करण्याची जागा म्हणजे साहित्याचा कट्टा होय. न्यू जर्सी येथे हा कट्टा रंगतो खरा; परंतु ह्या कट्ट्यावरील साहित्यिक न्यू जर्सी स्थित नव्हे; तर भारतवासीयही त्या कट्ट्याचे सभासद आहेत. हा साहित्याचा कट्टा ई-मेलद्वारा सजग असल्याने सर्वांना त्याचा लाभ घेता येतो.

जसे राघोजी रावांनी अटकेपार झेंडे फडकावले तसेच आजची पिढीही आपले अटकेपार झेंडे फडकविण्यात कुठेही कमी पडणार नाही हे खरे!

ह्यालाच म्हणतात इतिहासाची पुनरावृत्ती !!!

*

---

## मुखपृष्ठावरील चित्रासंदर्भात अभिप्राय-


LOKMANYA SEVA SANGH PARLE

कविता

# आठवणी

**-श्रिया जयकर**

तुझ्या आठवणी
विसरता विसरता
माझी पन्नाशी
केव्हा निघून जाईल
हे कळणारसुद्धा नाही
साठीनंतर
काठी आल्यावर
त्या जुन्या आठवणींना
काय लहर येईल हे सांगूनसुद्धा
तुला कळणार नाही

*

# प्रभुतरुण भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| 1 | ULKA SURESH VIJAYAKAR | 3000/- |
| 2 | VIJAY G PRADHAN- (In Memory Sou. Sunetra Pradhan) | 1000/- |
| 3 | URMILA V DHAIRYAWAN | 501/- |
| 4 | PRATIMA .V . PRADHAN | 500/- |
| 5 | NEELAN DHAIRYAWAN | 251/- |
| 6 | AISHANA A PRADHAN | 100/- |
| 7 | AISHWARIYA . T. VELKAR | 100/- |
| 8 | NANDA D NAVALKAR | 100/- |
| 9 | YASHALI D NAVALKAR | 100/- |
| 10 | SHRIYA D NAVALKAR | 100/- |
| 11 | JANHAVI R KIRTIKAR | 100/- |

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# 50 Glorious years of Coexistence 1966-2016

**✶ Arvind Dharadhar ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

We celebrated the golden anniversary of our wedding on the 8th of May 2016 in the midst of close family members at our Redeveloped Meghdoot. The event was full of ring tones from members & as well as rnternational calls.

I am now proud head of the family with my better half Praneeta, two sons Ashish & Alok & two grandsons Arnav& Arijit & their mother who is following footsteps of her mother in law in up keep of the younger ones. There have been more ups and less of downs in my fifty year of married life & members of my family have always been pillars of strength to keep my mood up all the time.

The year 1966 was eventful year in my life- on account of

— My Marriage on the 8th of May 1966 with Praneeta Keshav Dhairyawan.

— My clearing Part I of CAIIB adding one increment to my salary.

— My promotion to sub- accountant cadre in SBI elevating my social status.

Thus my status was elevated both on the home front & in the office apart from booking a Flat in the newly formed SBI employees housing society- Meghdoot at Andheri East. We shifted to Meghdoot in the later part of the year 1968,but we celebrated the first birthday of our Ashish on l5I April 1968, where I had created a special invitation card duly designed by me & my wife using Ashish's Photo as a toddler.

There were good turn of event at the new Society. After occupation my wife played a dual role, one of upkeep of my children, while i was away in the State bank also making news in the field of Photography, she was making two ends meet possible by utilisation of the salary received after recovery of the loan instalment. After my second son Alok was born on 6th June 1974, it was an uphill task fora lady who has to single handedly manage the household by taking care of one boy going to school and lend a helping hand to a toddler growing up. Mrs Praneeta was able to achieve expertise in cees[er script & was recepient of certification. The event appeared in Samvad house journal of SBI pensioners association.

My Ashish's thread ceremony took place in 1979 at Meghdoot amongst near relative including Grand Parents & Great Grand Parents . While his school day i was associated with the PTA of Holy Family High School.

After occupation of the flats by the members while the male folks were busy attending or rather trying to achieve our goals of performance women counterparts were enjoying co-existence by forming group enjoying monthly parties at their residences and at time organising picnics etc. The society's social calendar included Sports meets & flag hoisting on independence & republic day as religious rituals.

My Promotion to sub-accountant cadre was a base camp for future achievements. My international recognition in the field of photography led me to Public Relations Dept of SBI. Here I had the opportunity to get the PR Diploma from the St. Xavier's Institute of Mass

## वात्रटिका

### राखण

पाळलं एक छोटंसं कुत्र्याचं पिल्लू,
राखण करेल, होईल जसं मोठं हळू-हळू
दिवसभर वेळ जातो पिल्लाच्या सेवेत,
रात्री उठून-उठून पाहातात, 'आहे ना ते मजेत'

**-डॉ. सुमन नवलकर**

## शब्दांची 'खा'नावळ

**संकलक: सुहासिनी कीर्तिकर**

### वैद्यकीय सल्ला

पावसाळा आला की वर्षासहलीचे पेव फुटते. पण पावसात भिजले की अंगावरचे कपडे अंगावरच सुकतात. मग नाक फुटते... सर्दी होते.

✳

Communication. PR activities at the dept kept me busy, sometime reaching late at home & my wife took it in her stride. There were no communication tools like the mobile available then- not even a landline phone at home. The PR skills achieved helped me to tide over difficult rural posting in Branch Manager Capacity at. This coupled with HR, I could help in achieving rather surpassing the Branch performance including Maiden WELL RUN rating at the central office inspection. I was then promoted to MM II.

The Same PR attitude helped me in occupying prestigious position in Ghatkopar East Branch & No. 1in the Wodehouse Road Branch comfortably. At the Wodehouse road branch as the Branch manager I had to be in the hot seat taking care of the most disciplined members of the Defence Services at Navy nagar & VVIP customers occupying the Wodehouse Building who always had their hot line connected to our top Brass of the 18th Floor of the new Administrative building. Here I was decorated with the MM Ill.

With all the experience in my bag — the Manager concurrent Audit job at Worli North, Vile Pane East & Vile Pane west had a smooth sailing. My glass full approach coupled with helping hand at clearing important back log at IOA statements could help branch at achieve upgrading central office audit ratings.

With multi facet banking experience with me my entry into the second innings was easy when i was invited for consultation in the co-operative Bank which later turned into a credit bank. This was during 1996-2002. Here I realised that the State bank of India was the best among the banking institutions at being the closest to the Book of Instructions.

Notable events in the 2 innings, on the home front were marriages of our sons in the year 2002 and 2003. Both are now settled in their own professions. Alok is blessed with two sons Arnav & Arijit studying in Pane Tilak Vidhyalaya known for its high academic honours. Arnav aged 10 yrs is studious one & was recipient of the Gold Medal at the World Olympiad in Science & English. He also received the Best house honour being the Yellow house commander. Arijit who has a flair for art had his painting published *in* the School Annual magazine.

One of the notable events was the successful Redevelopment of the erstwhile building of the society. We shifted to the new building in 2012. I faced a serious health problem in 2013 & conquered it with my family's *support.* Here too my whole family including State Bank of India stood behind me to see the days ahead.

In the year 2015 I was awarded the special prize for Photography at a well attended function- the news was well covered by the 2 innings Magazine.

✳

# व्यंगचित्रमाला

## -डॉ. सुमन नवलकर



## लेख

# दीर्घायुष्य - शाप की वरदान

**✶ सुरूपा राणे देवरूखकर ✶**

असे म्हणतात की जन्माला येताना माणूस बरोबर काहीच घेऊन येत नाही. सारे नंगे जन्माला येतात. तसे पहाता नंगे ह्या शब्दाचा खरा अर्थ कोणाला नीट समजलाच नाही. नंगे म्हणजे न-अंगे. शरीराच्या संदर्भात नव्हे; तर आत्म्याच्या संदर्भात हा शब्द प्रयोग केला जातो. साधारण पाचव्या महिन्यात मातेच्या शरीरात वाढणाऱ्या गर्भात जेव्हा आत्मा प्रवेश करतो तेव्हा तो जीवात्मा बनतो आणि नवव्या महिन्यानंतर बालकाचा जन्म होतो. जर बारकाईने आपण नवजात अर्भकाचे निरीक्षण केले तर असे लक्षात येईल की त्याच्या दोन्ही मुठी घट्ट आवळलेल्या असतात. जणू त्यात कसला अनमोल ठेवा आहे. म्हणतात ना झाकली मूठ सव्वा लाखाली. खरे आहे ते. कारण त्या बंद मुठीत बरेच काही दडलेले असते. जन्माला येणाऱ्या व्यक्तीचे सारे आयुष्य, त्याचे प्रारब्ध व नशीब त्यात बंद असते. म्हणजेच रिकाम्या नव्हे तर भरल्या हातांनी माणूस जन्माला येतो. त्यापैकी आयुष्य म्हणजे नक्की काय? त्याच्या निरनिराळ्या व्याख्या सापडतील. पण अगदी सोप्या शब्दात जन्म ते मृत्यू मधला जो काळ असतो त्याला आयुष्य म्हणतात. त्या व्यक्तीचा तो जीवनकाल असतो. ज्योतिषी तुम्हाला हवे ते सांगतील पण तुमचे आयुष्य किती हे कधीच सांगणार नाही. हस्तरेषांचे काही गणित असते त्यावरून आयुष्यकाळ मोजता येतो पण ते किती अचूक आहे सांगता येत नाही.

आपण आयुष्य हे सर्वसाधारण वर्षात मोजतो. पण खरे तर प्रत्येकजण जन्माला येताना वरून काही ठराविक श्वास आपल्या नावांवर जमा करून येतो. ते किती वर्ष चालतात त्यावरून आयुष्य किती हे दिसून येते, अगदी पहिल्या श्वासापासून ते शेवटच्या श्वासापर्यंतचा काळ. अशी समजूत आहे की धावपटू किंवा कार्यरत असताना जिथे श्वासांची गती वाढते अशा व्यक्ती दीर्घायुषी नसतात. श्वासांच्या वापरावर आयुष्याची दोरी अवलंबून असते. त्यामुळे सामान्य आयुष्य जगणाऱ्याच्या तुलनेत अशा लोकांचे आयुष्य खूप कमी असते. श्वास जितक्या लवकर संपतील तितक्या लवकर आयुष्य संपेल. दीर्घायुष्य म्हणजे नेमके काय? निश्चित वयोमर्यादेपर्यंत जगणे की ती मर्यादा ओलांडून जाणे? मानवी जीवनाचा कालावधी १०० वर्षे गृहित धरला तर ५० वर्षे किंवा त्याहून जास्त वर्षे जगणाऱ्याला दीर्घायुषी म्हणायला हरकत नाही.

आयुष्य जगण्याच्या नियमांची कुठेही नोंद नाही. प्रत्येकजण आपापल्या परीने आयुष्य जगत असतो. चांगले, वाईटसुद्धा आपल्या परीने ठरवतो. खरे तर आयुष्य जगणे ही एक कला आहे मग ते अल्पकालीन असो वा दीर्घकालीन. आयुष्यात सर्व प्रकारचे चांगले वाईट, सुख-दु:खाचे प्रसंग अनुभवास येतात. दु:खी प्रसंगात रडत-कुढत जगत राहिलो तर दीर्घायुष्य काय; अल्पायुष्य सुद्धा शाप भासेल, पण परिस्थितीवर मात करून आनंदात जगण्याचा प्रयत्न केला तर ते नक्कीच वरदान ठरेल. बऱ्याचदा अनेक लोक एखाद्या भयंकर आजारांनी ग्रासलेले असतात. मग आयुष्य कधी संपेल ह्याची नुसती वाट बघत जगतात तर कधी कधी स्वत: आपलं आयुष्य संपवतात. काही नशिबीचे भोग मानून शक्यतो हसत खेळत दु:ख सहन करत जगण्याचा प्रयत्न करतात. अशा भावनेने दु:ख थोडेफार हलके होते. अशा वृत्तीने शापाचेसुद्धा वरदानात रूपांतर होते. ही कला साऱ्यांनाच अवगत नसते. मानवी जीवन परमेश्वराने दिलेले अनमोल वरदान आहे असा दृष्टिकोन ठेवला तर तो शाप वाटणार नाही. आपल्या अवती भवती अशी बरीच उदाहरणे असतात की छोट्याशा आयुष्यात एखादी

व्यक्ती बरेच काही दिव्य-भव्य करून जाते. दीर्घायुष्य लाभले तर ते वरदानच. पण काही माणसे दीर्घायुष्याचा लाभ न होता नुसतेच आयुष्य कंठीत असतात, खऱ्या अर्थानी आयुष्य जगत नसतात. मृत्यू येत नाही म्हणून जगतात काही करण्याची इच्छा नसते, सतत कशाची न कशाची तरी उणीव भासत असते. सुख-समाधान मानायची वृत्तीच नसते. इथे दृष्टीकोण फार महत्त्वाचा असतो जसे एखाद्याला पाण्याचा ग्लास अर्धा भरलेला दिसतो तर एखाद्याला अर्धा रिकामा दिसतो. प्रत्येकाचा वेगवेगळा दृष्टीकोण.

इतिहासात बरीच अल्पायुषी माणसे भरीव कामगिरी करून गेल्याची नोंद आहे. अगदी जीवंत उदाहरण म्हणजे शिवाजी महाराजांचे. अल्पायुषी असताना देखील त्यांच्या कर्तृत्वामुळे ते आज अजरामर झाले आहेत. जर दीर्घायुष्य लाभले असते तर आणखी बरेच काही करू शकले असते ते. एखादी व्यक्ती लोळागोळा होऊन पडलेली असेल, काही करण्याच्या स्थितीत नसेल, संपूर्ण परावलंबी असेल तर दीर्घायुषी असूनही नक्कीच ती शापित आहे असे म्हणायला हरकत नाही. पण धडधाकट व्यक्ती नुसतीच वेळ वाया घालवीत असेल तर मिळालेल्या वरदानाचा दुरुपयोग करते असेच म्हणावे लागेल. ज्याच्यापाशी मनोबल, हिम्मत, काही चांगले करण्याची जबरदस्त इच्छा व तळमळ असेल तर विपरीत परिस्थितीतसुद्धा शापाचे रुपांतर वरदानात करेल. ह्यात अशक्य असे काहीच नाही. असे कही विश्वस्तरावर नाही तर निदान आपल्या विश्वात तरी बरेच काही करण्यासारखे असते. त्यासाठी दृढ निश्चय हवा. हल्ली असे पहाण्यात येते की बहुतेक ज्येष्ठ नागरिकांना आपले आयुष्य शाप वाटते कारण ज्यांच्यासाठी सारे आयुष्य वेचले ती मुले त्यांचा सांभाळ करत नाही आणि वयानुसार त्यांची ताकद आणि क्षमताही कमी झालेली असते. सरतेशेवटी ज्यांनी त्यांनी ठरवायचे असते की आपल्याला लाभलेले दीर्घायुष्य शाप आहे की वरदान, आणि ते सार्थकी कसे लावायचे ही निश्चयबुद्धी असेल तर लाभलेलं आयुष्य वरदान वाटेल.

म्हणतात ना अज्ञानात सुख असते. आपण अल्पायुषी की दीर्घायुषी आहोत हे आधीच कुणाला ठाऊक नसते. मग अशा व्यर्थ विचारात वेळ आणि आयुष्य घालवण्यात काहीच अर्थ नाही. त्यापेक्षा त्याचा सुदुपयोग केला तर बरेच काही भरीव कार्य आपल्या हातून घडू शकते व ज्यातून लाभणारे समाधान एक आगळा वेगळा आनंद देईल. सकारात्मक विचारातून नेहमी सकारात्मक गोष्टी घडतात. त्याचा अनुभव घेतला की अशा निरर्थक व नकारात्मक विचारांना थारा मिळणार नाही.

## SAVING THE WORLD

**-Aarati Jayesh Kothare**

The world is dwindling and we have to save it,

Why don't you all help a little bit? Everyone will get his or her share, if you'll really care.

Geography is changing day by day, This is what the news reporters say, Now is the time to stop all this, You have been already warned by the snakes last hiss.

Saving the world is not on easy task, Come on remove your selfish mask, see the nature and its living forms, why to keep such dreadful norms?

Live and let others live is the true norm of life,

Why to cancle it with a very sharp knife? Please save me our mother is crying, what is the harm in just trying?

Cause this is the day you can change the world, This is the day you can care the world, This is the day you can share the World, And this is the day you can save the world...

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# प्रकाशातील परभू

# खुशबू रुपक कोठारे

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

## CM-At-Risk V/S Bridging CM at Risk V/S CM-Agency: Which is Better & When?

**Khushboo Rupak Kothare**



**Khushboo Kothare** is an MSc student at SKEMA Business School, Paris studying Project & Programme Management and Business Development. She holds a Lean Six Sigma Green Belt and is certified in Project Management Prince 2® Foundation, Agile Project Management (AgilePM®) Foundation, Certified Associate in Project Management (CAPM) and Certified Green Project Manager (GPM-b™). She originates from Mumbai, India where she studied Management Studies (BMS) and also holds a Master degree in Commerce (MCOM-Management). She has worked for First Advantage Private Limited in India as a Client and Candidate Associate for a year and thereafter at Intelenet Global Services in India as a Senior Customer Service Executive (Senior Underwriter) & Quality Analyst for more than a year and a half followed by her internship at Balshoi SARL in France as an Intern Business Developer for five months.

Khushboo can be contacted through mail at khushboo.kothare@gmail.com and also on LinkedIn at 422785137.

### त्यांनी सादर केलेले अभ्यासरूप

**ABSTRACT**

Selecting the right construction management project delivery method is the most important decision which is made by the owner before starting any construction project. However, it is easy to get confused when it comes to construction management project delivery methods. But, it is extremely important for the owners to know and understand these methods before starting any construction project. During making the decision the owner should know and have a clear understanding of all the options available and should compare each project delivery method's advantages &

disadvantages to maximize the objectives and minimize the risk. Selection of the most appropriate construction management project delivery method reduces the risk & improves the likelihood of attaining projects quality, cost and schedule goals. Selection of the right project delivery method has a direct impact on the level of success of the project. Hence, it is important to know the numerous factors which should be taken into account while making a decision. While there are many different types of delivery methods, for our purpose, we will discuss the difference between the three major delivery methods and understand which method is most appropriate to use in a particular situation. To explain this, we have used Disjunctive Reasoning to rank our criteria and further, we came to the decision of which construction management project delivery method is the best with the help of Compensatory Model of Additive Weighting Technique.

**Keywords:** Construction Management, Project Delivery Methods, Construction Management Agency, CM at Risk, Bridging CM at Risk.

**INTRODUCTION**

Globalization has led to rapid development of construction projects and the research has identified the increase in projects from past 100 years. The Construction Projects are large in size and it plays a significant role in the economy. With the evolution of construction projects, they tend to grow larger and have more complexity. In recent years projects have witnessed an increasing number of construction failures. Project owners are continually attempting to balance power, responsibility and control. However, do owners have confidence in their ability to meet quality, schedule & budget? Are they sure to know each and every contractual policy? Are they trained enough to deal with the issues?

The fact is unless an owner undertakes a great deal of construction, he reasonably is not aware that there can be many different ways of structuring a construction project. Even though an owner is frequently involved with construction, there is a possibility that he may not realize that his regular approach to construction is not the only way that it can be done, and he most probably is not familiar with the manifolds of variations in structuring construction projects.

Project delivery method selection is of very high importance. It's a system used by owners for organizing and financing operations, maintenance of services, design, and construction by entering into legal agreements with one or more entities. This selection is done at the beginning of a project. This is the best position that the owners can be in to affect its outcomes. There isn't a best or worst form of construction project delivery. But each approach has corresponding advantages and disadvantages depending on the circumstances and situation. The project owner should as such select a method wherein its advantages would maximize his goals of the project and its disadvantages would be of least importance to him.

**STEP 1: Problem Recognition, Definition and Evaluation**

Construction Delivery Methods are easy to get confused with, however, a better understanding of them is important to select one for the project. The level of their success mainly depends mainly on selecting the correct delivery method.

This article will thus identify and discuss the types of construction project delivery methods such as CM Agency, CM at Risk and Bridging CM. It will also describe the advantages and disadvantages of using these methods with a view from a practical standpoint, to assist owners in selecting a method that best fits their project.

To summarize this paper is mainly written to answer the following questions:

i. What are the differences between CM-At-Risk, Bridging CM & CM Agency?

ii. When & under what circumstance each method would be most appropriate to use?

**METHODOLOGY**

**STEP 2: Development of Feasible Alternatives**

To avoid all the problems mentioned above, fixing Construction Project Delivery Method is one of the most important decisions made by the owner. Selection of any method starts with a good understanding of the choices available. Owners must think of the impact of each choice because the delivery method influences the choice of contractual relationships.

From this, it is possible to define 3 alternate methods:

- CM-At-Risk
- Bridging CM-At-Risk
- CM Agency

**STEP 3: Development of the outcomes for each alternative**

To state that a particular delivery method is appropriate to use under a certain situation, it is necessary to first know what each type is. For this, a research on papers and books specifically linked to the topic construction management project delivery methods which are published till now on the subject is realized to identify the definitions utilized by authors and then choose the one that is the most relevant to the construction management project delivery method. The research on these papers and books is made with the help of different databases such as Google, Google Scholar, Guild of Project controls, etc.

The collected information is from the official sites and documents are valid enough to rely on as a solid reference for this paper.

- **CM-At-Risk**

